श्रेष्ठ ख्रिस्ती साहित्य मालिका

# देवाचे गुणविशेष

**लेखक** – आर्थर डब्ल्यू. पिंक (१८८६-१९५२)

**अनुवाद** – क्रॉसी उर्टेकर

**देवाचे गुणविशेष**

**लेखक** - आर्थर डब्ल्यू. पिंक

**अनुवाद** - क्रॉसी उर्टेकर

Arfthur W. Pink (1886-1952) wrote and published these chapters as a series in his monthly magazine. *Studies in the scriptures,* from 192 to 1030. By God's grace, Chapel Library has republished the *Studies* beginning the year 1932, available for download worldwide and *by* request in North America. We also print many books and booklets gleaned from articles in the *Studies.* Each chapter of *Attributes of God is* available in Print as a small booklet. These may be ordered from our catalog in North America, or download from our website worldwide without charge.

© Copyright 1993 by Chapel Library (this edition), Pensacola, Florida. Permission is expressly granted to reproduce this material by any means, provided: 1) it is not charged for beyond a nominal sum for cost of duplication 2) this copyright notice and all the text on this page is included.

Chapel Library is a faith ministry that relies entirely upon God's faithfulness. We therefore do not solicit donations, but we gratefully receive support from those who freely desire to give. Chapel Library does not necessarily agree with all the doctrinal positions of the authors it publishes.

**Worldwide,** please download material without charge from our website, or contact the international distributor as listed there for your country.

In **North America,** for additional copies of this booklet or other Christ-centered materials from prior centuries, please contact

**CHAPEL LIBRARY**
**2603 West Wright Street Pensacola, Florida 32505 USA**
Phone: (850) 438-6666 • Fax: (850) 438-0227
chapel@mountzion.org • www.ChapelLibrary.org

Translated and Published by Love Maharashtra with permission from Chapel Library USA

**लव्ह महाराष्ट्र**

१७७२ भीमपुरा गल्ली क्र. २३, बाबाजान चौक, पुणे – ४११००१. महाराष्ट्र

**दुरध्वनी**: ०२०-२६३४०५५३

**ईमेल**: lovemaharashtra@gmail.com

**वेबसाईट**: lovemaharashtra

# प्रस्तावना

"**त्याच्याशी सख्य कर व शांती जोड,** अशाने तुझे कल्याण होईल" (ईयोब २२:२१). "परमेश्वर म्हणतो, ज्ञान्याने आपल्या ज्ञानाचा अभिमान बाळगू नये, बलवानाने आपल्या बळाचा व श्रीमंताने आपल्या श्रीमंतीचा अभिमान बाळगू नये; बाळगावयाचा असला तर मी दया करणारा व पृथ्वीवर धर्म व न्याय चालवणारा परमेश्वर आहे, याची त्याला जाणीव आहे, ओळख आहे, याच्याविषयी बाळगावा; यात मला संतोष आहे, असे परमेश्वर म्हणतो." (यिर्मया ९:२३,२४). देवाचे आत्मिक व तारणाविषयीचे ज्ञान असणे ही प्रत्येक मानव प्राण्याची गरज आहे.

देवाच्या खऱ्या ज्ञानाचा पाया देवाच्या वचनात प्रकट केलेल्या त्याच्या परिपूर्णतेच्या सुस्पष्ट बौद्धिक आकलनावर असायला हवा. अज्ञात देवावर विश्वास ठेवता येत नाही, की त्याची सेवा करता येत नाही, अथवा त्याची आराधना करता येत नाही. या पुस्तकात दैवी गुणविशेषांच्या परिपूर्णतेची काही तत्त्वे सादर करण्याचा प्रयत्न केला आहे. जर वाचकाला यापुढील पानांचा पाठपुरावा करून खरोखर फायदा करून घ्यायचा असेल तर त्याकडून त्याला आशीर्वाद प्राप्त व्हावा म्हणून त्याने नक्कीच उत्कटतेने देवाला विनवणी करायला हवी, देवाची सत्ये आपल्या अंत:करणाला  व विवेकभावाला *लागू* करायला हवीत, म्हणजे त्यामुळे त्याच्या जीवनाचे परिवर्तन होईल.

काही वेळा आपल्याला पुस्तकी ज्ञानाहून अधिक देवाच्या ज्ञानाची गरज असते. केवळ आपण देवाला जसजसे शरण जाऊन समर्पित होऊ, त्याच्या अधिकाराच्या अधीन होऊ, व त्याच्या पवित्र आज्ञा व नियमांच्या चौकटीत आपल्या जीवनाचे सर्व तपशील बसवू तसतसे आपल्या जिवाला देवाची खरी *ओळख* होत असते. होशेय ६:३ म्हणते, "चला, आपण परमेश्वरास ओळखू, परमेश्वराचे ज्ञान मिळवण्यास झटू (त्याच्या आज्ञापालनाच्या मार्गाने जाऊ). "जो कोणी त्याच्या इच्छेप्रमाणे करावयाची मनीषा बाळगील त्याला समजेल" (योहान ७:१७). “जे लोक आपल्या देवास ओळखतात ते बलवान होऊन थोर कृत्ये करतील" (दानीएल ११:३२).

*– ए. डब्ल्यू पिंक, १९३०*

# प्रकरण १

# देवाचे एकमेवत्व

या लेखाचे शीर्षक कदाचित त्याचा विषय स्पष्टपणे सूचित करण्यास अपुरे पडते. याचे अंशत: कारण असे की आज फार थोडक्या लोकांना देवाच्या वैयक्तिक परिपूर्णतेवर मनन करण्याची सवय आहे. त्यातील काही जे प्रसंगी बायबल वाचतात, त्यांना जाणीव आहे की देवाच्या उदात्त व वैभवी गुणविशेषांमुळे आपण ईश्वरी प्रेरणेने आश्चर्यचकित होतो व आराधनेस प्रवृत्त होतो. देव ज्ञानाने महान आहे, त्याचे सामर्थ्य अद्भुत आहे, तरी तो दयेने भरलेला आहे हे सर्वसाधारण ज्ञान बहुधा लोक गृहीत धरून चालतात. पण त्याचे व्यक्तित्व, स्वभाव व त्याचे गुणविशेष यांची पुरेशी कल्पना आहे त्याचा उपभोग घेता येतो असे मानणे म्हणजे त्याच्या अस्तित्वाच्या कल्पनेची तुटपुंजी कल्पनाही नसणे. ते सर्व तर पवित्र वचनात प्रकट केले आहे. या ऱ्हासाच्या युगात फार थोड्या लोकांना ते प्राप्त झाले आहे. देवाचे श्रेष्ठत्व एकमेव आहे. "हे परमेश्वरा, देवांमध्ये तुझ्यासमान कोण आहे? पावित्र्यामुळे वैभवी, स्तवनीय कृत्यांनी भयानक, अद्भुते करणारा असा जो तू, त्या तुझ्यासारखा कोण आहे?" (निर्गम १५:११).

## इतर सर्वांपूर्वी

"प्रारंभी देव" होता (उत्पत्ती १:१). एक काळ असा होता, जर त्याला 'वेळ' म्हणून संबोधले, तर देव त्याच्या स्वभावानुसार ऐक्यात (जरी अस्तित्वात समान असलेल्या तीन व्यक्ती असल्या तरी) एकटाच राहत होता. ‘‘प्रारंभी देव.’’ तेव्हा जेथे सध्या त्याचे गौरव व्यक्त केले जाते, तो स्वर्ग नव्हता. त्याचे लक्ष सतत खिळून ठेवायला पृथ्वी नव्हती. त्याची स्तुतिस्तोत्रे गायला देवदूत नव्हते, त्याच्या शब्दाच्या सामर्थ्याने आधार द्यायला विश्व नव्हते. अगदी काहीही नव्हते, कोणीही नव्हते, पण देव होता; आणि हे एक दिवस, एक वर्ष, एक युग नव्हे तर "अनंतकाळापासून" होता. युगारंभापूर्वी, देव एकटा होता: आत्मनिग्रही, स्वयंपूर्ण, स्वत:मध्ये तृप्त, कशाचीही गरज नसणारा. तरीही त्याला विश्व, दूत, मानव आवश्यक होते. तेही युगारंभापूर्वी अस्तित्वासाठी पाचारण्यात आले. त्यांना निर्माण करण्याने देवामध्ये काहीही मूलभूत भर पडणार नव्हती. तो बदलत नाही (मलाखी ३:६), त्यामुळे त्याच्या मूलभूत गौरवात भर पडू शकत नाही की ते कमीही होऊ शकत नाही.

## त्याची सार्वभौम इच्छा

निर्मिती करण्यासाठी देवावर कोणाची जबरदस्ती नव्हती, कोणाच्या उपकारांचे ऋण नव्हते व आवश्यकताही नव्हती. पूर्णपणे त्याच्या सार्वभौमतेखाली त्याने ही कृती करणे पसंत केले. त्याला कोणी त्यासाठी कारणीभूत झाले नाही, कशानेही ते करण्यास तो निर्धारित झाला नाही, तर त्याच्या मनाच्या संकल्पानुसार त्याने सर्व केले. "आपल्या मनाच्या संकल्पाप्रमाणे तो अवघे चालवतो" (इफिस १:११). केवळ *आपले गौरव प्रकट करण्यासाठी* त्याने निर्मिती केली. देवाचे वचन जे समर्थन करते, त्यापलीकडे आपण गेलो आहोत अशी कल्पना आपले काही वाचक करतात का? मग आपण नियमशास्त्र व त्याविषयीच्या साक्षींकडे वळावे: "उभे राहा आणि आपला **देव परमेश्वर** याचा येणेप्रमाणे धन्यवाद अनंतकाळ करा: तुझे वैभवशाली नाम धन्य असो; ते सर्व *धन्यवाद व*

*स्तवन यापलीकडे आहे"* (नहेम्या ९:५). आपल्या आराधनेतूनही देवाला काही फायदा होत नसतो. त्याने मुक्ती दिलेल्यांच्या द्वारे त्याच्या कृपेचे गौरव बाहेरून त्याच्याकडे वर जावे याची त्याला गरज नव्हती, कारण तसे काही प्राप्त न होताही तो त्याच्याठायीच पुरेसा गौरवी आहे. मग त्याच्या निवडलेल्यांना त्याच्या कृपेच्या गौरवाची स्तुती करण्याकरता आगाऊ नेमण्यासाठी कशामुळे तो प्रेरित झाला? इफिस १:५ आपल्याला त्याचे कारण सांगते की "त्याच्या मनाच्या सत्संकल्पाप्रमाणे."

आपल्या बहुतेक सर्व वाचकांना पुरती जाणीव आहे की ते ज्या उच्च भूमीवरून चालत आहेत ती नवीन आणि विलक्षण आहे. त्यामुळे सावकाश पुढे पावले टाकणे आवश्यक आहे. आपण पुन्हा वचनाकडेच वळायला हवे. रोमकरांस पत्राच्या ११ व्या अध्यायाच्या शेवटी जेव्हा पौल येतो, तेव्हा तारण शुद्ध देवाच्या सार्वभौम कृपेने होते या मुद्द्यावरील दीर्घचर्चेनंतर तो प्रश्न करतो, "प्रभूचे मन कोणी ओळखले आणि त्याचा मंत्री कोण होता? त्याला प्रथम देऊन त्याची फेड करील असा कोण आहे?" (रोम ११:३४-३५). यात प्रकर्षाने हे मांडले आहे की देवाला त्याच्या निर्मितीच्या ऋणाखाली आणणे अशक्य आहे. देवाला आपल्याकडून काही प्राप्त होत नाही. "तू धार्मिक असलास तर तू त्याला काय देणार? तुजपासून *त्याला* काय मिळणार? तुझ्या अधर्माचे फळ तुजसारख्या अधर्मालाच बाधेल; तुझ्या धर्माचे फळ मानवसंततीलाच लाभेल" (ईयोब ३५:७,८). पण ते देवावर काहीच परिणाम करू शकणार नाही, तो *स्वत:ठायी* सर्वस्वी आशीर्वादित आहे. "त्याप्रमाणे तुम्हांला सांगितलेली सर्व कामे केल्यावर आम्ही निरुपयोगी दास आहो; आम्ही आमचे कर्तव्य केले आहे असे म्हणा" (लूक १७:१०) — आपल्या आज्ञापालनाचा देवाला काहीही फायदा झालेला नाही.

नाही, पुढे पाहू गेल्यास; आपल्या प्रभू येशूख्रिस्ताने जी कृत्ये केली किंवा जे दु:खसहन केले, त्याद्वारे त्याने देवाच्या मूळ अस्तित्वात व गौरवात कोणतीही भर घातली नाही. खरोखर हे धन्य व गौरवी सत्य आहे. त्याने देवाचे गौरव आपल्याला *प्रकट केले*, पण देवामध्ये त्याने कसलीही भर टाकली नाही. तो स्वत:च हे स्पष्टपणे जाहीर करतो. त्याचे शब्द अढळ आहेत: "तुझ्या पलीकडे मला सुख नाहीच" (स्तोत्र १६:२). हे संपूर्ण स्तोत्र ख्रिस्ताचे आहे. ख्रिस्ताचे चांगुलपण व धार्मिकता भूतलावरील त्याच्या पवित्र जनांपर्यंत पोहंचते (स्तोत्र १६:३); पण देव त्याहून उंच व सर्वांपलीकडे होता. केवळ देवच "धन्यवादित" आहे (मत्तय १४:६१).

हे पूर्णत: सत्य आहे की देवाला मनुष्यांकडून सन्मान दिला जातो आणि अवमानही केला जातो; पण तो त्याच्या मूलभूत अस्तित्वामध्ये दिला जात नाही तर त्याच्या अधिकृत स्वभाववैशिष्ट्यांमध्ये दिला जातो. हे तितकेच सत्य आहे की देव निर्मितीकडून, देवत्वामुळे व मुक्तिकार्यामुळे "गौरविला" जात आहे. याविषयी वाद घालण्याचे आपण क्षणभरही धाडस करू नये. पण या सर्वाचा संबंध त्याचे गौरव प्रकट होण्याशी व त्याची आपल्याला जाणीव होण्याशी आहे. तरीही जर देवाची इच्छा असती तर तो *आपले गौरव* आपल्या निर्मितीला *व्यक्त न करता* सदासर्वकाळ एकटा राहू शकला असता. पण ते व्यक्त करावे किंवा न करावे हे सर्वस्वी त्याच्या इच्छेवर अवलंबून होते. पहिला प्राणी अस्तित्वात येण्यापूर्वी तो स्वत:मध्ये परिपूर्ण होता. आणि आता त्याच्या हातची सर्व निर्मिती *त्याच्यासाठी* कशी आहे? वचनालाच याचे उत्तर देऊ द्या.

> " पाहा त्याच्या हिशोबी राष्ट्रे पोहऱ्यातल्या जलबिंदूसमान, तराजूतल्या रजासमान आहेत; पाहा, द्विपेही तो धुळीच्या कणांसारखी उचलतो. लबानोन जळण्यास पुरावयाचा नाही, व त्यावरील वनपशु होमास पुरे पडावयाचे नाहीत. सर्व राष्ट्रे त्याजपुढे काहीच नाहीत. त्याच्या

हिशोबी ती अभाव व शून्यता याहूनही कमी आहेत. तुम्ही देवाला कोणाची उपमा द्याल? त्याच्याशी कोणती उपमा लावून पाहाल?" (यशया ४०: १५-१८).

असा आहे वचनातील देव. अरेरे, पण तरीही तो दुर्लक्ष करणाऱ्या मोठ्या लोकसमुदायाला अजून "अज्ञात आहे" (प्रे. कृ. १७:२३).

> "हाच तो पृथ्वीच्या नभोमंडळावर आरूढ झाला आहे. तिच्यावरील रहिवासी टोळांसमान आहेत. तो आकाश मलमलीप्रमाणे पसरतो, राहण्यासाठी तंबू ताणतात तसे तो ताणतो. तो अधिपतींस कस्पटासमान लेखतो. पृथ्वीच्या न्यायाधिशांना शून्यवत् करतो" (यशया ४०:२२,२३).

व्यासपीठांवर विराजमान दिसणाऱ्या सरासरी "देवांपेक्षा" या वचनांमधला देव किती विस्तृत प्रमाणात भिन्न आहे! नव्या कराराची साक्षही जुन्या कराराहून काही वेगळी नाही: जर दोन्हींचा लेखक एकच आहे, तर ते कसे शक्य असेल? तेथेही आपण असे वाचतो, "जो धन्य व एकच अधिपती, राजांचा राजा व प्रभूंचा प्रभू, ज्या *एकालाच* अमरत्व आहे, जो अगम्य प्रकाशात राहातो, ज्याला कोणा माणसाने पाहिले नाही, आणि कोणी पाहू शकत नाही, तो ते त्याचे प्रकट होणे यथाकाळी दाखवील. त्याला सन्मान व पराक्रम युगानुयुग आहे, आमेन." (१तीमथ्य ६:१५,१६). अशा या एकाच देवाचा आपण आदर करावा, भक्ती करावी व त्याला वंदन करावे. वैभवी म्हणाल तर तोच एकमेव आहे, त्याचे श्रेष्ठत्व असामान्य आहे, त्याची परिपूर्णता अद्वितीय आहे. तो सर्वांना आधार देऊन सांभाळतो, पण तो सर्वांपासून स्वतंत्र आहे. तो सर्वांना देतो, पण त्याला संपन्न करणारा कोणी नाही.

**प्रकटीकरणाद्वारे**

असा देव शोधूनही सापडणार नाही. पवित्र आत्म्याद्वारे वचनातून आपल्या अंत:करणात प्रकट होण्यानेच केवळ त्याचे ज्ञान होते. हे खरेआहे की निर्मिती त्या निर्मात्याला इतकी सहजसुलभतेने प्रदर्शित करते की मानवाला काही "सबबच सांगता येत नाही." तरीही आपण ईयोबासोबत म्हणू शकले पाहिजे की "पाहा ह्या त्याच्या कार्यक्षेत्राच्या केवळ सीमा आहेत; त्याची केवळ चाहुल आपल्या कानी येते; पण त्याच्या प्रभावाच्या गर्जनेचा अंत कोणाला लागेल?" (ईयोब २६:१४). समर्थकांनी लावलेल्या अर्थातून जो मूळ कल्पनेचा आराखडा तयार केला, त्याद्वारे होणाऱ्या तथाकथित वादाने मला असे वाटते की त्यातून काही चांगले होण्याऐवजी अधिक इजा मात्र झाली आहे, कारण त्यामुळे महान देवाला मर्यादित सीमेच्या स्तरावर आणून त्याचे आकलन करून घेण्याचा प्रयत्न केला गेला आहे, त्यामुळे त्याच्या एकमेव श्रेष्ठत्वाची दृष्टीच गमावली गेली आहे.

एका रानटी मनुष्याला वाळूत एक घड्याळ सापडणे व त्याने त्याचे बारकाईने निरीक्षण करणे व त्यावरून त्याने त्या घड्याळाच्या निर्मात्याविषयी अनुमान करणे यातून तुलनेने काही साम्य स्पष्ट केले जाते. येथवर ठीक आहे. पण त्यापलीकडे जाण्याचा प्रयत्न होतो: समजा तो रानटी मनुष्य त्या वाळूवर बसला, आणि त्या घड्याळाच्या निर्मात्याविषयी मनात कल्पना करू लागला, त्याच्या व्यक्तिगत आवडीनिवडी व शिष्टाचार, त्याचे स्वभावविशेष, त्याच्या ठायी असणारी कौशल्ये आणि नैतिक चारित्र्य — ह्या सर्वांनी तर व्यक्तिमत्व घडते; हा रानटी मनुष्य खरेच या मनुष्याविषयी विचार किंवा तर्क करू शकेल का — एवढ्यावरून तो मनुष्य म्हणू शकेल का की, "मी त्या घड्याळ

निर्मात्याला ओळखतो?" हा प्रश्नच निरर्थक वाटतो. कारण हा सनातन व अमर्याद देव इतका महान असताना मनुष्याच्या तर्कशक्तीच्या ग्रहणकक्षेत बसू शकतो असा आहे का? नाही. मुळीच नाही. वचनातील देव ज्यांना *तो स्वत:ची ओळख करून देईल*, त्यांनाच त्याची ओळख होऊ शकते हेच खरे.

देवाला बुद्धीनेही ओळखता येत नाही. "देव आत्मा आहे" (योहान ४:२४), त्यामुळे त्याची केवळ आत्म्याने ओळख होऊ शकते. पण पतित मनुष्य आत्मिक नाही; तो दैहिक आहे. जे म्हणून आत्मिक आहे त्याला तो मेलेला आहे. त्याचा नवीन जन्म झाल्याशिवाय आणि दैवी योजनेनुसार मरणातून जीवनात आल्याशिवाय तसेच अद्भुत प्रकारे तो अंधारातून प्रकाशात आल्याशिवाय तो देवाच्या गोष्टी पाहू देखील शकत नाही (योहान ३:३) आणि त्यांचे त्याला मुळीच आकलन होऊ शकत नाही (१करिंथ २:१४). पवित्र आत्मा आपल्या बुद्धीत नव्हे तर आपल्या ऱ्हदयात झळाळला पाहिजे यासाठी की "येशूख्रिस्ताच्या मुखावरील देवाच्या गौरवाच्या ज्ञानाचा प्रकाश पाडण्यासाठी तो आमच्या अंत:करणात प्रकाशला आहे" (२ करिंथ ४:६). तरीही तेवढे आत्मिक ज्ञानही अपूर्णच आहे. पुनरुज्जीवन झालेल्या जिवाची कृपेत व ख्रिस्ताच्या ज्ञानात *वृद्धी व्हायलाच* हवी (२ पेत्र ३:१८). ख्रिस्ती विश्वासीयाची प्रार्थना व प्रमुख उद्देश असा हवा की "सर्व प्रकारे प्रभूला संतोषविण्याकरता त्याला शोभेल असे वागावे, म्हणजे प्रत्येक प्रकारच्या सत्कार्याचे फळ द्यावे आणि देवाच्या पूर्ण ज्ञानाने आपली वृद्धी व्हावी" (कलसै १:१०).

# प्रकरण २

# देवाचा निर्णय किंवा संकल्प

देवाचा निर्णय किंवा संकल्प म्हणजे भावी गोष्टींविषयी त्याचा उद्देश अथवा निर्धार. देवाचे वचन या विषयावर एकवचनी उल्लेख करते (रोम. ८:२८; इफिस३:११), कारण त्याच्या अमर्याद मनाची भविष्याच्या गोष्टीविषयी एकच कृती असणार होती. पण *आपण* ह्या अनेक कृती होत्या असे म्हणतो कारण जसे विचार किंवा प्रसंग उद्भवतात किंवा त्याच्या निर्णयाचे निरनिराळे विषय आपण पाहतो तेव्हा आपली मने *एकामागून एक* प्रकटीकरणे असाच विचार करू शकतात.कारण ती अनेक आहेत असे आपल्याला दिसतेव प्रत्येकाला काही विशिष्ट हेतू असावा असे आपल्याला वाटते. पण अनंताचे ज्ञान पायरीपायरीने किंवा एका टप्प्यातून दुसऱ्यामध्ये समजून घेता येत नाही: “हे जे त्याला युगादिकालापासून माहीत आहे ते करणारा प्रभू” (प्रे. कृ. १५:१८).

## देवाचे निर्णय

देवाचे निर्णय याचा उल्लेख बायबलच्या अनेक परिच्छेदांमध्ये केलेला आहे आणि निरनिराळ्या शब्दांमध्ये तो मांडला आहे. स्तोत्र २:७ मध्ये "निर्णय" हा शब्द सापडतो. इफिस ३:११ मध्ये "युगादिकालाचा संकल्प" म्हटले आहे. प्रे. कृ. २:२३ मध्ये "देवाच्या ठाम संकल्पानुसार व पूर्वज्ञानानुसार" असे म्हटले आहे. "योजनेप्रमाणे — इच्छेनेरूप स्वसंकल्पाचे रहस्य" असा शब्दप्रयोग आहे. रोम. ८:२९ मध्ये "पूर्वज्ञान" म्हटले आहे. देवाचे निर्णय पूर्णपणे सुज्ञतेचे आहेत हे दर्शवण्यासाठी देवाच्या निर्णयाला "मसलत" असेही म्हटले आहे. त्यांना देवाची "इच्छा" म्हणण्याचे कारण त्याच्यावर कोणाचेही नियंत्रण नाही तर तो आपल्या इच्छेने कृती करत असल्याचे निर्देशित व्हावे. जेव्हा मनुष्याची इच्छा त्याच्या आचरणावर ताबा चालवते, तेव्हा ती लहरी व अस्थिर असते; पण दैवी प्रक्रियेत *सुज्ञता* नेहमी इच्छेशी निगडित असते. यावरून दिसते की देवाचे निर्णय "त्याच्या मनाच्या संकल्पाप्रमाणे" असतात (इफिस १:११).

देवाचे निर्णय अपवाद न ठेवता सर्व भावी गोष्टींशी निगडित असतात: या काळात जे काही धडत असते ते सर्व युगारंभापूर्वी आगाऊ नेमलेले असते. छोटे किंवा मोठे, बरे किंवा वाईट, सर्व काही देवाच्या हेतूशी निगडित असते. तरीही बरे वाईट म्हटल्यावर आपण ही काळजी घेतली पाहिजे की देव पापावर नियंत्रक व पापाला ताब्यात ठेवणारा असला तरी जसा तो चांगल्याचा उत्पादक आहे तसा तो पापाचा उत्पादक *नाही*. पाप हे पवित्र देवाच्या प्रत्यक्ष कृतीने त्याच्यापासून निघू शकत नाही. परंतु देवाच्या हुकमाने व परवानगीने व नकारात्मक कृतीने ते निघते. देवाचा निर्णय त्याच्या सत्तेप्रमाणेच व्यापक आहे, तो सर्व प्राणिमात्र व घटनांना व्यापतो. त्याचा निर्णय आपल्या जीवन मरणाशी आपल्या या काळातील अवस्थेशी व सार्वकालिक अवस्थेशी संबंधित होता. देव सर्व गोष्टी स्वत:च्या इच्छेच्या मसलतीने करतो. त्याच्या कृत्यांवरून आपल्याला समजते की त्याची मसलत काय आहे व काय होती. जसे आपण आर्किटेक्टने तयार केलेला आराखडा पाहतो व त्याने बांधलेली इमारत त्यानुसारच बांधली गेली आहे का याची तपासणी करतो तसेच हे आहे.

देवाने फक्त एवढाच निर्णय घेतला नाही की, मानवाला निर्माण करायचे, त्याला पृथ्वीवर प्रस्थापित करायचे आणि त्याला स्वत:च्या मार्गदर्शनाखाली मोकाट सोडून द्यायचे. उलट त्याने पुष्कळ

व्यक्तींमध्ये सर्व परिस्थिती चपखल बसवली, आणि आरंभापासून अंतापर्यंतच्या मानवजातीच्या इतिहासाच्या संपूर्ण तपशीलाचा त्यात अंतर्भाव केला. त्याने केवळ एवढाच निर्णय केला नाही की जगाच्या शासनव्यवस्थेसाठी काही सर्वसामान्य नियम प्रस्थापित करावेत, तर त्याने ते सर्व नियम सर्व विशिष्ठ परिस्थितीला कसे लागू करावेत हे लावून दिले आहे. आपले आयुष्याचे दिवस मोजलेले आहेत, एवढेच नव्हे तर आपल्या मस्तकावरचे केस देखील मोजलेले आहेत. आपण हे समजून घ्यायला हवे की दैवी निर्णयाचा विस्तार देवाने लावून दिलेल्या नियमांच्या तरतुदीपासून कार्यरत होताना किती विस्तृत आहे. ईश्वरी व्यवस्थेतून तो घेत असलेली काळजी अत्यंत क्षुल्लक प्राणिमात्रांपर्यंत, आणि अगदी बारीकसारीक घटनांपर्यंत — म्हणजे चिमणीचे मरणे आपल्या डोक्यावरचे सर्व केस — येथवर पोहंचते.

## दैवी निर्णयांचे गुणधर्म

आता आपण दैवी निर्णयांचे काही गुणधर्म लक्षात घेऊ.
पहिला गुणधर्म आहे की ते *सार्वकालिक* आहेत. जर ते काळामध्ये तयार केले असे गृहीत धरले तर नंतर काही नवीन प्रसंग घडले असेही गृहित धरावे लागेल आणि आगाऊ न दिसलेली घटना किंवा अनेक परिस्थितींच्या संयोगाने एखादी अवस्था निर्माण झाली असेल की त्यामुळे तो परात्पर नवीन ठराव करायला प्रवृत्त झाला असेल. त्यामुळे असा मुद्दा उपस्थित होईल की देवाच्या ज्ञानाला मर्यादा आहेत, आणि जसजसा काळ लोटत आहे तसे त्याच्या ज्ञानात वृद्धी होत आहे — हे तर अघोर दुर्भाषण होईल. जो मनुष्य विश्वास ठेवतो की देवाच्या जाणीवा अमर्याद आहेत; भूतकाळ वर्तमानकाळ व भविष्यकाळ व्यापून आहेत, तो कधीही देवाचे निर्णय तात्पुरते असतात या चुकीच्या सिद्धांताला संमती देणार नाही. मानवाच्या भ्रष्टतेमुळे घडणाऱ्या भावी घटनांविषयी देव अज्ञान नसतो. त्याने असंख्य घटनांमध्ये हे दाखवून दिले आहे. आणि भाकिते हे त्याला सार्वकालिक भावी काळाचे यथार्थ ज्ञान असल्याचे *प्रकटीकरण* होय. देवाचे वचन ठाम सांगते की विश्वासी जनांची ख्रिस्तामध्ये युगारंभापूर्वीच निवड झाली (इफिस १:४). होय त्यांच्यावर तेव्हाच कृपा करण्यात आली (२ तीमथ्य १:९).

दुसरा गुणधर्म, देवाचे निर्णय *सुज्ञ* आहेत. ज्यांचा शेवट शक्य तितका उत्तमच होणार अशाची निवड करणे आणि त्याची पूर्तता होण्यासाठी यथार्थ साधनसामग्रीचा वापर करणे म्हणजे सुज्ञता. आपल्याला समजल्यानुसार देवाच्या निर्णयात हे गुणधर्म सुस्पष्टपणे दिसतात. त्या निर्णयातील देवाची प्रत्येक हस्तकृती *अंमलात येताना* देवाच्या सुज्ञतेचा प्रत्येक पुरावा आपल्यासमोर उघड होतो; तो पुरावा त्याच्या योजने बरहुकूम असतो. स्तोत्रकर्ता घोषित करतो की "हे परमेश्वरा, तुझी कृत्ये किती विविध आहेत! ती सर्व तू सुज्ञतेने केली" (स्तोत्र १०४: २४). त्याच्या कृत्यांचा अगदी थोडा भाग आपल्या निरीक्षण कक्षेत येतो. तरी आता आपण इतर गोष्टींप्रमाणे येथून पुढे जाण्याची गरज आहे आणि थोड्याश्या नमुन्यावरून आपण संपूर्ण गोष्टीची पारख करयला हवी व ज्ञातावरून अज्ञाताचे ज्ञान घ्यायला हवे. जर कोणाला एखाद्या यंत्राची तपासणी करण्याची संधी मिळाली, तर तो यंत्राच्या एखाद्या भागाच्या कौशल्याचे आकलन करून घेईल व मग त्याची प्रशंसा करील मग स्वाभाविकच त्याचा विश्वास बसेल की त्या यंत्राचे इतर भागही तितकेच प्रशंसनीय आहेत. जेव्हा देवाच्या कार्याविषयी आपल्यावर कशावरूनही उगाच शंका व तिरस्करणीय आक्षेप लादले जातील व खरे काय खोटे काय याविषयीच्या कल्पनांनी ते मिटवू शकलो नाही तर याच पद्धतीने आपण आपले समाधान करून घेऊ शकतो. जेव्हा आपण सीमित गोष्टींच्या मर्यादेपर्यंत पोहंचतो व अमर्याद क्षेत्रावर नजर टाकतो तेव्हा आपल्या मुखातून उद्गार यावेत "अहाहा, देवाच्या बुद्धीची व ज्ञानाची

संपत्ती किती अगाध आहे! त्याचे निर्णय किती गहन आणि त्याचे मार्ग किती अगम्य आहेत!" (रोम. ११:३३).

तिसरा गुणधर्म, ते *स्वतंत्र* आहेत. "परमेश्वराच्या आत्म्याचे नियमन कोणी केले आहे? त्याचा मंत्री होऊन त्याला कोणी शिकवले आहे? त्याने कोणाला मसलत विचारली? सन्मार्गाविषयी त्याला समज देऊन त्याला कोणी शिक्षण दिले? त्याला कोणी ज्ञान शिकवले? सुज्ञतेचा मार्ग त्याला कोणी दाखवला?" (यशया ४०:१३,१४). देवाने आपले निर्णय तयार केले तेव्हा तो एकटाच होता. त्याच्या निर्धारांवर बाहेरून कोणाचाही प्रभाव नव्हता. निर्णय तयार करणे किंवा न करणे, आणि एखाद्या गोष्टीवर निर्णय करणे तर दुसऱ्या बाबतीत निर्णय न करणे हे ठरवायला तो स्वतंत्र होता. तो सर्वश्रेष्ठ, स्वतंत्र, व सार्वभौम आहे या गुणांशी आपण त्याच्या स्वातंत्र्याचा संबंध जोडायला हवा.

चौथा गुणधर्म, ते *विनाअट आणि परिपूर्ण* आहेत. त्यांची अंमलबजावणी कोणत्याही कारणाने बंद पडत नाही व पडणारही नाही. प्रत्येक प्रसंगी देवाने त्याच्या निर्णयाचा जेव्हा शेवट केला, तेव्हा त्याबरोबर त्याच्या सर्व साधनांचाही अंत केला. त्याच्या निवडलेल्यांच्या तारणाचा जेव्हा त्याने निर्णय केला तेव्हा त्यांच्यामध्ये विश्वासाचे काम करण्याचाही त्याने निर्णय केला (२ तीमथ्य २:१३). "माझा संकल्प सिद्धिस जाईल, माझा सर्व मनोरथ मी पूर्ण करीन" (यशया ४६: १०). एखाद्या परिस्थितीवर विसंबून त्याची मसलत कार्य करू शकत नाही, तर देव "आपल्या मनाच्या संकल्पाप्रमाणे अवघे चालवतो." (इफिस १:११).

## मानवाची जबाबदारी

देवाच्या निर्णयांचे अक्षयत्व व अजिंक्यत्व यासोबतच देवाचे वचन स्पष्ट शिकवते की मानव हा जबाबदार प्राणी असून आपल्या कृत्यांचा त्याला देवाला हिशोब द्यायचा आहे. जर आपले विचार देवाच्या वचनाने तयार झालेले असतील तर ते त्याला दुसरे वचन नाकारण्याच्या दिशेने चालवणार नाहीत. एक कोठे बंद होते आणि दुसरे कोठे सुरू होते याची व्याख्या करणे अवघड असले तरी त्याचे स्वातंत्र्य दिले आहे. दैवी व मानवी कोठे जोडले जातात याबाबतही तसेच आहे. खऱ्या प्रार्थनेत शब्दांची जुळणी पवित्र आत्मा करतो, तरीही तो मानवी अंत:करणाचा धावाही असतो. देवाचे वचन ईश्वरप्रेरित आहे तरीही ते मानवांनी लिहिले आहे. पण ते मानव काही यंत्रासारखे नव्हते तर त्याहून अधिक म्हणजे पवित्र आत्म्याच्या हातचे हत्यार होते. ख्रिस्त देवही आहे आणि मानवही आहे. तो सर्वज्ञ आहे तरी तो "ज्ञानात वाढत गेला" ( लूक २:५२). तो सर्वसमर्थ होता तरी "त्याला अशक्तपणात वधस्तंभावर खिळण्यात आले" (२ करिंथ १३:४). तो जीवनाचा राजपुत्र होता, तरी मरण पावला. ही सर्व महान रहस्ये आहेत तरी प्रश्न न करता ती विश्वासाने ग्रहण करता येतात.

यापूर्वी नेहमी निर्देशित केले आहे की देवाच्या सार्वकालिक निर्णयाविरुद्ध घेतलेला प्रत्येक आक्षेप त्याच्या सार्वकालिक पूर्वज्ञानाबद्दलही तितक्याच जोरदारपणे घेतला जातो.

> देवाने निर्णय केलेल्या सर्व गोष्टी पूर्ण झालेल्या असोत वा नसोत, त्या सर्व देवाच्या अस्तित्वाच्या मालकीच्या आहेत, त्याला सर्व काही आधीच माहीत आहे हे देखील त्याच्या मालकीचे आहे. जर त्याला सर्व काही आधीच माहीत आहे तर त्याला मंजुरी देणे

न देणे; म्हणजे ते घडू देण्याची त्याची इच्छा असते  किंवा ते घडू न देण्याची त्याची इच्छा असते. पण ते तसे घडावे अशी इच्छा करणे म्हणजे त्याविषयी  निर्णय घेणे होय.

(जोनाथन एडवर्डस)

अखेर माझ्याबरोबर हे गृहीत धरण्याचा प्रयत्न करा आणि मग त्याविरुद्ध गोष्टींवर  विचार करा. देवाचे निर्णय *धिक्कारणे*, म्हणजे रचना नसलेल्या शक्यता किंवा अंध नशिबाद्वारे जगाचे अटळ परिणाम होऊ देणे. मग आपल्या बिचाऱ्या अत:करणांस व मनांस काय शांती, कोणती खात्री, कोणते समाधान लाभणार? गरजेच्या व संकटाच्या काळात आसऱ्यासाठी कोठे धाव घेणार? असे काहीही मिळणार नाही . काळ्याकुट्ट निबिड अंधकारापेक्षा व नास्तिकतेच्या भयानक निंद्य गोष्टीपेक्षा अधिक चांगले तेथे काही मिळणार नाही.

माझ्या प्रिय वाचका, सर्व काही अमर्याद सुज्ञतेने व चांगुलपणाने *ठरलेले* असल्याबद्दल आपण किती कृतज्ञ असावे! देवाच्या दैवी निर्णयाबद्दल देव आपल्याकडून किती कृतज्ञतेने केलेल्या स्तुतीप्रशंसेला पात्र आहे! त्या निर्णयांमुळेच "आपल्याला ठाऊक आहे की, देवावर प्रीती करणाऱ्यांस म्हणजे त्याच्या संकल्पाप्रमाणे बोलावलेल्यांस देवाच्या करणीने सर्व गोष्टी मिळून कल्याणकारक होतात" (रोम. ८:२८). चला, आपणही म्हणू या, "कारण सर्व काही त्याच्याचपासून त्याच्याच द्वारे व त्याच्या प्रीत्यर्थ आहे. *त्याला युगानुयुग गौरव असो*, आमेन"
(रोम. ११:३६).

# प्रकरण ३

# देवाचे ज्ञान

## देवाची सर्वज्ञता

देव सर्वज्ञ आहे. त्याला सर्व म्हणजे सर्व काही माहीत आहे. जेवढ्या शक्यता असतील, प्रत्यक्षातील सर्व; वर्तमानकाळ, भूतकाळ आणि भविष्यकाळातील सर्व घटना व सर्व मानवप्राणी यांचे त्याला ज्ञान आहे. स्वर्गातील, पृथ्वीवरील आणि नरकातील सर्वांशी तो पूर्णपणे संबंधित असून त्यातील प्रत्येक प्राणिमात्राचे जीवन तो तपशीलवार जाणतो. "अंधारात काय आहे हे त्याला ठाऊक असते" (दानीएल २:२२). त्याच्या नजरेपासून काहीएक सुटत नाही. त्याच्यापासून काहीएक लपत नाही. तो काहीएक विसरत नाही. आपणही स्तोत्रकर्त्यासोबत म्हणू या, "हे ज्ञान माझ्या कल्पनेपलीकडचे आहे, हे अगम्य आहे, हे माझ्या आवाक्याबाहेर आहे" (स्तोत्र १३९: ६). त्याचे ज्ञान परिपूर्ण आहे. तो कधी चूक करत नाही, कधी बदलत नाही, कशाकडेही कधी दुर्लक्ष करत नाही. "त्याच्या दृष्टीला अदृश्य अशी कोणतीही निर्मिती नाही, तर ज्याच्याबरोबर आपला संबंध आहे, त्याच्या दृष्टीला सर्व उघडे व प्रकट केलेले आहे (इब्री ४:१३). होय, असा हा देव आहे "त्याच्याशी आपली गाठ आहे"!

"माझे बसणे व उठणे तू जाणतोस. तू दुरून माझे मनोगत समजतोस. तू माझे चालणे व माझे निजणे बारकाईने पाहतोस. आणि माझ्या एकंदर वर्तनक्रमाची माहिती तुला आहे. हे परमेश्वरा माझ्या मुखातून असा एकही शब्द येत नाही की जो तुला मुळीच ठाऊक नाही" (स्तोत्र १३९:२-४). वचनातील देव किती अद्भुत आहे! त्याच्या प्रत्येक गौरवी गुणासाठी आपण त्याला सन्माननीय मानून त्याचा आदर करावा. त्याच्या सर्वज्ञतेसाठी आपण त्याच्यासमोर लवून वंदन करीत त्याची प्रशंसा करावी. तरी आपण त्याच्या दैवी पूर्णतेवर किती थोडके मनन करतो! याचे कारण त्याचा केवळ विचारही आपल्याला अस्वस्थ करून टाकतो!

हे वास्तव किती गंभीर आहे: की देवापासून काहीही लपवून ठेवता येत नाही! ‘‘तुमच्या मनात काय काय येत आहे ते मी जाणतो" (यहेज्केल ११:५). जरी आपल्यासाठी तो अदृश्य असला तरी आपण त्याच्या दृष्टीला अदृश्य नाही. रात्रीचा अंधार, ओढून घेतलेले पडदे, किंवा निबिड अंधारकोठड्या कोणत्याही पाप्याला सर्वज्ञ देवाच्या नजरेपासून लपवू शकत नाही. बागेतील वृक्ष आपल्या पहिल्या आईबापांना झाकू शकले नव्हते. कोणाही मानवाने काईनाला आपल्या भावाचा खून करताना पाहिले नव्हते पण त्याचा निर्माणकर्ता त्याच्या गुन्ह्याचा साक्षीदार होता. आपल्या डेऱ्यात सारा एकांतात हसली असेल, तरी यहोवाने ते ऐकले. आखानाने सोन्याची वीट चोरून काळजीपूर्वक पुरून ठेवली पण देवाने ती प्रकाशात आणली. दाविदाने आपल्या दुष्टतेची झाकपाक करायला खूप परिश्रम केले पण सर्व पाहणाऱ्या देवाने त्याच्या सेवकाद्वारे त्याला सांगून पाठवले की, "तो मनुष्य तूच आहेस"! आणि या लेखकाला व वाचकालाही असे म्हटले आहे की, "तुमचे पाप तुम्हाला धरून देईल"(गणना ३२:२३).

शक्य झाले तर मानव देवाच्या देवत्वातील सर्वज्ञता बाजूला सारील — "देहस्वभावाचे चिंतन हे देवाबरोबर वैर आहे" (रोम. ८:७) हा केवढा मोठा पुरावा आहे! ही दैवी परिपूर्णता स्वाभाविकपणे

मान्य करायला दुर्जन जितका मनस्वी वीट मानतात तितकाच स्वभावत: ते तिचा तिरस्कार करतात. त्यांच्या पापाचा कोणी साक्षीदार नसावा, त्यांच्या अंत:करणाचा शोध घेणारा कोणी नसावा, त्यांच्या कृत्यांचा न्यायाधीश कोणी नसावा अशी ते इच्छा करतात. असा देव त्यांच्या विचारातूनच हद्दपार करण्याची ते खटपट करतात: "त्यांच्या सर्व दुष्टतेचे स्मरण मला आहे हे ते लक्षात आणत नाहीत"(होशेय ७:२). स्तोत्र ९०:८ किती गंभीर आहे! ख्रिस्ताला धिक्कारणाऱ्या प्रत्येकाचा थरकाप होण्यास तेथे कारण आहे; "तू आमचे अपराध आपल्यापुढे ठेवले आहेत; आमची गुप्त पातके आपल्या मुखप्रकाशात ठेवली आहेत."

पण सर्व विश्वासी जनांसाठी, देवाच्या सार्वभौमतेच्या वास्तवात भरलेले सत्य अत्यंत समाधानदायी आहे. गोंधळाच्या परिस्थितीत तो ईयोबासोबत म्हणतो, "परंतु माझा मार्ग त्याला *कळला* आहे" (ईयोब २३:१०). हे माझ्यासाठी खोल रहस्य असेल, माझ्या मित्रांसाठी अगम्य असेल पण ते *त्याला कळते!* चिंता व दुर्बलतेच्या प्रसंगी विश्वासी जन स्वत:ची खात्री करून घेऊ शकतात, "तो आमची प्रकृती जाणतो, आम्ही केवळ माती आहोत हे तो आठवतो" (स्तोत्र १०३:१४). शंका कुशंकांच्या समयी ते या गुणाकडे वळून म्हणतात, "हे देवा, माझी झडती घेऊन माझे ऱ्हदय जाण; मला कसोटीस लावून माझे मनोभाव तपास. माझ्याठायी दुष्टपणाकडे काही प्रवृत्ती असेल तर पाहा आणि मला सनातन मार्गाने ने" (स्तोत्र १३९:२३,२४). काही वेळा वाईट प्रकारे अपयश आल्याने आपल्या कृतीमुळे आपले अंत:करण निराश होते, आपली कृत्ये भक्ती करायला मान्य होत नाहीत आणि एक शोध घेणारा प्रश्न मनाला सतावत राहातो, "तू माझ्यावर प्रेम करतोस का?" मग पेत्राप्रमाणे आपण म्हणतो," प्रभू, आपणाला *सर्व ठाऊक आहे*; मी आपणावर प्रेम करतो हे आपण *ओळखले आहे*"(योहान २१:१७).

येथे प्रार्थनेला उत्तेजन दिले आहे. धार्मिकांची प्रार्थना ऐकली जाणार नाही असे भय धरण्याचे काही कारण नाही. किंवा त्यांचे उसासे व अश्रु देवाच्या नजरेतून सुटणार नाहीत. कारण तो देव अंत:करणाची मनोवृत्ती व इच्छा जाणतो. रोज दर तासाला असंख्य प्रार्थना सादर केल्या जात असता एवढ्यांमधूनही एका संताची वैयक्तिक विनवणी दुर्लक्षिली जाण्याचा धोका येथे नाही. कारण ह्या *अमर्यादित* देवाच्या बुद्धीची क्षमता अशी आहे की एका वेळी लाखो लोकांच्या विनवण्या जणू काही एकेकाची विनवणी ऐकण्याची अपेक्षा पुरी करावी तशी तो ऐकतो. त्याचप्रमाणे योग्य शब्दांची मांडणी करण्यात कमी पडत असल्यास, जीवाची खोल उत्कंठा व्यक्त करण्याची क्षमता नसल्यास, आपल्या प्रार्थनेचे कसे होईल याचे भय धरण्याची गरज नाही. कारण "त्यांनी हाक मारण्यापूर्वी मी उत्तर देईन, ते बोलत आहेत तोच मी त्यांचे ऐकेन" (यशया ६५:२४) असे प्रभू म्हणतो.

## भूतकाळ आणि भविष्यकाळ

"आमचा प्रभू थोर व महासमर्थ आहे, त्याची बुद्धी अमर्याद आहे" (स्तोत्र १४७:५). देव त्याच्या अधिक्षेत्राच्या कानाकोपऱ्यात गतकाळी कायकाय घडले ते जाणतो, आता संपूर्ण विश्वात जे काही चालू आहे तेवढ्याशीच तो निगडित आहे असे नाही तर येणाऱ्या काळी जे काही घडणार आहे, त्यातील क्षुल्लक घटनांपासून मोठ्या घटनांपर्यंत सर्व घटना त्याला माहीत आहेत. देवाचे भावी ज्ञान भूतकाळाच्या व वर्तमानकाळाच्या ज्ञानाइतकेच परिपूर्ण आहे, कारण भविष्यकाळ पूर्णपणे त्याच्यावरच अवलंबून आहे. जर देवाच्या प्रतिनिधित्वाशिवाय किंवा त्याच्या परवानगीशिवाय जर एखादी काहीतरी गोष्ट कशीही घडली अशी शक्यता गृहीत धरली तर ती काहीतरी गोष्ट देवापासून स्वतंत्र असेल, आणि त्याच क्षणी देवाचे अतिश्रेष्ठत्व संपेल.

भावी काळाचे दैवी ज्ञान हे केवळ गूढ आहे असे नाही, तर ते असे काही आहे की जे अतूट असे त्याच्या उद्देशाशी निगडित व जोडलेले आहे. जे काही अजून घडायचे आहे त्याचा देवाने स्वत: आराखडा तयार केला आहे, आणि त्याने जी आखणी केली आहे ते कायमस्वरूपी परिणामकारक *असणार आहेच*. त्याचे खात्रीलायक वचन ठाम सांगते की "तो आकाशातील आपल्या सैन्याचे व पृथ्वीवरील रहिवाश्यांचे इच्छेस येईल ते करतो; तू असे काय करतोस, असे त्याचा हात धरून कोणाच्याने त्याला म्हणवत नाही" (दानीएल ४:३५). आणि "मनुष्याच्या मनात अनेक मसलती येतात; परंतु परमेश्वराची योजना स्थिर *राहते*" (नीति. १९:२१). देवाचे ज्ञान व सामर्थ्य ही दोन्ही समान अमर्यादित आहेत. त्याने कार्यसिध्दीचे जे उद्दिष्ट ठरवलेले आहे त्याची अगदी पूर्णत: खात्री आहे. दैवी मसलतीची अंमलबजावणी अपयशी होण्याची त्रिवार शक्यता नाही. अन्यथा त्र्येक देव लबाडी करतो असे होईल, जे मुळीच शक्य नाही.

आतापर्यंतच्या देवाचे भविष्यासंबधी ज्ञान पाहू गेल्यास ते अनिश्चित नसून ते त्याच्या त्याच्या उद्दिष्टांना धरून व त्याच्याशी संबधित आहे. अजून जे घडणार आहे ते देवाने स्वत: ठरवले असून जे त्याने ठरवले आहे ते प्रत्यक्षात घडायलाच हवे. “तो आकाशातील आपल्या सैन्यांचे व पृथ्वीवरील रहिवाश्यांचे इच्छेस येईल ते करतो; तू असे काय करतोस, असे त्याचा हात धरून कोनाच्याने त्याला म्हणवत नाही” (दानीएल ४:३५). आणि पुन्हा नीति. १९:२१ म्हणते, “मनुष्याच्या मनात अनेक मसलती येतात, परंतु परमेश्वराची योजना स्थिर राहते.” देवाची सुज्ञता व सामर्थ्य ही दोन्ही तितकीच अमर्याद असल्यामुळे देवाने हे ठरवले आहे ते साध्य होण्याची निश्चितच हमी आहे. देवाची मसलत पूर्ण होण्याचे चुकणे हे कधीही शक्य नाही कारण जो देव त्रिवार पवित्र आहे तो कदापि लबाडी करू शकणार नाही.

आतापर्यंतच्या प्रत्यक्षातील देवाच्या मसलती संदर्भात पाहू गेल्यास भविष्या संदर्भातील सर्व काही खात्रीलायकच ठरते. प्राणिमात्रांसंबंधातील किंवा गौण हेतू संबधीही देवाचे निर्णय शक्य पण अनिश्चित असे राहिलेले नाहीत. भावी काळातील घटनांची केवळ अशी शक्यता वर्तवलेली नाही की तसे कदाचित घडेल अगर कदाचित घडणार नाही: "जे त्याला युगादिकालापासून माहीत आहे ते करणारा" तो आहे (प्रे.कृ. १५:१८). देवाने जो संकल्प केला आहे तो विचलित न होता अढळ राहणारा आहे; "कारण त्याला विकार नाही, तो फिरण्याने छायेत जात नाही" (याकोब १:१७). म्हणूनच जे पुस्तक भविष्यकाळाविषयी इतका उलगडा करते, त्याच्या सुरुवातीचेच वाक्य आहे, "जे लवकर *झाले पाहिजे* ते" (प्रकटी १:१).

देवाच्या वचनात नोंद केलेल्या प्रत्येक भाकितात देवाचे परिपूर्ण ज्ञान उदाहरणांसह सिद्ध केले आहे. जुन्या करारात इस्राएलांच्या इतिहासाविषयी पुष्कळ भाकिते असून त्यातील सर्व तपशीलांसह कित्येक शतकांनंतर ती पूर्ण झाली आहेत. त्यातच ख्रिस्ताच्या या भूतलावरील कार्यासंबंधीचीही भाकिते आहेत; ती देखील संपूर्णत: अक्षरश: पूर्ण झाली आहेत. अशी भाकिते ज्याला आरंभापासूनच शेवट माहीत आहे आणि ज्याचे ज्ञान भाकित केलेले सर्व काही विनाअट खात्रीने सिद्धिस जाणार यावर आधारित आहे, तोच अशी भाकिते करू शकतो. जुन्या व नव्या दोन्ही करारात भविष्यकाळाविषयी अशाच प्रकारच्या पुष्कळ घोषणाचा अंतर्भाव आहे. आणि तीही "सर्व *पूर्ण होणे अवश्य आहे*" (लूक २४:४४); ती पूर्ण होणारच कारण ज्याने त्याविषयी संकल्प केला, त्यानेच ती आगाऊ सांगितली आहेत.

तरी येथे हे देखील निदर्शनास आणून द्यायला हवे की देवाचे ज्ञान अगर त्याची जाणण्याची कृती सारे घडवून आणतात एवढेच लक्षात घेऊ नये. केवळ देवाला माहीत आहे म्हणून आजवर सर्व

काही घडून आलेले नाही. तर देवाची *इच्छा* हे त्यामागील *कारण* आहे. जी व्यक्ती देवाच्या वचनावर खरोखर विश्वास ठेवते, तिला आगाऊच माहीत आहे की जगाच्या इतिहासाचा अंत होईपर्यंत नियमितपणे अथक एकामागून एक सर्व मोसम होतच राहतील (उत्पत्ती ८:२२), त्याचे ज्ञान हे त्यांच्या या चक्राचे कारण नाही. वस्तू आहेत किंवा असतील यावरून देवाचे ज्ञान उद्भवत नाही तर ह्यासाठी त्याने त्यांना *नेमले* आहे यामुळे. देवाला ज्ञान होते आणि त्याने कित्येक शतकांपूर्वी आपल्या पुत्राच्या वधस्तंभी जाण्याविषयीचे तो देहधारी होण्यापूर्वीच भाकित केले होते. कारण हे सर्व त्याच्या दैवी उद्देशाचा भाग होते. तो युगारंभापूर्वी पासूनच वधलेला कोकरा आहे. म्हणून आपण वाचतो की, "तो देवाच्या संकल्पाप्रमाणे व पूर्वज्ञानाप्रमाणे तुमच्या स्वाधीन" झाला (प्रे. कृ. २:२३).

आता लागुकरणात्मक दोन शब्द. देवाचे अमर्याद ज्ञान पाहून आपण *आश्चर्यचकित* व्हावे. प्रभू अतिज्ञानी व्यक्तिपेक्षाही किती उत्तुंग उच्च आहे! आजचा दिवस माझ्यापुढे काय वाढून आणील हे आपल्यापैकी कोणीच जाणू शकत नाही. पण संपूर्ण भविष्यकाळ त्याच्या सर्वज्ञ नजरेपुढे खुला आहे. देवाचे अमर्याद ज्ञान पाहून आपण पवित्र भीतीयुक्त आदराने भरून जावे. आपण जी काही कृती करू बोलू, अगर विचार करू ते काहीही त्याच्या ज्ञानातून निसटू शकत नाही. त्याच्याशीच आपली गाठ आहे, "परमेश्वराचे नेत्र सर्वत्र आहेत; ते बरेवाईट पाहात असतात" (नीति. १५:३). मग तर आपले स्वत:वर किती नियंत्रण असायला हवे! आपण अधिक *वारंवार* त्याचे मनन केले पाहिजे. बेदरकार वर्तन करण्यापेक्षा आपण हागारेप्रमाणे म्हटले पाहिजे, "मला पाहाणारा देव" (उत्पत्ती १६:१३). देवाच्या अमर्याद ज्ञानाचे आकलन होऊन ख्रिस्ती व्यक्ती देवाची *आराधना* करण्यास भारून गेली पाहिजे. माझा संपूर्ण जीवनपट त्याच्या नजरेसमोर आरंभापासून उभा होता. त्याने माझे प्रत्येक पतन, माझे प्रत्येक पाप, माझे प्रत्येक मागे वळणे आगाऊच पाहिले आहे; तरीही त्याचे अंत:करण मात्र माझ्याशी जडूनच राहिले. अहाहा, या जाणीवेने मी त्याच्यापुढे आश्चर्याने नतमस्तक होऊन त्याची भक्ती करायला हवी!

# प्रकरण ४

# देवाचे पूर्वज्ञान

गतकाळात या विषयावर किती वाद निर्माण झाले होते! पण देवाच्या वचनातील कोणत्या सत्याला ईश्वर विज्ञानाच्या व ख्रिस्ती विश्वासाविषयीच्या संघर्षातून जाण्याचा प्रसंग घडला नाही? ख्रिस्ताचे देवत्व, त्याचा कुमारिकेपोटी जन्म, त्याचे प्रायश्चित्ताचे मरण, त्याचे द्वितीयागमन, विश्वासी जनांचे नीतिमान ठरले जाणे, पवित्रीकरण, त्यांची सुरक्षितता, मंडळी, तिची व्यवस्थित रचना, तिचा अधिकारवर्ग, तिची शिस्त, प्रभुभोजन आणि इतरही मोलवान सत्यांचा उल्लेख करता येईल. तरीही ज्या पाखंडांनी हल्ले चढवले, ते देवाच्या विश्वासू सेवकांची मुखे मुळीच बंद करू शकले नाहीत. मग आपण देवाच्या पूर्वज्ञानाचा प्रश्न मनस्ताप देणारा आहे असे म्हणून तो का टाळावा? लोकांना हवी तितकी चिथावणी देऊ देत; देवाने औदार्याने दिलेल्या प्रकाशानुसार असलेली साक्ष देणे आपले काम आहे.

### चुकीचे निराकरण

देवाच्या पूर्वज्ञानासंदर्भात दोन गोष्टी आहेत, ज्यांच्याविषयी पुष्कळ लोक अज्ञान आहेत: त्या शब्दाचा *अर्थ* आणि बायबलनुसार असलेली या विषयाची व्याप्ती. हे अज्ञान विस्तृत प्रमाणात असल्याने उपदेशक व शिक्षक या विषयावरचे विकृत शिक्षण देत असताना देवाच्या लोकांनाही त्यात बळी पाडतात. या गोष्टीपासून एकच गोष्ट सुरक्षित राखते, ती म्हणजे विश्वासात दृढ होणे. त्यासाठी प्रार्थनापूर्वक परिश्रम घेऊन देवाच्या वचनाचा अभ्यास करायला हवा. ते सौम्यतेने ग्रहण करून ते मनावर बिंबवले गेले पाहिजे. मगच आपल्यावर हल्ला करणाऱ्यांविरुद्ध आपली भक्कम तटबंदी तयार होईल. *या सत्याचा आज लोक गैरवापर करून पाप्यांच्या तारणात असलेले देवाचे पूर्ण सार्वभौमत्व नाकारून त्याचा अनादर करतात*. जसे काही उच्च टीकाकार देवाच्या वचनाची ईश्वरी प्रेरणा आपलीशी करत नाहीत, उत्क्रान्तीवादी देवाच्या निर्मितीचे कार्य मानत नाहीत; तसेच काही खोटे बायबल शिक्षक देवाच्या पूर्वज्ञान विकृत करतात; त्याचे कारण देव सार्वकालिक जीवनासाठी काहींची विनाअट निवड करतो हे सत्य त्यांना झुगारून द्यायचे आहे.

जेव्हा देवाने आगाऊ नेमणे या गंभीर व धन्य विषयावर स्पष्टीकरण केले जाते, त्याच्या पुत्राच्या प्रतिमेप्रमाणे होण्यासाठी देव काहींची सर्वकाळासाठी निवड करतो हे सत्य सादर केले जाते, तेव्हा तो शत्रू सैतान एखाद्या मनुष्याला वाद मांडायला पाठवतो की ही निवड देवाच्या पूर्वज्ञानावर आधारित आहे. आणि त्या "पूर्वज्ञानाचा " अर्थ ते असा सांगतात की, काही लोक इतरांपेक्षा सहज वळतील, ते पवित्र आत्म्याच्या कार्याला तत्परतेने प्रतिसाद देतील, आणि ते विश्वास ठेवतील याचे देवाला पूर्वज्ञान होते म्हणून त्यावरून त्याने तारणासाठी त्यांना आगाऊ नेमले. पण असे विधान अमूलाग्र खोटे आहे. मानव पूर्ण भ्रष्ट आहे हे सत्य ते मानत नाहीत कारण त्यांचा वाद आहे की काही मनुष्यांमध्ये काही चांगुलपण वसते. त्यामुळे यात देवाचे स्वातंत्र्य हे सत्य ते हिरावून घेतात कारण यानुसार देवाला मनुष्यामध्ये जे दिसते त्यानुसार देवाचा संकल्प *आधरित* केला जातो . यामुळे ते सर्व उलटापालट करून टाकतात, कारण काही पापी जन ख्रिस्तावर विश्वास ठेवतील याचे देवाला पूर्वज्ञान होते असे म्हणून, तारणासाठी त्याने त्यांना नेमले हे सत्याच्या विरुद्ध आहे. देवाचे वचन ठाम सांगते की त्याचे वैशिष्ट्यपूर्ण उपकार प्राप्त होण्यासाठी त्याने आपल्या सर्वोच्च

सार्वभौमत्वाने काहींना निवडून वेगळे केले (प्रे. कृ. १३:४८). म्हणून त्याने निर्धार केला की त्यांच्यावर विश्वासाच्या दानाचा वर्षाव करावा. खोटे ईश्वरविज्ञान आपण विश्वास ठेवणार असल्याचे देवाचे पूर्वज्ञान हे, आपल्या तारणासाठी होणाऱ्या निवडीचे कारण बनवते. पण खरे तर देवाने आपली निवड केली हा *मूळ हेतू* आहे व आपले ख्रिस्तावर विश्वास ठेवणे हा त्याचा *परिणाम* आहे.

**सत्य घोषित केले**

पुष्कळ गैरसमज असलेल्या या विषयावरील चर्चा पुढे चालू ठेऊ या. त्यासाठी थोडे थांबून या शब्दाची व्याख्या करू या. "पूर्वज्ञान" या शब्दाचा अर्थ काय? "अगोदरच माहीत असणे", असे उत्तर काही जण लागलीच देतील. पण आपण लागलीच या निश्कर्षाप्रत येऊ नये किंवा कोर्टात आपला दावा नेण्याप्रमाणे एखाद्या उत्तम शब्द कोशाकडे धाव घेऊ नये. कारण या शब्दाच्या वापर होतो त्याप्रमाणे व्युत्पत्तीविषयी हा मुद्दा नाही. तर त्यासाठी देवाच्या वचनात कोणत्या अर्थाने हा शब्द *वापरला* आहे याचा शोध घेणे गरजेचे आहे. पवित्र आत्मा जेव्हा एकादा शब्दप्रयोग व्यक्त करतो तेव्हा त्याची व्याख्या, अर्थ व त्याच्या वापराची व्याप्ती पण सांगतो. ह्या एका साध्या नियमाचे जबाबदारीने लागूकरण न केल्याने एवढा सारा गोंधळ व चुका होतात. पुष्कळ लोक गृहीत धरतात की देवाच्या वचनात वापरलेल्या काही शब्दांचे महत्त्व त्यांना अगोदरच माहीत आहे. मग आपले तर्क शब्दस्थलदर्शक कोशाचा वापर करून पडताळून पाहण्याविषयी ते उत्सुक नसतात. या विषयाकडे आपण थोडे विस्ताराने पाहू या

"देह" हा शब्द लक्षात घ्या. त्याचा अर्थ इतका सामान्य आहे की त्यामुळे देवाच्या वचनात तो किती वेगवेगळ्या संदर्भात वापरला आहे हे पाहणे त्यांना वेळ वाया घालवणे आहे असे वाटते. घाईघाईने ते धरून चालतात की शरीराशी समानार्थाने तो शब्द वापरला आहे. म्हणून त्यावर ते चौकसपणे काहीच शोधाशोध करत नाहीत. परंतु देवाच्या वचनात अनेक वेळा "देह" हा शब्द शारीरिक अर्थाहून अधिक काही अंतर्भूत करून वापरला आहे. म्हणून त्या शब्दाचा प्रत्येक वापर लक्षात घेताना त्याचा बारकाईने तुलनात्मक अभ्यास करून व स्वतंत्रपणे त्याचा संदर्भ लक्षात घेऊन त्यात जे सर्व समाविष्ट केले आहे त्यातून योग्य अर्थ निश्चित करावा लागेल. आता दुसरा "जग" हा शब्द घ्या. बायबलचा सर्वसामान्य वाचक कल्पना करतो की हा शब्द मानवजातीसाठी वापरला आहे. त्याचा परिणाम असा होतो की तो शब्द ज्या वचनात सापडेल त्याचा चुकीचा अर्थ लावला जातो. "अविनाशिता" हा शब्द लक्षात घ्या. या शब्दासाठी नक्कीच अभ्यासाची गरज नाही! त्याचा संदर्भ जीवात्म्याच्या अविनाशीपणाशी आहे असे ते म्हणतील. अहाहा, हे माझ्या वाचका देवाच्या वचनासंदर्भात काहीही अनुमान काढणे चुकीचे व मूर्खपणाचे असते. वाचकाला जेथे कोठे "विनाशी व अविनाशी" हे शब्द आढळतील तेथे तो प्रत्येक परिच्छेद काळजीपूर्वक तपासण्याची तसदी घेतली पाहिजे. हे शब्द कदापि जीवात्म्याला नव्हे तर नेहमीच शरीरालाला लागू केलेले आहेत असे आढळेल.

जे काही "देह," "जग," "अविनाशित्व" याविषयी आपण पाहिले ते सर्व तसेच जोरकसपणे "ज्ञान" आणि पूर्नज्ञान" या शब्दांना लागू होते. या शब्दांचे साधे आकलन होईल अशी कल्पना करण्यापेक्षा इतरत्र ज्या वचनात ते शब्द वापरले आहेत त्यानुसार ते काळजीपूर्वक विचारात घेण्याची गरज आहे. "पूर्वज्ञान" हा शब्द जुन्या करारात आढळत नाही. पण "ओळखणे" हा शब्द वारंवार आढळतो. जेव्हा या शब्दाचा संबंध देवाशी जोडलेला असतो, तेव्हा तो अनुग्रह करण्यासंदर्भात वापरलेला असतो. केवळ माहिती असणे एवढ्याच अर्थापुरता मर्यादित वापरलेला नसतो, तर समोरील विषयावरील *प्रेमाच्या दृष्टिकोनातून* वापरलेला असतो. "मी तुला व्यक्तिश: नावाने ओळखत आहे" (निर्गम ३३:१७). "तुमचा *माझा परिचय झाला* त्या दिवसापासून तुम्ही

परमेश्वराविरुद्ध बंडच करीत आला आहा" (अनुवाद ९:२४). "मी तुला गर्भाशयात घडले त्यापूर्वी तू *मला ठाऊक होतास*" (यिर्मया १:५). "त्यांनी राजे नेमले पण माझ्या विचाराने नेमले नाहीत" (होशेय ८:४). "भूतलावरील सर्व कुळांत मी केवळ तुमच्याबरोबरच परिचय केला" (आमोस ३:२). या सर्व शास्त्रवचनात "ओळखणे" याचे महत्त्व *प्रेम केले* किंवा *नेमले* याद्वारे दाखवले आहे.

त्याचप्रमाणे "ओळखणे" हा शब्दप्रयोग जुन्या कराराप्रमाणेच नव्या करारातही वारंवार वापरला आहे. "तेव्हा मी त्यांना स्पष्ट सांगेन की, *मला तुमची कधीच ओळख नव्हती*" (मत्तय ७:२३). "मी उत्तम मेंढपाळ आहे; — जे माझे आहेत त्यांना मी ओळखतो व जे माझे आहेत ते मला ओळखतात" (योहान १०:१४). "जर कोणी देवावर प्रीती करीत असेल तर देवाला त्याची *ओळख* झाली आहे" (१ करिंथ ८:३). "प्रभू आपले जे आहेत त्यांना *ओळखतो*" (२ तीमथ्य २:१९).

**पूर्वज्ञानाची व्याख्या**
नव्या करारात "पूर्वज्ञान" या शब्दाचा वापर केवळ "ओळखणे" या साध्या अर्थापेक्षा अधिक वेगळ्या प्रकारे वापरला आहे. जेथे जेथे या शब्दाचा वापर केला आहे त्या प्रत्येक वचनाचा काळजीपूर्वक अभ्यास केल्यास असा शोध लागेल की तो अशा वादाचा मुद्दा होऊ शकतो की त्याचा संबंध घटनेच्या आकलनाशी आहे की अजून घडायच्या आहेत अशा घटनांशी आहे. सत्य हे आहे की "पूर्वज्ञान" या शब्दाचा वापर देवाच्या वचनात कधीही *घटना* किंवा कृतींसंदर्भात केलेला नसून नेहमीच त्याचा संबंध *व्यक्तींशी* आहे. देव त्या व्यक्तींना ओळखत होता त्यांच्या कृतींना नव्हे. त्याच्या पुराव्यासाठी आपण ज्या वचनांमध्ये हा शब्दप्रयोग आढळतो, तो प्रत्येक संदर्भ पाहू.

पहिला उल्लेख प्रे. कृ. २:२३ मध्ये आला आहे. तेथे आपण वाचतो, "तो देवाच्या ठाम संकल्पानुसार व पूर्वज्ञानानुसार तुमच्या स्वाधीन झाल्यावर तुम्ही त्याला धरून अधर्म्यांच्या हातांनी वधस्तंभावर खिळून मारले (प्रे. कृ. २:२३). जर या वचनाच्या शब्दरचनेकडे काळजीपूर्वक पाहिले तर प्रेषित येथे वधस्तंभी खिळण्याच्या कृतीच्या पूर्वज्ञानाविषयी बोलत नसून खिळल्या गेलेल्या *व्यक्तिसंदर्भात* बोलत आहे. "त्याला (ख्रिस्ताला) "धरून अधर्म्यांच्या हातांनी..."

दुसरा उल्लेख रोम ८:२९-३० मध्ये आहे. "कारण ज्यांच्याविषयी त्याला पूर्वज्ञान होते, त्यांनी आपल्या पुत्राच्या प्रतिमेप्रमाणे बनावे म्हणून त्याने त्यांना आगाऊच नेमून ठेवले, ह्यात हेतू हा की तो पुष्कळ बंधुजनांत श्रेष्ठ असा व्हावा. ज्यांना त्याने आगाऊ नेमून ठेवले त्यांना त्याने पाचारणही केले" जे सर्वनाम येथे वापरण्यात आले आहे त्यावर नीट विचार करा. येथे त्याला *कशाविषयीचे* पूर्वज्ञान होते असे नव्हे तर त्याला *ज्यांच्याविषयी* पूर्वज्ञान होते हे प्रकर्षाने मांडले आहे. त्यांच्या इच्छा समर्पित करण्याविषयी नव्हे, त्यांच्या अंत:करणाने विश्वास ठेवण्याविषयी नव्हे तर त्या व्यक्ती ज्या त्याच्यासमोर होत्या, त्यांच्याविषयी बोलले गेले आहे.

" देवाला ज्यांच्याविषयी पूर्वज्ञान होते, त्या आपल्या लोकांना त्याने टाकले नाही" — (रोम ११:२). पुन्हा हा संदर्भ केवळ व्यक्तींशी आणि व्यक्तींशीच आहे.

अखेरचा उल्लेख १ पेत्र १:२ मध्ये आहे: "देवपित्याच्या पूर्वज्ञानानुसार निवडलेले" देवाच्या पूर्वज्ञानानुसार निवडलेले *कोण* आहेत? त्याचा संदर्भ मागील वचनाशी आहे; ते आहेत "पांगलेले

प्रवासी". पांगापांग झालेले विश्वासणारे यहूदी. अशा प्रकारे पूर्वज्ञान व्यक्तींचे आहे, त्यांच्या कृत्यांचे पूर्वज्ञान नव्हे.

आता या शास्त्रभागांच्या दृष्टिकोनातून (आणखी शास्त्रभाग नाहीत) पाहू या की *बायबलमधील कोणत्या पार्श्वभूमीवर* काही लोक म्हणतात की देवाला काही व्यक्तींच्या *कृत्यांचे* म्हणजे त्यांच्या "पश्चात्तापाविषयीचे व विश्वास ठेवण्याविषयीचे" पूर्वज्ञान होते? आणि या कृत्यांमुळे त्याने तारणासाठी त्यांना निवडले? त्याचे उत्तर आहे असे मुळीच काहीही नाही. देवाचे वचन असे कोठेही बोलत नाही की देवाला त्यांचा पश्चात्ताप व विश्वास याचे आगाऊ ज्ञान किंवा पूर्वज्ञान होते. त्याला हे नक्कीच युगारंभापूर्वी माहीत होते की *काही लोक* पश्चात्ताप करतील व विश्वास ठेवतील. पण देवाच्या पूर्वज्ञानाचे हे उद्दिष्ट होते असा देवाच्या वरील वचनांचा संदर्भ नाही. या सर्व वचनांच्या संदर्भात एक साचेबद्धता दिसते की देवाला त्या *व्यक्तींचे* पूर्वज्ञान होते. तर मग "त्या सुवचनांचा नमुना...दृढ राखा" (२ तीमथ्य १:१३).

दुसऱ्या एका महत्त्वाच्या गोष्टीकडे आम्ही विशेष लक्ष वेधू इच्छितो की वरीलपैकी पहिली दोन वचने स्पष्टपणे दर्शवतात व पूर्णपणे शिकवतात की देवाचे पूर्वज्ञान *कारणदर्शक नाही*. तर उलट त्याच्या आधी त्यामागे दुसरेच काहीतरी आहे. आणि ते काहीतरी म्हणजे त्याचा सार्वभौम संकल्प किंवा निर्णय. १) "ठाम संकल्पानुसार (२) देवाच्या पूर्वज्ञानानुसार, तुमच्या हाती दिल्यावर" (प्रे. कृ. २:२३). त्याचा संकल्प किंवा निर्णय त्याच्या पूर्वज्ञानाची पार्श्वभूमी होती; असेच रोम ८:२९ विषयी आहे. ते वचन "कारण" या शब्दाने सुरू होते. याचा अर्थ त्याचा संदर्भ त्यामागील वचनाशी आहे. मग मागील वचन काय म्हणते? "देवावर प्रीती करणाऱ्यांस म्हणजे त्याच्या संकल्पाप्रमाणे बोलावलेल्यांस." अशा प्रकारे देवाचे पूर्वज्ञान त्याच्या संकल्पावर किंवा निर्णयावर *आधारित असते* (स्तोत्र २:७ वाचा).

देवाला पुढे काय *होणार* हे माहीत असते कारण पुढे *काय व्हावे* याविषयी त्याने संकल्प केलेला असतो. म्हणून देवाच्या वचनाचा क्रम बदलून उलटा करणे हे घोड्याच्या पुढे गाडी जुंपण्यासारखे आहे. असे म्हणणे की देव निवड करतो कारण त्याला लोकांविषयी ज्ञान असते. सत्य हे आहे की, त्याला पूर्वज्ञान असते, कारण त्याने निवड केली आहे. यामुळे बाहेरून, मानवप्राण्याकडून निवडीचे कारण घडते ही पार्श्वभूमी दूर होते, आणि ते देवाच्या स्वत:च्या सार्वभौम इच्छेत जागा घेते. काही लोकांची निवड करणे हा संकल्प देवाचा होता. त्यांच्याठायी काही चांगले आहे किंवा होणार आहे म्हणून नव्हे. प्रत्यक्षात किंवा पूर्वज्ञानाने, पण फक्त देवाच्या स्वसंकल्पानेच त्यांची निवड झाली आहे. त्याने काहींची निवड *का* केली, ते आपण सांगू शकत नाही. फक्त एवढेच म्हणू शकतो की "तरीही हे पित्या हे *तुझ्या* दृष्टीला योग्य दिसले." रोम ८:२९ मध्ये एक साधे सत्य आहे की जगाच्या स्थापनेपूर्वी काही पाप्यांना निवडून वेगळे केले व तारणासाठी त्यांना नेमले (२ थेस्सलनी २:१३,१४). रोम ८:२९ या वचनाच्या समारोपात हे स्पष्ट केले आहे की :- "देवाने तुम्हांस प्रारंभापासून त्याच्या पुत्राच्या प्रतिमेसारखे *व्हावे* म्हणून निवडले." ते त्याच्या प्रतिमेचे होते, त्यांचे देवाला पूर्वज्ञान होते म्हणून देवाने त्यांना नेमले नाही; तर उलट "ज्यांचे त्याला पूर्वज्ञान (म्हणजे ज्यांच्यावर प्रेम केले व निवडले) होते, त्यांना त्याने "त्याच्या प्रतिमेसारखे होण्यासाठी" नेमले. त्यांनी" ख्रिस्ताच्या प्रतिमेचे होणे" हे कारण नसून तो देवाच्या पूर्वज्ञानाचा व नेमण्याचा परिणाम आहे.

देवाने कोणाही पाप्याची निवड त्याला पूर्वज्ञान होते की तो विश्वास ठेवील म्हणून केली नाही. याचे साधे सरळ व पुरेसे कारण हे आहे की जसे देवाने दृष्टी दिल्याशिवाय मानव पाहू शकत नाही तसे

देवाने विश्वास दिल्याशिवाय मानव कदापि  विश्वास ठेऊ शकत नाही. दृष्टी हे देवाचे दान आहे, तर पाहणे हा त्या दानाचा वापर करण्याचा परिणाम आहे. तसेच विश्वास ठेवणे हे देवाचे दान आहे (इफिस २:८-९). विश्वास हा मी त्या दानाचा वापर करण्याचा परिणाम आहे. जर काही लोक योग्य वेळी विश्वास ठेवतील *म्हणून* तारण होण्यासाठी देवाने त्यांना निवडले, तर विश्वास ठेवण्याच्या *कृतीचे श्रेय* लोक घेतील, आणि त्या घटनेत तारलेल्या पाप्याला "बढाई" मारायला कारण मिळेल आणि वचन तर असे घडणे नाकारते (इफिस २:९).

विश्वास ठेवणे हे श्रेय घेण्याचे कृत्य *नाही* असे देवाचे वचन नक्कीच शिकवते. ते ठामपणे स्पष्ट करते की ख्रिस्ती विश्वासी जन "*कृपेद्वारे* विश्वास ठेवणारे आहेत" (प्रे. कृ. १८:२७). जर त्यांनी कृपेने विश्वास ठेवला आहे तर त्या विश्वास ठेवण्यात श्रेय घेण्यासारखे काहीही नाही. आणि जर श्रेय घेण्यासारखे काही नाही तर ते निवड करण्यासाठी देवाला उद्युक्त करण्याचे कारणही होऊ शकत नाही. अगदी मुळीच नाही. आपल्यामध्ये जे आहे तेथून देवाच्या निवडीचा उगम होत नाही, किंवा आपल्यापासूनही होत नाही तर केवळ त्याच्या सार्वभौम इच्छेतून होतो. पुन्हा एकदा रोम ११:५ मध्ये "कृपेच्या निवडीप्रमाणे शेष राहिलेले" असा शब्दप्रयोग आपण वाचतो. तेथे अगदी स्पष्ट दिले आहे की निवड *कृपेने* आहे. आणि कृपा म्हणजे *अपात्र असताना* केलेली मेहेरबानी होय. अशी गोष्ट की जिच्यासाठी आपण देवाजवळ कसलाही दावा करू शकत नाही.

या सर्व विवेचनावरून आढळून येते की देवाच्या पूर्वज्ञानाविषयी आपला दृष्टिकोन आत्मिक व सुस्पष्ट असणे अतिशय महत्त्वाचे आहे. त्याविषयी चुकीच्या कल्पनांचे विचार आपल्याला देवाचा अनादर करण्याकडे घेऊन जातील हे अटळ आहे. दैवी पूर्वज्ञानाविषयीच्या लोकप्रिय कल्पना सर्वतोपरी अपुऱ्या आहेत. देवाला आरंभापासूनच शेवट माहीत होता एवढेच नव्हे तर त्याने सर्व काही प्रारंभापासूनच योजले, निर्धारित  किंवा नक्की केले व नेमून ठेवले. कारण परिणाम करण्यासाठी सिद्ध होते, यासाठी की देवाचा हेतू त्याच्या भावी पूर्वज्ञानाच्या पार्श्वभूमीवर सिद्ध व्हावा. मग वाचक जर खरा ख्रिस्ती असेल तर तो ख्रिस्ती आहे कारण देवाने त्याला ख्रिस्तामध्ये पृथ्वीचा पाया घालण्यापूर्वी निवडले आहे (इफिस १:४), आणि तेही तुम्ही विश्वास *ठेवाल* अशा पूर्वज्ञानावरून तुम्हाला निवडले नाही तर केवळ तुमची निवड करावे असे त्याच्या इच्छेला आले म्हणून तुम्हाला निवडले. तुमचा स्वाभाविक अविश्वास तग धरून राहू शकणार नाही म्हणून निवडले नाही.  यामुळे *सर्व* गौरव व स्तुती फक्त त्याचीच आहे. तुम्हाला श्रेय घेता येण्यासारखी पार्श्वभूमीच नाही. तुमच्यावर "*कृपेद्वारेच* तुम्ही *विश्वास ठेवला*." (प्रे. कृ. १८:२७). तेही तुमची "कृपेने निवड "झाली म्हणून तुम्ही विश्वास ठेवला.

# प्रकरण ५

# देवाचा सर्वाधिकार

## बहुतेकांना त्याची ओळखच नाही.

इरॅस्मसला लिहिलेल्या एका पत्रात लूथर म्हणतो, "तुझे देवाविषयीचे विचार फार मानवी आहेत." कदाचित त्या कानउघाडणीला त्या विद्वानाने प्रतिकार केला असेल कारण एका क्षुल्लक व्यक्तिच्या मुलाकडून ती कानउघडणी झाली होती, एवढेच नव्हे तर त्याच्यासाठी ती योग्यच होती. ऱ्हासाला चाललेल्या या युगात आपल्याला जरी धर्मपुढाऱ्यांमध्ये स्थान नसले तरी आपल्या काळातील बहुसंख्य उपदेशकांना, तसेच जे स्वत: देवाच्या वचनातून शोध न घेता आळशीपणे कोणाचीही काहीही शिकवण स्वीकारतात अशांना हा आरोप लागू पडतो. जवळजवळ सर्वत्र सर्वसमर्थाचे राज्य व राजवटीविषयी अत्यंत अपमानकारक व नीच पातळीवरील संकल्पना हल्ली आढळतात. ख्रिस्ती असल्याचा उघडपणे टेंभा मिरवणाऱ्या हजारो हजारांना वचनामधील देवाशी अजिबात ओळख नाही.

प्राचीन धर्मभ्रष्ट इस्राएलांविषयी देवाने तक्रार केली होती, "मी तुझ्यासारखाच आहे असे तुला वाटले" (स्तोत्र ५०:२१). आजच्या ख्रिस्ती प्रजेविषयीही देवाचा हाच लेखी आरोप असेल. लोक कल्पना करतात की प्रत्यक्ष तत्त्वांनी प्रवृत्त न होता परात्पर देव भावनांनी हेलावतो. त्यांना वाटते की देवाचे सर्वोपस्थित असणे ही इतकी काल्पनिक गोष्ट आहे की सैतान त्याच्या सर्व योजना सर्व दिशांनी उधळून निष्फळ करत आहे. त्यांना वाटते की त्याने कसल्याही योजना किंवा उद्दिष्टांची आखणी केलेली नाही. त्यांना मग वाटते की तो त्यांच्यासारखाच सतत बदलत राहतो. ते उघडपणे घोषित करतात की त्याचे जे काही सामर्थ्य असेल त्याला मर्यादा घातली पाहिजे. कारण तो मानवाच्या "स्वैर इच्छेच्या" किल्ल्यावर हल्ला करून त्याला यंत्रवत् बनवतो. ज्यांना त्याने प्रत्यक्ष मुक्ती दिली अशा सर्वांसाठी त्याने केलेले गुणकारी प्रायश्चित्त ते नीच मानतात; पापाचा रोग झालेल्या जिवात्म्यांना जर तो अनुकूल वाटला तर केवळ एक उपाय म्हणून त्यांनी त्याचा वापर करावा असे समजतात; आणि पवित्र आत्मा देऊ करत असलेल्या शुभवर्तमानाचे अजिंक्य कार्य ते कमजोर लेखतात व पाप्यांच्या इच्छेला येईल तसे त्यांनी ते स्वीकारावे किंवा धिक्कारावे असे त्यांना वाटते.

विसाव्या शतकाचा "देव" सर्वोच्च सार्वभौम पवित्र बायबलशी मुळीच मिळताजुळता नाही. पवित्र बायबलच्या देवाच्या मध्यान्हाच्या तळपत्या गौरवाशी त्यांच्या मिणमिणत्या मेणबत्तीच्या अंधुक प्रकाशाची तुलनाही होऊ शकत नाही. सर्वसामान्य पुलपीटवरून ज्या "देवाविषयी" बोलले जाते, सामान्य संडेस्कूलमधून बोलले जाते, सध्याच्या बहुतेक साहित्यातून ज्याचा उल्लेख केला जातो, आणि तथाकथित बायबल परिषदांमधून जो गाजवला जातो, तो देव मानवी कल्पनांची कल्पित कथा असतो, मदद्याच्या नशेत लावलेला भावनिक शोध असतो. ख्रिस्ती जगताबाहेरचे मूर्तिपूजक काष्ठपाषाणाची "दैवते" बनवतात, तर ख्रिस्ती जगतात असलेले लक्षावधी मूर्तिपूजक आपल्या स्वत:च्या दैहिक कल्पनांमधून त्यांच्यासाठी देव बनवतात. वास्तवात ते नास्तिक आहेत, कारण एकमेव अत्युच्च देव, आणि देवच नसणे या दोन पर्यायांशिवाय आणखी पर्यायाची शक्यताच नाही. ज्यांच्या "देवाच्या" इच्छेला प्रतिबंध घातला जातो, ज्याची रचना उधळून लावली जाते, ज्याच्या

उद्दिष्टांना अडथळा आणून प्रतिबंध केला जातो, ज्याला देवत्वाचा किताब नाही, जो उपासनेसाठी आराध्य मानला जाण्याच्या पात्रतेपासून फार दूर आहे, असा हा त्यांचा देव श्रेय देण्याजोगा नव्हे तर तिरस्करणीय आहे.

## राजांचा राजा आणि प्रभूंचा प्रभू

सर्वसमर्थ निर्माता देव एकीकडे आणि अत्यंत बलशाली प्राणिमात्र दुसरीकडे असा भेद करून जिवंत व खऱ्या देवाचे श्रेष्ठत्वाबद्दल अमर्याद अंतराने वाद घालता येईल. तो कुंभार आहे तर ते केवळ त्याच्या हातातील माती आहेत. त्यातून त्याच्या इच्छेप्रमाणे मानाचे पात्र आकार घेते किंवा त्याचे फुटून तुकडे होतात (स्तोत्र २:९). जर स्वर्गातील नागरिक व पृथ्वीवरील सर्व रहिवासी यांनी एकत्र येऊन त्याच्याविरुद्ध बंड केले, तरी या घटनेने तो अस्वस्थ होणार नाही. त्याच्या सार्वकालिक व हल्ला चढवता येत नाही अशा सिंहासनावर काहीही परिणाम होणार नाही. ही गोष्ट जिब्राल्टरच्या मनोऱ्यांसारख्या खडकांवर भूमध्य समुद्राच्या लाटांचे तुषार उडण्यासारखी आहे. या परात्पर देवावर परिणाम करायला प्राणिमात्र अगदी बलहीन व पोरकट आहेत. देवाचे वचन सांगते की जेव्हा यहोवा देव व त्याचा ख्रिस्त यांना विरोध करायला विदेशी डोकी धर्मभ्रष्ट इस्राएलांशी ऐक्य करतील तेव्हा "जो सिंहासनारूढ आहे तो *हसेल*" (स्तोत्र २:४).

देवाचे श्रेष्ठत्व परिपूर्ण व विश्वव्यापी असल्याचे अगदी स्पष्ट व ठामपणे देवाच्या वचनात अनेक ठिकाणी नमूद केले आहे. "हे परमेश्वरा, महिमा, पराक्रम, शोभा, विजय व वैभव ही तुझीच; आकाशात व पृथ्वीवर जे काही आहे ते सर्व तुझेच; हे परमेश्वरा, राज्यही तुझेच; तू सर्वांहून श्रेष्ठ व उन्नत आहेस...तू सर्वांवर प्रभुत्व करतोस; सामर्थ्य व पराक्रम तुझ्याच हाती आहेत"(१ इतिहास २९:११-१२) — लक्षात घ्या असे म्हटले आहे, "प्रभुत्व करतोस" म्हणजे आता. "हजार वर्षांच्या राज्यात करील" असे म्हटलेले नाही. "हे आमच्या पूर्वजांच्या देवा, परमेश्वरा, तू स्वर्गीचा देव आहेस ना? राष्ट्रांच्या सर्व राज्यांवर तूच शास्ता आहेस ना? तुझ्या हाती एवढे सामर्थ्य व पराक्रम आहे की कोणाच्याने (खुद्द सैतानालाही) तुजसमोर टिकाव धरवत नाही (२ इतिहास २०:९). त्याच्यापुढे राष्ट्राध्यक्ष व पोप, राजे व सम्राट हे देखील टोळांसमान आहेत.

" त्याचा एकच विचार असतो, त्याला त्यापासून कोण फिरवणार? आपल्या मनास येते ते तो करतो (इयोब २३:१३). हे माझ्या वाचका, बायबलचा देव काल्पनिक गोष्टी खऱ्या मानायला लावणारा बादशहा नाहीये, केवळ काल्पनिक सार्वभौम नाहीये, तर राजांचा राजा, प्रभूंचा प्रभू आहे. "तुला सर्व काही करता येते, तुझ्या कोणत्याही योजनेला प्रतिबंध नाही" (ईयोब ४२:२) — म्हणजे तुझ्या कोणत्याही विचाराला अडथळा आणता येत नाही. किंवा कोणीतरी असे भाषांतर केले की, "तुझा संकल्प उधळून लावता येत नाही. "त्याने जे काही योजले आहे ते तो करतोच. त्याचा जो काही संकल्प असेल तो, तो पुरा करणारच. "आमचा देव स्वर्गात आहे: त्याला योग्य दिसते ते सर्व तो करतो" (स्तोत्र ११५:३). आणि ते का? कारण "परमेश्वरापुढे शहाणपण, बुद्धी व युक्ती ही मुळीच चालत नाहीत" (नीति २१:३०).

## ज्यामुळे त्याला संतोष वाटला

देवाचे त्याच्या हस्तकृतीवरील वर्चस्व स्पष्टपणे देवाच्या वचनात वर्णिले आहे. निर्जीव वस्तू, विवेकशून्य प्राणी ही सारी त्यांच्या निर्मात्याची आज्ञा पाळतात. त्याच्या इच्छेनुसार तांबडा समुद्र

दुभंगून पाणी भिंतीप्रमाणे उभे राहिले (निर्गम १४); भूमीने तोंड उघडले व बंडखोर अपराधी जिवंत असताना पृथ्वीच्या पोटात गाडले गेले (गणना १६). त्याने आज्ञा केली आणि सूर्य स्थिर राहिला (यहोशवा १०); तर दुसऱ्या प्रसंगी सूर्य मागे गेल्याने आहाजाच्या शंकुयंत्राच्या पायऱ्यांवर छाया दहा पायऱ्या *खाली उतरली* (यशया ३८:८). त्याचे श्रेष्ठत्व दर्शवताना, त्याने कावळ्यांना एलीयासाठी अन्न घेऊन पाठवले (१ राजे १७), लोखंड पाण्यावर तरंगायला भाग पाडले (२ राजे ६:५), दानीएलाला सिंहांच्या गुहेत टाकले तेव्हा त्यांना माणसाळवले, तीन इब्री तरुणांना तप्त भट्टीत टाकले तेव्हा अग्नी त्यांना जाळू शकला नाही. या प्रकारे "परमेश्वराला जे काही बरे वाटते, ते तो आकाशात व पृथ्वीवर, समुद्रात व सर्व जलाशयात करतो" (स्तोत्र १३५:६).

देवाचा सर्वाधिकार मनुष्यमात्रांच्या *इच्छेवरही* पूर्णपणे राज्य करत असल्याचे प्रदर्शित झाले आहे. वाचकाने निर्गम ३४:२४ वर मनन करावे. वर्षातून तीन वेळा सर्व इस्राएली पुरुषांना आपले घर असेल तिथून निघून यरुशलेमास जाण्याची आज्ञा होती. आपली भूमी गिळंकृत केली या जाणीवेने जे त्यांचा द्वेश करत होते अशा शत्रुंच्या मध्ये त्यांची वस्ती होती. मग या संधीचा फायदा घेण्यास कनान्यांना कोणती अडचण येणार होती? मग पुरुषांच्या गैरहजेरीत त्यांच्या स्त्रिया व मुलांची कत्तल करून त्यांची जमीन बळकावण्यात त्यांना कोणता व्यत्यय येणार होता? जर त्या दुष्टांच्या इच्छेवर सर्वसमर्थ देवाचा ताबा नसता तर "तेव्हा कोणी मनुष्य तुझ्या जमीनीचा ताबा घेणार नाही" असे अभिवचन त्याने कसे दिले असते? "राजाचे मन पाटाच्या पाण्याप्रमाणे परमेश्वराच्या हाती आहे. त्याला वाटेल तिकडे तो ते वळवतो" (नीति २१:१).

पण याला आक्षेप घेतला जाईल तो असा:- आपण देवाच्या वचनात वरचेवर वाचत नाही का की, मानवांनी देवाला अवमानले, त्याच्या इच्छेला प्रतिबंध केला, त्याच्या आज्ञांचे उल्लंघन केले, त्याच्या इशाऱ्यांचा अनादर केला आणि त्याच्या सर्व बोधांकडे कानाडोळा केला? हो आपण असे नक्कीच वाचतो. मग वर जे काही आपण म्हणालो, त्या सर्वावर त्यामुळे पाणी पडते का? असे जर झाले तर बायबल स्वत:शीच विसंगत आहे असे म्हणावे लागेल. पण असे तर होऊच शकत नाही. येथे आक्षेप घेणारा काय करत आहे, तर मानवाच्या दुष्टतेविरुद्ध देवाचे *उघड* वचन एवढाच संदर्भ लक्षात घेत आहे. आपण वर काय मुद्दा मांडला आहे, की देवाचा *स्वत:मध्ये संकल्प* झाला आहे. त्याने आपल्याला आचारांसाठी नियम लावून दिले आहेत. ते आपण कोणीच काटेकोरपणे पाळत नाही. पण त्याचे सनातन "संकल्प" मात्र काटेकोरपणे सिद्धिस जातात.

नव्या करारातही देवाचे श्रेष्ठत्व एकमेव व विश्वव्यापी असल्याचे तितक्याच स्पष्ट व सकारात्मकतेने सांगितले आहे. तेथे म्हटले आहे की, "आपल्या मनाच्या संकल्पाप्रमाणे तो *अवघे* चालवतो" (इफिस १:११) — ग्रीकमध्ये "अवघे *चालवतो*," याचा अर्थ "अगदी परिणामकारकपणे" असा होतो. म्हणूनच आपण वाचतो, "सर्व काही त्याच्याचपासून, त्याच्याच द्वारे व त्याच्याच प्रीत्यर्थ आहे. त्याला युगानुयुग गौरव असो; आमेन" (रोम ११:३६). लोकांना कितीही वाटले की आपल्याला स्वतंत्र इच्छा असून आपण मुक्त आहोत, आणि आपल्या इच्छेस येईल ते करण्याचे आपल्याला स्वातंत्र्य आहे, तरी वचन म्हणते की जे बढाई मारतात, "आपण उद्या अमुक एका शहरी जाऊ, तेथे एक वर्ष घालवू, आणि व्यापारात कमाई करू...असे न म्हणता, प्रभूची इच्छा असेल तर आपण जगू व अमुक अमुक करू असे म्हणा" (याकोब ४:१३,१५).

अंत:करणाच्या विसाव्याची खात्रीची जागा येथेच आहे. आपली जीवने अंध भवितव्याची निर्मिती नाहीत किंवा लहरी परिणामांची संधी नाही; तर त्याचा प्रत्येक तपशील युगारंभापूर्वीपासून निश्चित करण्यात आला आहे, आणि आता राज्य करणाऱ्या जिवंत देवाकडून ते शिस्तबद्धतेने चालवले

जात आहे. त्याच्या परवानगीशिवाय आपल्या केसालाही धक्का लागू शकत नाही. "मनुष्याचे मन मार्ग योजते, पण परमेश्वर त्याच्या *पावलांस मार्ग दाखवतो*" (नीतिसूत्रे १६:९). *खऱ्या ख्रिस्ती व्यक्तीला यातून किती बल, केवढे समाधान प्राप्त व्हायला हवे!* "माझे दिवस तुझ्या हाती आहेत" (नीतिसूत्रे ३१:१५). मग मी "परमेश्वराच्या अधीन होऊन स्वस्थ राहावे, त्याची प्रतीक्षा शांतपणे करत राहावी" (स्तोत्र ३७:७).

# प्रकरण ६

# देवाचे सार्वभौमत्व

## देवाच्या सार्वभौमत्वाची व्याख्या

देवाच्या सार्वभौमत्वाची व्याख्या त्याच्या श्रेष्ठत्वाचे कार्य असे करता येईल — मागचे प्रकरण पाहा. अत्युच्च प्राणिमात्रापेक्षाही अमर्याद ऊंच असल्याने तो अत्युच्च आहे; स्वर्ग आणि पृथ्वीचा तो प्रभू आहे. तो कोणाच्याही अधीन नाही, कोणाचाही त्याच्यावर प्रभाव नाही, तो पूर्णपणे स्वतंत्र आहे, देव त्याच्या इच्छेला येईल ते करतो, केवळ त्याच्या इच्छेला येईल तेच. त्याची कोणी दटावून कानउघडणी करू शकत नाही, की त्याला अडथळा आणू शकत नाही. तो स्वत:च्या शब्दांत स्पष्ट जाहीर करतो: "माझा संकल्प सिद्धिस जाईल, माझा मनोरथ मी पूर्ण करीन" (यशया ४६:१०). पृथ्वीवरील सर्व रहिवासी केवळ क:पदार्थ होत, तो आकाशातील आपल्या सैन्याचे व पृथ्वीवरील रहिवाश्यांचे इच्छेस येईल ते करतो. तू असे काय करतोस, असे त्याचा हात धरून कोणाच्याने त्याला म्हणवत नाही" (दानीएल ४:३५). दैवी सार्वभौमत्व म्हणजे देव हा वास्तवात देव आहे, तसेच त्याला नाव आहे, तो विश्वाच्या सिंहासनावर विराजमान आहे, सर्व गोष्टींना मार्ग दाखवत आहे, "त्याच्या मनाच्या संकल्पाप्रमाणे अवघे" चालवत आहे (इफिस १:११).

मत्तय २०:१५ वरील संदेशात स्वर्गवासी चार्ल्स हेडन स्पर्जन म्हणतात ते बरोबर आहे —

> "देवाच्या मुलांसाठी देवाचे सार्वभौमत्व या गुणविशेषाइतके सांत्वनदायी दुसरे वैशिष्ट्य नाही. अत्यंत प्रतिकूल परिस्थिती आली असता, अत्यंत गंभीर संकटे आली असताही त्यांचा विश्वास असतो की देवाच्या सार्वभौमत्वाने तीसंकटे नियोजित केली आहेत, त्या सार्वभौमत्वाचे त्यांच्यावर नियंत्रण आहे आणि ते सार्वभौमत्वच ती संकटे पवित्र करील. त्याची मुले इतर कशापेक्षाही संपूर्ण निर्मितीवर त्याची मालकी आहे हा सिध्दांतच अधिक आस्थेने प्रतिपादन करतात — म्हणजे त्याच्या स्वहस्ताच्या सर्व कार्यावर त्याचे अधिराज्य आहे — म्हणजे राजासन देवाचे आहे, व त्यावर बसण्याचा हक्कही त्याचाच आहे.
>
> दुसरी बाजू पाहावी तर जगिक लोकांकडून हाच सिद्धांत अधिक द्वेष्य मानला जातो. हे महान, मती गुंग करणारे विशाल, शिवाय अत्यंत खात्रीलायक असे यहोवाच्या सार्वभौमत्वाच्या सिद्धांताचे सत्य सर्वाधिक लाथाडले गेले आहे. लोक देवाला त्याच्या सिंहासनाशिवाय इतरत्र कोठेही बसण्याची मुभा देतील. ते देवाला त्याच्या कारखान्यात बसून जग सुशोभित करायची आणि तारे बनवण्याची परवानगी देतील. आपल्या समाजकार्याच्या कार्यालयात बसून दान वाटप करायची आणि आपल्या वैपुल्यातून त्याचा वर्षाव करण्याची त्याला मुभा देतील. पृथ्वीचे संगोपन करण्याची व तिच्या स्तंभांना आधार देण्याची मोकळीक देतील, किंवा आकाशातील दीप उजळण्यास, किंवा समुद्राच्या सतत अस्थिर असणाऱ्या लाटांवर अधिराज्य चालवू देतील; पण जेव्हा देव सिंहासनारूढ होतो, तेव्हा त्याची निर्मिती दात ओठ खाऊन उठते.

आणि आम्ही तर सिंहासनावर बसलेला देव, आणि त्याला त्याच्या इच्छेप्रमाणे करण्याचा असलेला हक्क, त्याला बरे वाटते त्याप्रमाणे त्याच्या प्राणिमात्रांचा सल्ला न घेता तो त्यांची व्यवस्था लावू शकतो, याविषयी घोषणा करतो, तेव्हा आमच्यावर फुत्कार टाकले जातात व आमचा तिरस्कार केला जातो. मग लोक आमच्या म्हणण्याकडे कानाडोळा करतात कारण सिंहासनावर बसलेला देव त्यांना आवडत नाही. पण आम्हाला तर सिंहासनावर बसलेला देवच गाजवायला आवडते. ह्या सिंहासनावर बसलेल्या देवावरच आम्ही विश्वास ठेवतो."

" परमेश्वराला जे काही बरे वाटते, ते तो आकाशात व पृथ्वीवर, समुद्रात व सर्व जलाशयात करतो" (स्तोत्र १३५:६). होय हे प्रिय वाचका, बायबलमध्ये प्रकट केलेल्या साम्राज्याचा सत्ताधीश हा त्याच्या सर्व वैभवात अतुल्य, सामर्थ्यात अमर्याद, बाहेरून त्याच्यावर कसलाही परिणाम होऊ न शकणारा असा आहे. पण आपण अशा युगात राहातो की जेथे अत्यंत सनातन मतवादीही देवाचे देवपण योग्य प्रकारे मान्य करायला घाबरतात. ते म्हणतात की देवाच्या सार्वभौमत्वावर जोर दिल्यास माणसाची जबाबदारी राहत नाही. पण खरे पाहिले तर मानवाची जबाबदारी दैवी सार्वभौमत्वावर आधारलेली आहे, व ती त्याचे फलित आहे.

## मानवी जबाबदारी आणि दैवी सार्वभौमत्व

"आमचा देव स्वर्गात आहे; त्याला योग्य दिसते ते सर्व तो करतो" (स्तोत्र ११५:३). त्याने सार्वभौमत्वाने त्याच्या प्रत्येक प्राणिमात्रासाठी त्याच्या दृष्टीस योग्य वाटेल अशा ठिकाणी रोवले. त्याने देवदूतांची निर्मिती केली: काहींना त्याने अट घालून रोवले तर काहींना सतत त्याच्यासमोर उभे राहायचे स्थान दिले, त्यात कधी बदल होणार नाही (१ तीमथ्य ५:२१); ख्रिस्ताला त्यांचे मस्तक केले (कलसै २:१०). याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही की ज्या देवदुतांनी पाप केले (२ पेत्र २:४), ते दूत ज्यांनी पाप केले नाही त्यांच्याप्रमाणेच देवाची निर्मिती होते. तरी ते पतन *पावतील* याचे देवाला पूर्वज्ञान होते. तरी त्यांनाही देवाने त्यांना अट घालून, प्राणिमात्राचे अस्थिर स्थान दिले व त्यांचे पतन होऊ दिले, तरीही तो त्यांच्या पापांचा उत्पादक नव्हता.

तसेच देवाने *सार्वभौमत्वाने* आदामाला एदेन बागेत *अट घालून* ठेवले. हा त्याचा संकल्प होता. तो त्याला अट न घालताही ठेऊ शकत होता. पतन न झालेल्या देवदुतांसारखे स्थिर ठिकाणी तो त्याला रोवू शकत होता. ख्रिस्तामध्ये त्याच्या संताना जे खात्रीलायक न बदलणारे स्थान आहे तेथे तो त्याचे पाय रोवू शकत होता; पण त्याऐवजी प्राणिमात्रांच्या जबाबदारीची मूळ जागा जी एदेन बाग, तेथे त्याचे पाय रोवणे त्याने पसंत केले. त्यामुळे त्याच्या प्रमाणानुसार तो स्थिर उभा राहणार होता किंवा त्याची जबाबदारी पूर्ण करणार नव्हता. — त्याने आपल्या मालकाची आज्ञा पाळणे ही त्याची जबाबदारी होती. आदामाला त्याच्या निर्मात्याने जी आज्ञा दिली होती त्यासाठी आदाम जबाबदार होता. येथे जबाबदारी होती, अपाय न करणारी जबाबदारी होती, अत्यंत अनुकूल परिस्थितीत त्याची परीक्षा करण्यात आली.

आता देवाने आदामाला प्राणिमात्राच्या जबाबदारीने अट घालून रोवले, याचे कारण त्याला त्याने तेथे ठेवणे योग्य होते म्हणून नव्हे. मुळीच नाही. तर ते योग्य होते कारण देवाने ते केले म्हणून. देवाने प्राणिमात्र अस्तित्वात आणले ते त्याने करणे योग्य होते म्हणून नव्हे किंवा त्यांची निर्मिती करण्याचे त्याला बंधनकारक होते म्हणूनही नव्हे तर त्याने ते निर्माण केले म्हणून ते योग्य होते. देव सार्वभौम

आहे. त्याची इच्छा सर्वोच्च आहे. "हक्कांच्या" नियमांच्या अधीन देवाने असणे दूरच. तो स्वत:च विधिनियम आहे. त्यामुळे तो जे काही करतो *ते योग्यच असते*. जे त्याच्या सार्वभौमत्वावर प्रश्न करतात त्यांना धिक्कार असो. "जो आपल्या उत्पन्नकर्त्याशी वाद घालतो त्याला धिक्कार असो! तो मातीच्या खापऱ्यांपैकी एक आहे. तू काय करतोस असे माती आपल्या घडणाऱ्याला म्हणेल काय?" (यशया ४५:९).

पुन्हा हे पाहा की देवाने आपल्या सार्वभौमत्वाने इस्राएलांना काही *अटींवर* रोवले. निर्गम १९, २० व २४ हे अध्याय या गोष्टीचे पूर्ण व स्पष्ट पुरावे देतात. त्यांना कर्मांच्या कराराखाली नेमण्यात आले होते. देवाने त्यांना काही नियम दिले होते, आणि त्याच्या विधिनियमांचे पालन करण्यावर त्यांच्यासाठी राष्ट्रीय आशीर्वाद ठेवले होते. पण इस्राएल लोक ताठ मानेचे व अंत:करणाची सुंता न झालेले होते. त्यांनी यहोवाविरुद्ध बंड केले, त्याच्या नियमशास्त्राचा त्याग केला, खोट्या दैवतांकडे वळले व धर्मभ्रष्ट झाले. त्याचा परिणाम असा झाला की त्यांच्यावर न्याय आला, त्यांना त्यांच्या शत्रूंच्या हाती देण्यात आले, ते सबंध जगभर पांगले गेले, आणि आजवर त्यांच्यासाठी देवाची नापसंती आहे.

सैतान व त्याच्या दुतांना, आदामाला व इस्राएलांनाही त्यांच्या त्यांच्या *जबाबदारी* नुसारच देवाच्या सार्वभौमत्वाद्वारे त्यांची त्यांची जागा देण्यात आली आहे. पण त्याचे सार्वभौमत्व प्राणिमात्रांची जबाबदारी मुळीच काढून घेत नाही. त्याने त्यांना विशिष्ट अटी घालून तेथे ठेवले ही कृती आणि ज्या जबाबदाऱ्या त्याला त्यांच्यासाठी योग्य वाटल्या त्याद्वारेच तो सर्वांचा देव आहे हे दिसून येते. अशा प्रकारे देवाचे सार्वभौमत्व आणि प्राणिमात्रांची जबाबदारी या दोहोत परिपूर्ण मिलाफ असल्याचे आढळते. पुष्कळांनी मूर्खपणे विधान केले आहे की कोठे दैवी सार्वभौमत्व संपते व कोठे मानवाची जबाबदारी सुरू होते हे दाखवून देणे अवघड आहे. प्राणिमात्रांची जबाबदारी येथे सुरू होते: निर्मात्याने सार्वभौमतेने नेमण्यामध्ये. आणि त्याच्या सार्वभौमत्वाच्या संपण्याविषयी म्हणाल तर त्याच्या सार्वभौमत्वाला मुळी "अंतच" नाही आणि नसणार.

प्राणिमात्रांची जबाबदारी देवाच्या सार्वभौमत्वावर आधारलेली आहे याविषयी काही पुरावे देऊ या. किती गोष्टींची देवाच्या वचनात नोंद आहे की देवाने *आज्ञा* दिल्यामुळे त्या घडल्या हे योग्यच होते आणि त्याने तशी आज्ञा दिली नसती तर जे योग्य ते घडले नसते! एदेन बागेतील झाडांची फळे खाण्याचा आदामाला काय हक्क होता? तर निर्माणकर्त्याची परवानगी (उत्पत्ती २:१६), त्याशिवाय तो चोर ठरला असता! मिसरी लोकांकडून दागदागिने व कपडे उसने घेण्याचा इस्राएलांना काय अधिकार होता (निर्गम १२:३५)? यहोवाने परवानगी दिल्याखेरीज कोणताच अधिकार नव्हता. सर्व कनान्यांना ठार करण्याचा इस्राएलांना काय अधिकार होता? देवाने तशी आज्ञा दिल्याखेरीज कोणताच अधिकार नव्हता. पत्निने आपल्या अधीन राहावे अशी अपेक्षा करण्याचा पतींना काय अधिकार आहे? देवाने ते नेमून दिल्याशिवाय मुळीच नाही. असे पुष्कळ दाखवून देता येईल. मानवाची जबाबदारी दैवी सार्वभौमत्वावर *आधारित* आहे.

देवाच्या पूर्ण शुद्ध व अमर्याद सार्वभौमत्वाच्या कृतीचे आणखी एक उदाहरण पाहू. आदाम किंवा इस्राएल यांच्यापेक्षा देवाने आपल्या निवडलेल्यांचे पाय *निराळ्या* प्रकारे रोवले. त्याने आपल्या निवडलेल्यांना कोणत्याही *अटीशिवाय* रोवले. सार्वकालिक करारात ख्रिस्ताला मस्तक म्हणून नेमले. त्याने स्वत:वर जबाबदारी घेतली व परिपूर्ण, सार्वकालिक व हिरावून घेता येणार नाही असे नीतिमत्त्व त्यांना बहाल केले. ख्रिस्ताला अट घालून नेमले गेले. " कारण जे नियमशास्त्राधीन आहेत त्यांना मुक्ती देण्याकरता तो नियमशास्त्राधीन झाला." पण त्यात अमर्याद फरक होता. इतर सर्व

अपयशी झाले, ख्रिस्त झाला नाही व होऊ शकलाही नसता. आणि ख्रिस्ताला तेथे अट घालून *कोणी* रोवले? त्र्येक देवाने. त्याने सार्वभौम इच्छेने त्याची नेमणूक केली. सार्वभौम प्रीतीने त्याला पाठवले. सार्वभौम अधिकाराने त्याला हे काम नेमून दिले.

या मध्यस्थासमोर काही अटी ठेवण्यात आल्या होत्या. त्याला पापाच्या देहासमान व्हायचे होते. त्याने नियमशास्त्र उंचावून ते आदरणीय करायचे होते. त्याने देवाच्या सर्व लोकांचे पाप स्वत:च्या देहाने खांबावर वाहून न्यायचे होते. त्यांच्यासाठी त्याने पूर्ण प्रायश्चित्त करायचे होते. त्याने देवाने ओतलेला सर्व क्रोध सहन करायचा होता. त्याने मरायचे होते आणि पुरले जायचे होते. या सर्व अटींची पूर्तता केल्यावर त्याला प्रतिफळाचे अभिवचन देण्यात आले होते: यशया ५३:१०-१२. तो पुष्कळ बंधुजनांमध्ये प्रथमफळ असणार होता. त्याच्या गौरवाचे वाटेकरी होणारे लोक त्याला प्राप्त होणार होते. त्याच्या नामाला सदासर्वदा गौरव असो; त्याने या अटी पाळल्या. आणि त्याने हे सर्व केल्यामुळे पिताही आपल्या शपथवार दिलेल्या गंभीर वचनाला जागतो. त्यानुसार त्याचा पुत्र मध्यस्थ होण्यासाठी ज्यांच्याकरता देहधारी झाला त्या प्रत्येकाला अनंतकाळापर्यंत राखून तो आशीर्वादित करणार. त्याने त्यांची जागा घेतली म्हणून आता ते त्याच्या जागेचे वाटेकरी होतात. त्याचे नीतिमत्व त्यांचे आहे. त्याचे देवासमोर उभे असणे त्यांचे आहे. त्याचे जीवन त्यांचे आहे. त्यांनी एकाही अटीची परिपूर्ती करायची नाही. अनंतकालिक हर्ष प्राप्त करण्यासाठी त्यांच्यावर एकही जबाबदारी पार पाडायची नाही. "कारण पवित्र होणाऱ्यांना त्याने एकाच अर्पणाने सर्वकाळचे *परिपूर्ण केले आहे*" (इब्री १०:१४).

अशा प्रकारे देवाची सार्वभौमता खुलेपणे सर्वांसमोर मांडली आहे. त्याने ज्या प्रकारे आपल्या प्राणिमात्रांना हाताळले त्याद्वारे ती *निराळ्या* पद्धतीने ती मांडली आहे. दुतांचा एक गट, आदाम व इस्राएल यांना अटी घालून नेमले गेले. *त्यांचे* आज्ञापालन व त्यांची देवावरील निष्ठा यावर त्यांच्यावर देवाचे सततचे आशीर्वाद अवलंबून होते. पण अगदी याउलट देवाच्या न बदलणाऱ्या व विनाअट कराराने "लहान कळपाला" (लूक १२:३२) देवाचे मंत्री, देवाचे पुत्र, त्यांचे सर्व आशीर्वाद *ख्रिस्ताने* त्यांच्यासाठी जे केले त्यामुळे प्राप्त झाले. "देवाने घातलेला स्थिर पाया टिकून राहतो. त्यावर हा शिक्का मारला आहे: प्रभू आपले जे आहेत त्यांना ओळखतो"(२ तीमथ्य २:१९). देवाचे निवडलेले ज्या पायावर उभे राहतात तो परिपूर्ण आहे: त्यात काहीही भर घालण्याची गरज नाही, त्यातून काही काढून टाकण्याची गरज नाही (उपदेशक ३:१४). पुढील वचनात देवाचे अत्युच्च व भव्य असे एकमेव सार्वभौमत्व प्रदर्शित होते. खचितच "त्याच्या इच्छेस येईल त्याच्यावर तो दया *करतो* आणि त्याच्या इच्छेस येईल त्याला तो कठीण ऱ्हदयाचे करतो (रोम ९:१८).

# प्रकरण ७

# देवाचे न बदलणे

## देव त्याच्या निर्मितीहून वैशिष्ट्यपूर्ण भिन्न आहे.

देवाचे न बदलणे हा देवाच्या परिपूर्णतेचा एक भाग आहे. यावर पुरेसे मनन केले जात नाही. हे निर्मात्याचे एक श्रेष्ठत्व असे आहे की त्याच्या सर्व निर्मितीहून त्याला ते भिन्न दर्शवते. देव सदा सर्वदा सारखाच आहे: त्याचे अस्तित्व, गुणविशेष, किंवा निर्णय कदापि बदलणारे नाहीत. म्हणून देवाला *खडकाची* उपमा दिली आहे (अनुवाद ३२:४ इ.) याचा अर्थ जरी भोवतालच्या महासागरात सतत चढउतार चालू असले तरी तो खडक स्थिर असतो. जरी सर्व प्राणिमात्र बदलणारे असले, तरी देव बदलत नाही. देवाला आरंभ नाही अन शेवटही नाही, त्याला बदल काय तो ठाऊकच नाही. तो चिरकालिक आहे "तो प्रकाशाचा पिता आहे, त्याच्यामध्ये चढउतार किंवा बदल होत नाहीत, भ्रमण होऊन तो छायेत जात नाही" (याकोब १:१७).

## देवाच्या न बदलण्याचे पैलू

*पहिले*, देव त्याच्या *मूलतत्त्वामध्ये* अविकारी आहे. त्याचे अस्तित्व व त्याचा स्वभाव अमर्याद आहे, म्हणून तो बदलूच शकत नाही. तो अस्तित्वात नाही अशी कधी वेळच नव्हती; आणि त्याचे अस्तित्व बंद होईल अशी वेळ कदापि येणार नाही. देवाची कधी उत्क्रांती झाली नाही, तो वाढला नाही, किंवा त्याच्यात कधी सुधारणा झाली नाही. आज तो जसा आहे तसाच तो आतापर्यंत असत आला आहे आणि असणार आहे. "मी परमेश्वर बदलणारा नव्हे" (मलाखी ३:६) असे त्याने अमर्यादितपणे स्वत: ठाम म्हटले आहे. अधिक चांगले होण्यासाठी तो बदलत नाही; कारण तो मुळातच परिपूर्ण आहे; आणि परिपूर्ण असल्यामुळे तो काही वाईट करण्यासाठीही बदलत नाही. त्याच्या बाहेरील कशापासूनही त्याच्यावर कसलाच परिणाम होत नाही, सुधारणा होत नाही, दुर्बल होत खचत जाणे तर त्याच्या बाबतीत अशक्यच. तो सदासर्वकाळ सारखाच आहे. तो एवढेच म्हणू शकतो की "मी जो असावयाचा तोच आहे" (निर्गम ३:१४). काळ पुढे जाण्याने त्याच्यावर अजिबात परिणाम होत नाही. सनातनाच्या कपाळावर एक सुरकुतीही नाही. म्हणून त्याचे सामर्थ्य कधी कमी होत नाही की त्याचे गौरव कधी फिके होत राहत नाही.

दुसरी गोष्ट, देव *त्याच्या गुणविशेषांमध्ये* कदापि बदलत नाहीत. विश्वाला अस्तित्वात ये असे सांगण्यापूर्वी देवाचे जे गुणविशेष होते ते आजही अचुक तसेच आहेत, आणि सदासर्वकाळ तसेच राहतील. तसेच असणे गरजेचे आहे, कारण ते परिपूर्ण आहेत; ती त्याच्या अस्तित्वात असण्याची मूलभूत गुणवैशिष्ट्ये आहेत. त्या प्रत्येक वैशिष्ट्यापुढे लिहिले आहे, हा सदासर्वदा सारखाच आहे (*सेंपर इडम*). त्याचे सामर्थ्य कमी होत नाही की त्याचा अंत होत नाही. त्याचे ज्ञान कमी होत नाही. त्याचे पावित्र्य कदापि कलंकित होऊ शकत नाही. देवाचे गुणविशेष कधीच बदलू शकत नाही की त्याच्या देवत्वाचा शेवट होऊ शकत नाही. त्याची सत्यता न बदलणारी आहे, कारण त्याचे "वचन स्वर्गात सर्वकाळ स्थिर आहे" (स्तोत्र ११९:८९). त्याची प्रीती सार्वकालिक आहे: "तो म्हणतो, मी सार्वकालिक प्रेमवृत्तीने तुझ्यावर प्रेम करीत आलो आहे" (यिर्मया ३१:३) आणि "ह्या

जगातील स्वकीयांवर त्याचे जे प्रेम होते, ते त्याने शेवटपर्यंत केले" (योहान १३:१). त्याची दया कधी थांबत नाही "कारण त्याची दया सनातन आहे" (स्तोत्र १००:५).

*तिसरी गोष्ट*, देवाची *मसलत* कधी बदलत नाही. त्याची इच्छा कधी बदलत नाही. काही लोक पुढील वचन समोर करून आक्षेप घ्यायला तयारच होतील की, "मानव पृथ्वीवर उत्पन्न केल्याचा परमेश्वराला *अनुताप* झाला" (उत्पत्ती ६:६). मग पहिला प्रश्न उभा होतो की वचन स्वत:शीच विसंगत आहे का? नाही. असे कदापि होऊ शकत नाही. गणना २३:१९ त्याबाबत स्पष्ट व पुरेसे बोलके आहे, "देव काही मनुष्य नाही की त्याने लबाडी करावी; तो काही मानवपुत्र नाही की त्याने अनुताप करावा." १शमुवेल १५:२९ ही तसेच सांगते, "जो इस्राएलाचे केवळ वैभव आहे तो खोटे बोलणार नाही; तो पस्तावा करायचा नाही; त्यास पस्तावा व्हावा असा काही तो मानव नाही." याचे स्पष्टीकरण अगदी साधे सोपे आहे. जेव्हा देव स्वत:विषयी बोलतो तेव्हा तो नेहमी आपल्याला समजेल अशी मर्यादित स्वरूपाची भाषा वापरतो. तो स्वत:चे वर्णन करताना मानवी अवयव पांघरल्याप्रमाणे म्हणजे डोळे, कान, हात इ. अवयव असल्याप्रमाणे बोलतो. तो "झोपेतून जागा" झालेल्या माणसासारखे वर्णन करतो (स्तोत्र ७८:६५), "मी तुम्हांशी बोललो, पहाटेस उठून बोललो" (यिर्मया ७:१३). तरीही त्याला झोप लागत नाही व तो डुलकीही घेत नाही (स्तोत्र १२१:४). मानवाला *हाताळताना तो बदल* स्थापित करतो तेव्हा तो त्याच्या या कृतीला *"अनुताप"* असे संबोधतो.

होय, देवाची मसलत कधी बदलत नाही. "देवाला आपल्या कृपादानाचा व पाचारणाचा अनुताप होत नाही" (रोम ११:२९). असे असलेच पाहिजे कारण "त्याचा एकच विचार असतो आणि त्याला त्यापासून कोण फिरवणार? आपल्या मनास येते ते तो करतो" (ईयोब २३:१३).

*ह्या जगतींची मम वसती, स्वप्नच सौख्ये विभवतती*
*स्थैर्य न काडीभर जगता, एक अढळ जगि तू ख्रिस्ता.*

देवाच्या उद्दिष्टांमध्ये कधी फेरफार किंवा दुरुस्ती होत नाही. पुढील दोनपैकी एक पर्याय मानवाचे मन बदलायला किंवा त्याच्या योजना मागे घ्यायला कारण होतो: पुढे जे घडणार ते सर्व आधीच समजण्याची इच्छा; किंवा ते सिद्धिस नेण्याचे सामर्थ्य कमी पडणे.पण या दोन्ही बाबतीत देव सर्वज्ञ व सर्वसमर्थ आहे व त्याला आपले संकल्प बदलण्याची गरजच पडत नाही. अगदी नाही. "परमेश्वराची योजना सर्वकाळ टिकते; त्याच्या मनातील संकल्प पिढ्यानपिढ्या कायम राहतात" (स्तोत्र ३३:११). म्हणून आपण इब्री ६:१७ मध्ये वाचतो की "देवाने — आपल्या संकल्पाचे अढळपण विशेष दाखवले".

## मानवप्राण्यांवर आपण अवलंबून राहू शकतो का?

त्यासाठी निर्माता व प्राणिमात्रातील उच्च या दोहोंमध्ये असलेल्या अमर्याद अंतराचे आपल्याला आकलन व्हायला हवे. प्राणिमात्रत्व आणि बदल होणे या दोन शब्दांमध्ये परस्परसंबंध आहे. जर प्राणिमात्र स्वभावत: हलचाल करणारे म्हणजे चल नसले तर ते प्राणिमात्र असूच शकत नाहीत; मग तर ते देवच होतील. आपण नसत्यातून आलो असल्याने आपला कल स्वभावत:च नसत्याकडे असतो. देवाचे जतन करणारे सामर्थ्य व सर्वकाळ टिकणारी इच्छा आपला नाश या नसत्यापासून थोपवते. कोणीही क्षणभरही स्वत:ला राखू शकत नाही. आपल्या प्रत्येक श्वासासाठी आपण त्या

निर्माणकर्त्यावर अवलंबून आहोत. आपण स्तोत्रकर्त्याबरोबर हर्षाने म्हणू शकतो की "त्यानेच आमच्या प्राणाचे रक्षण केले" (स्तोत्र ६६:९). या जाणीवेने आपण "ज्याच्याठायी जगतो, वागतो व आहो (प्रे. कृ. १७:२८)

त्याच्या सान्निध्यात त्याच्यासमोर आपण काहीच नसल्याच्या भावनेने उपडे पडावे. पतित प्राणिमात्र म्हणून आपण आपण बदलणारे तर आहोतच पण आपल्यामध्ये जे काही आहे ते सर्व त्याच्या विरोधात आहे. खरे तर आपण आपली भ्रमणकक्षा सोडून "भ्रमण करणाऱ्या ताऱ्यांप्रमाणे" आहोत (यहूदा १३). "दुर्जन खवळलेल्या सागरासारखे आहेत, त्याच्याने *स्थिर राहावत नाही*" (यशया ५७:२०). पतित मानव चंचल आहे. रऊबेनविषयी याकोबाने वापरलेले शब्द आदामाच्या सर्व वंशजांना अगदी जोरदारपणे लागू होतात: "तू पाण्यासारखा चंचल आहेस" (उत्पत्ती ४९:४). हे काही धार्मिकतेचे लक्षण नव्हे तर "*मनुष्याचे नावच घेऊ नका*" (यशया २:२२) या आज्ञेकडे लक्ष देण्याचा भाग आहे. कोणाही मानवप्राण्यावर अवलंबून राहता येत नाही. "अधिपतींवर भरवसा ठेऊ नका; मनुष्यांवर भरवसा ठेऊ नका; त्यांच्याकडून साह्य मिळणे शक्य नाही" (स्तोत्र १४३:३). जर मी देवाची अवज्ञा करीन  तर मी माझ्या सहोदरांकडून फसवला जाण्यास व निराश होण्यास पात्र आहे. आज ज्या लोकांना तुम्ही आवडता, तेच उद्या तुमचा तिरस्कार करतील. जो लोकसमुदाय "दाविदाच्या पुत्राला होसान्ना" चा गजर करत होता, तो पटकन बदलला आणि ओरडला, "याची वाट लावा, याला वधस्तंभी खिळा."

## आपले पाय कोठे घट्ट रोवावेत?

ह्यात *जबरदस्त समाधान* आहे. मानवाच्या स्वभावावर अवलंबून राहता येत नाही; पण देवावर अवलंबून राहता येते! मी कितीही चंचल असेन, माझा मित्रपरिवारही चंचल असल्याचे सिद्ध होईल; पण देव बदलत नाही. तो जर आपल्यासारखा बदलत राहिला तर तो आज एक इच्छा करील तर उद्या दुसरीच इच्छा करील.  जर देव असा मनाच्या लहरीच्या नियंत्रणाखाली राहिला तर त्याच्यावर कोण विश्वास ठेवील? पण त्याच्या गौरवी नामाला स्तुती असो. कारण तो सदासर्वकाळ सारखाच आहे. त्याचे उद्दिष्ट पक्के ठरलेले आहे. त्याची इच्छा अढळ आहे. त्याचे वचन खात्रीलायक आहे. म्हणूनच जेव्हा आपल्या भोवतालचे सर्व काही मोठ्या सुनामीच्या प्रचंड लाटांमध्ये धुवून जात असते , तेव्हा ह्याच त्या *खडकावर* आपण आपले पाय घट्ट  रोवू शकतो. देवाचा स्वभाव कायमस्वरूपी असल्यामुळेच त्याची अभिवचने पूर्ण होण्याची आपल्याला हमी मिळू शकते: "पर्वत दृष्टीआड होतील, टेकड्या ढळतील, परंतु माझी तुझ्यावरची दया ढळणार नाही, माझा शांतीचा करार हालणार नाही, असे तुझ्यावर करुणा करणारा परमेश्वर म्हणतो (यशया ५४:१०).

ह्यातच प्रार्थनेसाठी उत्तेजन आहे.

> क्षणोक्षणी रंग बदलणाऱ्या सरड्याप्रमाणे बदलणाऱ्या देवाची प्रार्थना करण्यात  काय समाधान लाभेल? जगातील जो राजा आज एक विनंतीअर्ज मान्य करतो व दुसऱ्या दिवशी तो अमान्य करतो अशा राजापुढे कोण आपले विनंतीअर्ज  सादर तरील? (स्टीफन चॅरनॉक १६७०).

कोणी प्रश्न करील की ज्याची इच्छा आधीच नक्की झालेली आहे, त्याच्याकडे प्रार्थना करण्यात काय अर्थ? त्याला आमचे उत्तर आहे की, तशी त्याची मागणी आहे. हे सांगा की आपण इच्छा न

करता देव कोणते आशीर्वाद आपल्याला देऊ करतो?" आपण त्याच्या इच्छेप्रमाणे काही मागितले तर तो आपले ऐकेल" (१ योहान ५:१४). आणि त्याच्या मुलांचे सर्व काही चांगलेच करण्याचे त्याने इच्छिले आहे. त्याच्या इच्छेविरुद्ध काही मागणे ही प्रार्थनाच नव्हे, तर मोठे बंड आहे.

ह्यातच *दुष्टांना दहशत* आहे. जे त्याला आव्हान देऊन अवमानतात, त्याचे आज्ञानियम  मोडतात, ज्यांना त्याचे गौरव होण्याविषयी काही चिंता नाही, तर जणू तो अस्तित्वात नसल्याप्रमाणे जे जीवन कंठतात, त्यांनी असे मुळीसुद्धा समजू नये की जेव्हा शेवटच्या दिवशी ते त्याच्याकडे दयेसाठी धावा करतील, तेव्हा तो आपली इच्छा बदलेल व त्याचे शब्द मागे घेईल आणि त्याच्या भयानक धमक्या रद्द करील. असे मुळीच नाही. त्याने जाहीर केले आहे की, "मी संतापून जे करावयाचे ते करीन, मी त्यांच्यावर कृपादृष्टी करणार नाही; त्यांची गय करणार नाही, त्यांनी मोठ्याने माझ्या कानी आरोळी मारली तरी मी त्याचे ऐकणार नाही" (यहेज्केल ८:१८). देव त्यांच्या सुखावणाऱ्या वासनांना वाव देणार नाही. देव पवित्र आहे, तो न बदलणाराही आहे. म्हणून देवाला पापाचा वीट आहे. तो सर्वकाळ पापाचा द्वेश करतो. त्यामुळे सर्व पापात मरणाऱ्यांना तो *सार्वकालिक* शिक्षा ठोठावतो.

> इस्राएल लोक व मिसरी सैन्य यांच्यामध्ये असलेल्या मेघस्तंभाप्रमाणे देवाच्या न बदलण्याला काळोखी बाजू आहे आणि प्रकाशाची बाजूही आहे. त्याच्या धमक्यांची अंमलबजावणी करण्याची जशी तो खात्री देतो तशीच त्याच्या अभिवचनांप्रमाणे करण्याचीही तो हमी देतो. दुर्बल, चूक करत असलेल्या प्राणिमात्रांना तो  सौम्यता दाखवील व त्याच्या स्वत:च्या वचनात घोषित केल्याप्रमाणे न वागवता अपेक्षेपेक्षा  त्यांना खूपच मवाळपणे वागवील अशी गुन्हेगार  विनाकारण धरत असलेली खोटी आशा तो नष्ट करतो. गंभीर सत्याविषयीच्या अशा फसव्या तर्कवितर्कांना आम्ही विरोध करतो; कारण देव त्याची सत्ये व उद्दिष्ट्ये बदलत नाही, तो विश्वसनीय व न्यायी आहे (जॉन डिक: १८५०).

# प्रकरण ८

# देवाचे पावित्र्य

## केवळ देवच पवित्र आहे

"हे प्रभो तुला कोण भिणार नाही? तुझ्या नावाला कोण महिमा देणार नाही? कारण तूच मात्र पवित्र आहेस" (प्रकटी १५:४). केवळ तोच स्वतंत्रपणे, अमर्याद व बदलणार नाही असा पवित्र आहे. वचनात त्याच्याविषयी वारंवार लिहिले आहे, "जो पवित्र तो": तो असा असण्याचे कारण सर्व नैतिक श्रेष्ठता त्याच्यामध्ये एकवटलेली दिसते. तो पूर्णपणे शुद्ध आहे. पापाच्या साध्या सावलीचाही त्याला कलंक नाही. "देव प्रकाश आहे आणि त्याच्यामध्ये मुळीच अंधार नाही" (१ योहान १:५). पावित्र्य ही दैवी स्वभावाची प्रत्यक्ष श्रेष्ठता आहे: हा महान देव "पावित्र्यात वैभवी" आहे (निर्गम १५:११). म्हणून आपण वाचतो, "तुझे डोळे इतके पवित्र आहेत की दुष्टता तुझ्याने पाहवत नाही" (हबक्कूक १:१३). जसे देवाचे सामर्थ्य जन्मत:च कमकुवत असलेल्या प्राणिमात्रांच्या उलट आहे, व जसे आकलनातील दोष किंवा चुकांपुढे त्याचे ज्ञान पूर्णपणे विरुद्ध आहे, तसे त्याचे पावित्र्य सर्व नैतिक कलंक किंवा भ्रष्टता यांच्या अगदी उलट आहे. देवाने प्राचीन इस्राएलात "त्यांनी पावित्र्याने मंडित होऊन गावे म्हणून" गायक नेमले होते" (२ इतिहास २०:२१). सामर्थ्य हे देवाचे हात किंवा बाहु आहेत, सर्वज्ञता हे त्याचे नेत्र आहेत, दया हे त्याचे उदर आहे, सार्वकालिकता ही त्याची कालमर्यादा आहे, पण पावित्र्य हे त्याचे सौंदर्य आहे" (एस् शरनॉक). जे पापाच्या सत्तेपासून मुक्ती पावले आहेत, त्यांना तो हेच अत्युच्च सौंदर्य देऊ करतो.

देवाच्या या परिपूर्णतेवर प्रामुख्याने जोर दिला आहे:

> देवाच्या प्रतिष्ठेचे एक अंग म्हणून देवाला सर्वसमर्थ म्हणण्यापेक्षा पवित्र असे लेखून नेहमी सादर केले जाते. इतर कोणत्याही गुणविशेषांपेक्षा हाच गुण त्याच्या नावामागे विशेषण म्हणून लावण्याचे ठाम झाले आहे. "त्याचे सर्वसमर्थ नाव "किंवा" त्याचे ज्ञानी नाम" असे सहसा म्हटले जात नाही, तर त्याचे महान नाव त्याचे पवित्र नाम म्हणूनच सर्वाधिक वापरले जाते. हा त्याच्या सर्वोच्च मानाचा किताब आहे. त्याच्या नामाचे वैभव व पूजनीयता त्याच्या या नावात दिसून येते (एस् शरनॉक).

दुसरी कोणती नव्हे तर हीच परिपूर्णता गांभीऱ्याने स्वर्गातील सिंहासनासमोर साजरी होते. सेराफीम गजर करतात, "पवित्र! पवित्र! पवित्र ! सेनाधीश परमेश्वर!" (यशया ६:३). तो स्वत: आपली परिपूर्णता स्वतंत्रपणे व्यक्त करतो, "एकवार मी आपल्या पवित्रतेची शपथ वाहिली आहे" (स्तोत्र ८९:३५). देव त्याच्या "पावित्र्याने" शपथ घेण्याचे कारण इतर कशाहीपेक्षा ते त्याचे *परिपूर्ण* स्पष्टीकरण आहे. म्हणून आपल्याला बोध केला आहे की, "अहो, परमेश्वराचे भक्तहो, त्याचे गुणगान गा, आणि त्याच्या पावित्र्याचे स्मरण करताना त्याचा धन्यवाद करा" (स्तोत्र ३०:४)." याला अलौकिक गुण म्हणावे, तो इतर सर्व गुणांमधून झिरपतो व त्यांच्यावर चमक आणतो. तो सद्गुणांचा सद्गुण आहे" (जे. हॉवे १६७०). आपण असे शब्द वाचतो, "परमेश्वराचे मनोहर रूप" (स्तोत्र २७:४), ते दुसरे तिसरे काही नसून त्याच्या "पवित्रतेची *शोभा*" आहे (स्तोत्र ११०:३).

हा गुण जणू या सर्वश्रेष्ठाच्या इतर पूर्णतांना आव्हान देतो, तो इतर सर्व गुणांचे गौरव आहे. जसे पावित्र्य हे देवत्वाचे गौरव आहे तसेच ते त्याच्या सर्व पूर्णत्वाचे गौरव आहे. जसे त्याचे सामर्थ्य त्या गुणांचे बल आहे तसे त्याचे पावित्र्य त्यांचे सौंदर्य आहे. त्याच्या सर्वसमर्थतेची पुष्टी त्यांना नसेल तर ते सर्व दुर्बल ठरतील. तसे पावित्र्याने त्यांना सुशोभित केल्याखेरीज ते सर्व बेडौल दिसतील, उरलेले सर्व गुण त्यांचा सन्मान गमावतील. सूर्याने जर तत्काळ आपला प्रकाश गमावला, तर त्याची उष्णता, ताकद, त्याचा उत्पादनाचा, प्रज्ज्वलित करण्याचा गुणही गमावला जाईल. ख्रिस्ती व्यक्तिमध्ये प्रामाणिकपणा हे तिला मिळालेल्या कृपेचे तेज आहे. तसेच शुद्धता हे देवत्वातील प्रत्येक गुणविशेषाचे वैभव आहे. त्याचे न्यायत्व पवित्र न्यायत्व आहे. त्याचे ज्ञान हे पवित्र ज्ञान आहे. त्याचे सामर्थ्य हा त्याचा पवित्र बाहु आहे (स्तोत्र ९८:१). त्याचे सत्य किंवा अभिवचन हे "पवित्र अभिवचन आहे" (स्तोत्र १०५:४२). त्याचे नाव त्याचे सर्व गुणविशेष संकलित करून ते "पवित्र" असल्याचे सूचित करतात (एस्. शरनॉक).

## देवाच्या पावित्र्याचे प्रकटीकरण

देवाचे पावित्र्य *त्याच्या कार्यातून* प्रकट होते. "परमेश्वर आपल्या सर्व मार्गात न्यायपर आहे; तो आपल्या सर्व कृत्यांत पवित्र आहे" (स्तोत्र १४५:१७). त्याच्यामधून केवळ श्रेष्ठ आणि उत्कृष्ट तेच निघते. पावित्र्य हा त्याच्या सर्व कृतींचा नियम आहे. प्रारंभी त्याने निर्माण केलेले सर्व "बहुत चांगले आहे" असे त्याने म्हटले (उत्पत्ती १:३१). जर त्या निर्मितीत काही अपूर्णता किंवा अपावित्र्य असते तर त्याने असे म्हटले नसते. "देवाने मनुष्य सरळ असा उत्पन्न केला" (उपदेशक ७:२९), निर्मात्याच्या प्रतिरूपासारखा व प्रतिमेचा निर्माण केला. जे दूत पतन पावले ते पवित्र असे निर्माण केले होते. कारण आपण वाचतो की त्यांनी "त्यांनी आपले उच्चपद न राखता स्वस्थान सोडले" (यहूदा ६). सैतानाविषयी असे लिहिले आहे की तुला निर्माण केल्यापासून अधर्म तुझ्याठायी दिसून आला तोपर्यंत तुझी चालचलणूक यथायोग्य होती" (यहेज्केल २८:१५).

देवाचे पावित्र्य त्याच्या *नियमशास्त्रातून* प्रकट झाले आहे. पापाच्या सर्व प्रकारच्या फेरबदलांनाना नियमशास्त्र मना करते: मग ते अत्यंत सुधारित, सुसंस्कृत किंवा अगदी असभ्य स्वरूपात असो, मनाचा दूषित कल तसेच शारीरिक प्रदुषण असो, गुप्त इच्छा किंवा राजरोस उघड कृती असो. म्हणून आपण वाचतो, "नियमशास्त्र पवित्र आहे आणि आज्ञा पवित्र, यथान्याय व उत्तम आहे" (रोम ७:१२). "परमेश्वराचे विधि सरळ आहेत, ते ऱ्हदयाला आनंदित करतात; परमेश्वराची आज्ञा चोख आहे, ती नेत्रांना प्रकाश देते. परमेश्वराचे भय शुद्ध आहे, ते सर्वकाळ टिकणारे आहे. परमेश्वराचे निर्णय सत्य आहेत; ते सर्वथैव व न्यायी आहेत" (स्तोत्र १९:८,९).

देवाचे पावित्र्य *वधस्तंभापाशी* प्रकट होते. अद्भुत रीतीने तरी अत्यंत गांभीर्याने तेथे देवाचे अमर्याद पावित्र्य व पापाविषयीचा तिटकारा ही प्रदर्शित झाली. पापाचा देवाला किती तिटकारा असला पाहिजे, कारण त्या पापाला शिक्षा देण्यासाठी त्याच्या पुत्रावर ते लादण्यात आले असता त्याने त्याचा त्याग केला!

दैवी पावित्र्य इतके सुंदर व सुरेख कधीच दिसले नाही जितके सुंदर ते तारणारा मरणयातनांनी कण्हत असताना त्याच्या अत्यंत घायाळ मुखात दिसले. याची कबुली तो स्वत:च स्तोत्र २२ मध्ये देतो. जेव्हा देवाने त्याचा हसरा चेहरा त्याच्यापासून फिरवला,

> आणि त्याचा तीक्ष्ण सुरा त्याच्या ऱ्हदयात खुपसला, तेव्हा आपोआप त्याच्या मुखातून भयानक किंकाळी बाहेर पडली, "माझ्या देवा, माझ्या देवा, तू माझा त्याग का केलास?" तेव्हा तो त्याच्या परिपूर्णतेला असे म्हणून वंदन करतो की — " तू पवित्र आहेस" (स्तोत्र २२:३) (एस्. शरनॉक).

देव पवित्र असल्यामुळे तो *सर्व पापाचा द्वेष करतो*. त्याच्या आज्ञानियमांशी जे सुसंगत आहे ते सर्व त्याला आवडते. आणि जे काही त्याच्या आज्ञानियमांशी विसंगत आहे त्याविषयी तो नाराज असतो. त्याचे वचन स्पष्ट घोषित करते की "परमेश्वराला कुटिलाचा वीट आहे," (नीति ३:३२). ‘‘परमेश्वराला दुष्ट कल्पनांचा वीट आहे." (नीति १५:२६). मग त्यानंतर त्याने पापाला शासन करणे आवश्यक आहे, हे ओघाने आलेच. देवापासून तिरस्कार प्राप्त झाल्याखेरीज त्याच्याकडून शिक्षा फर्मावली गेल्याखेरीज पाप अस्तित्वात राहू शकत नाही. देव नेहमीच पाप्यांना क्षमा करत आला आहे. पण तो पापाला कदापि क्षमा करत नाही. आणि कोणी दुसऱ्याने शिक्षा घेतल्याच्या पार्श्वभूमीवरच पाप्याला क्षमा प्राप्त होऊ शकते: "रक्तपातावाचून पापविमोचन होत नाही" (इब्री ९:२२). म्हणून असे सांगितले आहे की, "परमेश्वर आपल्या विरोध्यांचे पारिपत्य करणारा आहे; तो आपल्या शत्रूंविषयी आपल्या मनात क्रोध वागवतो" (नहूम १:२). एकाच पापासाठी देवाने आपल्या पहिल्या पालकांना एदेन बागेतून घालवून दिले होते. एका पापासाठी कनानाच्या भावी पिढ्यांवर, हामाच्या पुत्रावर आलेला शाप आजतागायत आहे (उत्पत्ती ९:२१). एका पापासाठी मोशेला कनानात पाउल टाकता आले नाही. अलिशाच्या चाकराला कुष्ठरोग जडला. हनन्या व सप्पीरा यांना जिवंतांच्या भूमीतून काढून टाकण्यात आले.

## जगाच्या दृष्टीकोनातून देवाचे पावित्र्य

वचनाच्या दैवी प्रेरणेतून ह्याचे आपल्याला पुरावे सापडतात. पुनरुज्जीवन न झालेले देवाच्या पावित्र्यावर खरोखर विश्वास ठेवत नाहीत. त्यांच्या देवाच्या स्वभावविशेषांविषयी एकतर्फी संकल्पना असतात. त्यांना फाजिल आशा वाटत असते की देवाची दया सर्वांवर आरूढ असते. "मी तुझ्यासारखाच आहे असे तुला वाटते" (स्तोत्र ५०:२१) असा देव त्यांच्यावर आरोप करतो. आपल्या अधम अंत:करणाने कल्पिलेला देवच ते उत्तम मानतात. त्यामुळे ते सतत या वेडेपणाच्या चुकीच्या मार्गात राहतात. अशा रीतीने देवाच्या वचनात स्पष्टपणे वर्णन केलेल्या देवाच्या पवित्र दैवी स्वभाव व त्याचे गुणविशेष दाखवून देते की त्यांच्या अशा मार्गाचे मूळ पूर्णत: मानवी आहे. आधुनिक व प्राचीन विदेशी जगतातील दैवतांचे स्वाभाविक गुणविशेष खऱ्या देवाशी संबंधित असलेल्या निष्कलंक व शुद्ध पावित्र्याच्या अगदी उलट आहेत. अवर्णनीय पवित्र देव, ज्याला पापाचा अत्यंत तिटकारा आहे, तो देव कधीही आदामाच्या संतानाने शोध लावून निर्माण केलेला नाही. अमर्याद पवित्र असलेल्या व न बदलणाऱ्या देवाला आपल्या समोर सतत ठेवण्याऐवजी मानवाने त्या जिवंत देवाशी शत्रुत्व ठेवणे यासारखी दुसरी कोणतीच वास्तवता मानवाच्या अंत:करणाची भयंकर धर्मभ्रष्टता प्रदर्शित करत नाही. त्याची पापाविषयीची व्यवहारातील कल्पना इतकी मर्यादित आहे की जग त्याला "गुन्हा" या शब्दाने संबोधते. ते वगळून शिवाय पापाला "कमतरता", "चुका"," नैतिक दुर्बलता" इ. अशी गोंडस नावे देऊन त्याची तीव्रता मानव कमी करतो. आणि जेव्हा पापाची जबाबदारी स्वीकारण्याची वेळ येते तेव्हा तो सबबी सांगतो व त्या पापाचे गांभीर्य कमी करून टाकतो.

उघडपणे ख्रिस्ती म्हणवणाऱ्या बहुसंख्य लोक देवाच्या "प्रेमाकडे" लाड पुरवणाऱ्या एखाद्या वृद्धाप्रमाणे पाहातात. त्यांच्या देवाला चुकांचा समाचार घेण्यात काही सुख वाटत नाही, तर

सौम्यपणे तो तरुणांच्या "अविचारीपणाकडे" कानाडोळा करतो. पण वचन म्हणते, "*सर्व* कुकर्म करणाऱ्यांचा तुला तिटकारा आहे" (स्तोत्र ५:५). पुढे म्हटले आहे, "तो प्रतिदिनी धाक दाखवणारा देव आहे" (स्तोत्र ७:११). पण लोक या देवावर विश्वास ठेवायला घाबरतात. देवाने विश्वासूपणे पापाबद्दल दाखवलेला तिटकारा त्यांच्या निदर्शनास आला की ते दातओठ खातात. कोणी पापी मनुष्य सदा सर्वकाळ होरपळत राहण्यासाठी स्वत:करता अग्निसरोवर जसे सिध्द करू शकणार नाही तितकेच तो पवित्र देवालाही निर्माण करू शकत नाही.

देव *पवित्र* असल्याने प्राणिमात्राने काहीही केले तर त्या आधारावर त्याचा देवाने स्वीकार करणे *तिळमात्र शक्य नाही*. पतित मानव कदाचित आपले जग निर्माण करू शकेल पण अथांग शुद्ध असलेल्या देवाला मान्य होण्यासाठी काहीही निर्माण करू शकत नाही. अंधार व प्रकाश एकत्र राहू शकतील का? शुद्ध, निष्कलंक व पवित्र देव "घाणेरड्या चिंध्यांमध्ये" सुख मानून घेईल का? (यशया ६४:६). पापी मनुष्य सर्वोत्तम काय सादर करू शकतो तर आपली अपवित्रता. किडलेले झाड चांगले फळ देऊ शकत नाही. पवित्र व नीतिमान नसलेल्यास देवानेने मान्यता देणे म्हणजे देवाने स्वत:ची बदनामी करून घेणे व आपले देवत्व नाकारण्यासारखे आहे. आणि जे देवाच्या स्वभावाविरुद्ध आहे त्यामध्ये डाग, कलंक नसणे शक्यच नाही.

## मानवजात मुक्त

पण देवाच्या नावाला धन्यवाद असो, कारण त्याच्या पावित्र्याची जी मागणी होती, ती आपल्या प्रभु येशूख्रिस्तामध्ये त्याने कृपेने पुरवली. जो प्रत्येक गरीब पापी त्याच्या आश्रयाला जातो, "त्याचा त्या प्रियकरामध्ये स्वीकार केला जातो" (इफिस १:६). हालेलूया!

## मानवाचे देवाजवळ जाणे

देव पवित्र असल्याने आपण *अत्यंत आदराने* त्याच्याकडे येणे क्रमप्राप्त आहे. "पवित्र जनांच्या सभेत भीती बाळगण्यास योग्य असा एकच देव आहे, त्याच्या सभोवतालच्या सर्वांपेक्षा तो भीतिप्रद आहे" (स्तोत्र ८९:७).

"परमेश्वराची, आमच्या देवाची थोरवी गात त्याच्या पादासनापुढे नमन करा" (स्तोत्र ९९:५). होय, त्याच्या "*पादासनाजवळचे*" म्हणजे नम्रतेने अगदी खालचे स्थान घेऊन त्याला वंदन करा. जळत्या झुडपाजवळ मोशे जात असता देवाने त्याला म्हटले, "तुझ्या पायातले पायतण काढ" (निर्गम ३:५). "भीड धरून" आपण त्याची सेवा करायची आहे (स्तोत्र २:११). इस्राएलांकडून त्याची मागणी होती की "जे माझ्या समीप येतील त्यांनी मला पवित्र मानावे आणि सर्व लोकांसमक्ष माझा महिमा व्हावा" (लेवीय१०:३). जितकी आपली अंत: करणे त्याच्या अवर्णनीय पावित्र्याने स्तंभित होतील तितके आपले त्याच्याजवळ पोहोंचणे त्याला स्वीकारण्यास योग्य होईल.

देव पवित्र आहे म्हणून आपण *त्याच्याशी समरूप होण्याची इच्छा* धरायला हवी, कारण त्याची आज्ञा आहे की, "जसा मी पवित्र आहे तसे तुम्ही पवित्र व्हा" (१ पेत्र १:१६). आपल्याला देवासारखे सर्वोपस्थित किंवा सर्वज्ञ होण्याची आज्ञा नाही, तर आपण पवित्र व्हायचे आहे. तेही "*सर्व प्रकारच्या* आचरणात पवित्र" व्हायचे आहे (१पेत्र १:१५).

हा प्रभूचा सन्मान करण्याचा मुख्य मार्ग आहे. आपण चढत्या प्रमाणात देवाची स्तुतिप्रशंसा केली, किंवा वक्तृत्वपूर्ण विचार स्पष्ट केले, उत्सफूर्तपणे त्याची सेवा केली त्याने त्याचे जेवढे गौरव होईल त्यापेक्षा आपण डागविरहित आत्म्याने त्याच्याशी स्तुती करीत सुसंवाद केल्याने व त्याच्या*साठी* त्याच्या*सारखे* जीवन जगल्याने त्याचे अधिक गौरव होईल (एस् शरनॉक)

जर केवळ देवच पावित्र्याचा उगम व झरा आहे; तर आपण त्याच्याकडून पावित्र्य प्राप्त करून घेण्यासाठी तळमळीने खटपट करू. आपली रोजची प्रार्थना असू दे की, त्याने आपल्याला "*परिपूर्णपणे* पवित्र करावे; आणि आपल्या प्रभू येशू ख्रिस्ताच्या आगमनसमयी आपला आत्मा, जीव व शरीर ही निर्दोष व यथासांग अशी राखली जावीत" (१थेस्सलनी ५:२३).

# प्रकरण ९

# देवाचे सामर्थ्य

## देवाच्या सामर्थ्याची अचूक कल्पना स्थापित करणे

देव अगदी परिपूर्णपणे समर्थ आहे, सर्वस्वी सुज्ञ आहे यावर विचार न करता आपल्याला देवाविषयीची योग्य संकल्पना असणार नाही. आपल्याला हवे ते करू शकणारा आणि त्याच्या इच्छेप्रमाणे बरे ते काही करू न शकणारा देवच असू शकत नाही. कारण देवाला जे बरे वाटते ते त्याची इच्छा निश्चित करते व त्याची ती इच्छा अंमलात आणण्याचे त्याला सामर्थ्य असते.

> देवाचे सामर्थ्य म्हणजे त्याची अशी क्षमता व शक्ती की ज्याद्वारे तो त्याला संतुष्ट वाटेल ते सर्व अमलात आणू शकतो, त्याच्या अथांग ज्ञानाने मार्गदर्शन करू शकतो, आणि त्याची अमर्याद शुद्धता जे काही निश्चित करील त्या सर्वांची परिपूर्ती करू शकतो — जसे पावित्र्य हे त्याच्या सर्व गुणविशेषांचे सौंदर्य आहे, तसे देवाचे सामर्थ्य त्याच्या दैवी स्वभावाच्या परिपूर्णतेचे जीवन व कृती आहे. जर सामर्थ्याने देवाने ती योजना अमलात आणण्यास पाऊल टाकले नसते तर त्याची सार्वकालिक योजना व्यर्थ ठरली असती. त्याच्या सामर्थ्याशिवाय त्याची दया दुर्बल दया ठरली असती. त्याची अभिवचने पोकळ वाणी ठरली असती. त्याचा धाक एखाद्या बुजगावण्यासारखा ठरला असता. देवाचे सामर्थ्य त्याच्यासारखेच आहे: अथांग, अमर्याद, चिरकालिक, समजण्या पलीकडचे आणि त्याच्या निर्मितीकडून अडथळा किंवा नियंत्रण होऊ शकत नाही किंवा ती ते निष्पळ करून उधळूनही लावू शकत नाही (स्टीफन शरनॉक).

"देव एक गोष्ट बोलला आहे; सामर्थ्य देवाचे आहे हे मी दोनदा ऐकले आहे" (स्तोत्र ६२:११). "देव एकदा बोलला आहे" आणखी सांगण्याची गरज नाही. आकाश व पृथ्वी ही नाहीतशी होतील पण त्याचे वचन सर्वकाळ राहणार आहे." देव एकदा बोलला आहे" हे त्याच्या दैवी गौरवाला किती शोभेसे आहे! आपण बिचारे विनाशी लोक वारंवार बोलू तरीही आपले ऐकून घेतले जाणार नाही. तो एकदाच बोलतो पण त्याच्या सामर्थ्याचा गडगडाट हजारोहजार टेकड्या ऐकतात.

> *"परमेश्वराने आकाशात गर्जना केली, परात्पराची वाणी झाली, गारा व धगधगीत इंगळ बाहेर पडले. त्याने आपले बाण सोडून त्यांची दाणादाण केली; त्याने विजा पाडून त्यांची त्रेधा उडवली. तेव्हा हे परमेश्वरा तुझ्या धमकीने, तुझ्या नाकपुड्यांतील श्वासाच्या सोसाट्याने जलाशयाचे तळ दिसू लागले, पृथ्वीचे पाये उघडे पडले"*
>
> *(स्तोत्र १८:१३-१५).*

"देव एकदाच बोलला आहे": त्याचा न बदलणारा अधिकार पाहा. "कारण परमेश्वराशी तुलना करता येईल असा आकाशात कोण आहे? दिव्यदुतांच्या मंडळात परमेश्वरासमान कोण आहे?" (स्तोत्र ८९:६). पृथ्वीवरील सर्व रहिवासी केवळ *क:पदार्थ* होत; तो आकाशातील सैन्याचे व पृथ्वीवरील रहिवाश्यांचे इच्छेस येईल ते करतो. तू असे काय करतोस असे त्याचा हात धरून कोणाच्याने त्यास म्हणवत नाही" (दानीएल ४:३५). जेव्हा देव मानवी देह धारण करून आला व

मानवांमध्ये त्याने वस्ती केली तेव्हा हे उघडपणे प्रदर्शित झाले. कुष्ठरोग्याला तो म्हणाला, "माझी इच्छा आहे, शुद्ध हो. आणि *लागलेच* त्याचे कुष्ठ जाऊन तो शुद्ध झाला" (मत्तय ८:३). कबरेत ठेऊन चार दिवस झालेल्या लाजाराला त्याने मोठ्याने आज्ञा दिली, "लाजारा, बाहेर ये." आणि मेलेला जिवंत होऊन बाहेर आला. त्याने एक शब्द उच्चारताच खवळलेल्या वादळी लाटा निवांत झाल्या. त्याच्या अधिकारयुक्त आज्ञेला दुरात्म्यांचे सैन्यही प्रतिकार करू शकले नाहीत.

## देवाचे सामर्थ्य आणि मानवाचा गर्व

" सामर्थ्य केवळ देवाचे आहे," केवळ त्याचेच आहे. देवाने जे नेमून सुपूर्त केले ते होऊ न देण्याचे कणाचेही सामर्थ्य या संपूर्ण विश्वातील कोणाही प्राणिमात्रात नाही. देवाचे सामर्थ्य कोणाला हस्तगत करून संपादता येत नाही की ते दुसऱ्या कोणाच्या अधिकृत मान्यतेवर अवलंबून नाही. ते स्वभावत:च त्याच्या मालकीचे आहे.

> देवाचे सामर्थ्य त्याच्यासारखेच स्वयंभू, स्वयंआधारित आहे. अगदी शक्तिशाली मनुष्याचे सामर्थ्यही त्या सर्वसमर्थाच्या सामर्थ्यापुढे अस्तित्व नसल्यासारखे आहे. टेकू नसलेल्या व टेकण्यास हातांची गरज नसलेल्या सिंहासनावर तो बसतो. त्याचा दरबार मंत्री चालवत नाहीत, की तो आपल्या निर्मितीकडून त्याचे वैभव उसने घेत नाही. सर्व सामर्थ्याचा उगम व उत्पादनाचे महान केंद्र तो स्वत:च आहे (सी. एच्. स्पर्जन).

त्याच्या महान सामर्थ्याची संपूर्ण निर्मिती साक्ष देतेच पण तो संपूर्ण निर्मितीत कशावरही अवलंबून नसल्याचीही ती साक्ष देते. त्याचे हे आव्हान ऐका: "मी पृथ्वीचा पाया घातला तेव्हा तू कोठे होतास? तुला समजण्याची अक्कल असेल तर सांग. तिचे मोजमाप कोणी ठरवले बरे? तिला मापनसूत्र कोणी लावले? हे तुला ठाऊक आहे काय? तिच्या स्तंभाचा पाया कशावर घातला? तिची कोनशिला कोणी बसवली? (ईयोब ३८:४-६). कसा मानवाचा गर्व धुळीस मिळतो पाहा!

> देवाचे सामर्थ्य त्याच्या नावातही वापरले जाते. "मनुष्याचा पुत्र सर्वसमर्थाच्या उजवीकडे बसलेला" (मार्क १४:६२), म्हणजे देवाच्या उजव्या हाताशी बसलेला. देव आणि त्याचे सामर्थ्य ही परस्परांपासून विभक्त करता येत नाहीत अशी ती सतत एकत्रितपणे हलचाल करत असतात. त्याचे मूलतत्व विस्ताराने अफाट असल्याने ते एका स्थानास अडकलेले नसल्याने; ते चिरकालिक असल्याने; त्याचे कालमर्यादेने मापन होत नसल्याने ते सर्वसमर्थ आहे, त्याच्या कार्यशीलतेला मर्यादा नाही ( एस. शरनॉक).

" पाहा, ह्या त्याच्या कार्यक्षेत्राच्या केवळ सीमा आहेत; त्याची केवळ चाहूल आपल्या कानी येते; पण त्याच्या प्रभावाच्या गर्जनेचा अंत कोणाला लागेल?" (ईयोब २६:१४). त्याचे जे काही सामर्थ्य दृश्य निर्मितीमध्ये प्रदर्शित केले आहे तेही आपल्या आकलनापलीकडचे आहे. मग त्याचे सार्वभौमत्व तर आपल्याला ग्रहण होणे आणखी दूरच राहिले. देवाच्या कृतीतून व्यक्त होणाऱ्या त्याच्या सामर्थ्यापेक्षा त्याच्यामधील गुणविशेषांमधील सामर्थ्य अधिक अमर्याद आहे.

## देवाचे लपलेले सामर्थ्य

देवाच्या सामर्थ्याच्या "काही कार्यपद्धती" त्याची निर्मिती, त्याची तरतूद, मुक्ती यात आपल्याला

आढळते; पण त्याच्या सामर्थ्याचा" काही अंशच " आपल्याला त्यात दिसतो. यातून लक्षणीय बाब लक्षात येते ती अशी की — "त्याचा पराक्रम तेथे गुप्त आहे" (हबक्कूक ३:४). या प्रकरणातील प्रत्यक्ष चित्र उभे करणाऱ्या शब्दांपेक्षा कोणतीही कल्पना मोठमोठ्या विद्वत्ताप्रचुर शब्दात मांडली तरी ती या वाक्याच्या उदात्तची त्याला सर येणार नाही. संदेष्ट्याने दृष्टांतात डोंगर ढळताना आणि पर्वत कोसळताना पाहिले, त्यात कोणालाही सहजच वाटेल की देवाचे सामर्थ्य किती अद्भुत आहे! पण हे वचन सांगते की तो आपले सामर्थ्य उघड करण्याऐवजी "लपवत" आहे. मग याचा अर्थ काय? तो असा: देवाचे सामर्थ्य अगदी कल्पना करता येणार नाही असे, अत्यंत प्रचंड, ताब्यात ठेवता न येणारे आहे. जेव्हा भयंकर भूकंप होतो तेव्हा त्याचे निसर्गातील हे काम त्याचे अफाट सामर्थ्य प्रकट करण्याऐवजी ते गुप्त ठेवत असते.

## देवाचे अफाट सामर्थ्य

खालील उताऱ्याशी त्याची मोठी सांगड आढळते: "तो समुद्राच्या पर्वतप्राय लहरींवरून चालतो" (ईयोब ९:८). यात देवाचे कोणी नियंत्रण करू शकणार नाही असे सामर्थ्य दिसून येते. "आकाशमंडळातच त्याचा संचार होतो" (ईयोब २२:१४). यात त्याच्या अफाट सान्निध्याचे वर्णन आहे. "वायुच्या पंखांवर आरोहण करून जातोस" (स्तोत्र १०४:३). येथे त्याची कामे तो किता अद्भुत वेगाने करतो ते जाहीर केले आहे. हा अखेरचा शब्दप्रयोग लक्षणीय आहे. तो "उडतो" किंवा "पळतो" असे म्हटले नाही, तर "जातो" म्हणजे चालतो या अर्थाने तेही "वायूंच्या पंखांवर आरोहण करून जातो असे म्हटले आहे — हा वायु अत्यंत प्रबळ घटक आहे. अत्यंत चवताळलेला व खवळलेला, कल्पना करता येणार नाही अशा वेगाने सोबत सारे झाडून नेत चालला आहे. असा तो वायूही त्याच्या पायांखाली, त्याच्या परिपूर्णपणे नियंत्रणाखाली आहे.

आता देवाचे *निर्मितीतील* सामर्थ्य पाहू या. "आकाश तुझे आहे, पृथ्वीही तुझी आहे; जग व त्यातले सर्व काही तूच स्थापले आहे. उत्तर व दक्षिण या तू निर्माण केल्यास" (स्तोत्र ८९:११-१२). मानवाला कोणतेही काम करण्यापूर्वी लागणाऱ्या साहित्याची जमवाजमव करावी लागते. पण देवाने नसत्यातून सुरुवात केली. आणि केवळ त्याच्या शब्दाने नसत्यातून असते निर्माण केले. बुद्धी हे ग्रहण करू शकत नाही." तो बोलला आणि अवघे झाले, त्याने आज्ञा केली व सर्व काही स्थिर झाले" (स्तोत्र ३३:९). इतिहासपूर्व पदार्थाने त्याची वाणी ऐकली. "देव बोलला — होवो — आणि तसे झाले" (उत्पत्ती १). आपण म्हणू या, "तुझा भुज पराक्रमी आहे, तुझा हात बळकट आहे; तुझा उजवा हात उभारलेला आहे" (स्तोत्र ८९:१३).

> जो कोणी विचारमग्न नेत्रांनी मध्यान्हाच्या आकाशाकडे दृष्टी लावील त्याला असंख्य अद्भुते आढळून येतील. कोणी आपल्या पूर्वजांना विचारू शकतो का, की हा पृथ्वीचा बलशाली गोल कसा साकार झाला? या सर्वांचा संबंध लावणे चकित करणारे आहे. ते सर्व कोणतेही सामान न वापरता उत्पन्न करण्यात आले. ते रिक्ततेतून उदयास आले.विश्वाच्या निसर्गाचे वैभवशाली धागे नसत्यातून उदयास आले. त्या श्रेष्ठ शिल्पकाराने त्यातील प्रत्येक भागाला अत्यंत सुंदर व नाजुक आकार द्यायला व संपूर्ण कलाकृतीला लकाकीने उजळून टाकायला कोणती हत्यारे वापरली? ते सर्व भाग एकमेकांस निगडित करून एक सूक्ष्म कौशल्यांनी आकर्षक, प्रमाणबद्ध व भव्य रचना कशी साकार झाली? केवळ एक हुकूम देताच ती सर्व सिद्ध झाली. देव म्हणाला होवो. याहून अधिक काही बोलला नाही. आणि तत्काळ ही भव्य वास्तू, सर्व सौंदर्याने सुशोभित केलेली, अगणित परिपूर्णता प्रदर्शित करणारी त्या महान निर्मात्याला स्तुती अर्पण करणाऱ्या सराफीमांसह उभी राहिली. "परमेश्वराच्या शब्दाने

आकाश निर्माण झाले; त्याच्या मुखश्वासाने आकाशातील सैन्य निर्माण झाले (स्तोत्र ३३:६) (जेम्स हार्वी, १७८९).

*रक्षण करण्यामधील* देवाचे सामर्थ्य लक्षात घ्या. कोणाही मानवप्राण्यामध्ये स्वत:चे रक्षण करण्याचे सामर्थ्य नाही. "लव्हाळा चिखलावाचून वाढतो काय? लव्हाळा पाण्यावाचून उगवतो काय? (ईयोब ८:११). हिरवा भाजीपाला अन्नासाठी उपलब्ध नसता तर मानव व पशू नाश पावले असते. भूमीला ताजेतवाने करणारी फलदायी पर्जन्यवृष्टी झाली नसती तर हिरवा भाजीपाला कोमेजून मरून गेला असता. म्हणूनच देवाला "मनुष्य व पशूंचा प्रतिपाळ करणारा" असे म्हटले आहे (स्तोत्र ३६:६). "आपल्या सामर्थ्याच्या शब्दाने तो पृथ्वीला आधार आहे" (इब्री १:३). प्रत्येक मानवप्राण्याचे जन्मापूर्वीचे जीवन दैवी सामर्थ्याचे नवलच आहे! एवढे महिने अर्भक इतक्या संकुचित जागेत राहूनही जिवंत कसे राहू शकते? आणि तेही श्वासोच्छवास न करता, हया देवाच्या सामर्थ्याचे स्पष्टीकरण देता येत नाही." खरोखर तोच आमच्या "प्राणाचे रक्षण करतो" (स्तोत्र ६६:९). समुद्राच्या हिंसकतेपासून पृथ्वीचे रक्षण करणे हे देवाच्या सामर्थ्याचे आणखी एक सरळ सोपे उदाहरण आहे. उधाण येऊन पृथ्वीवर ओसंडून न वाहता, निर्मितीच्या खोल तळाच्या भागाचे धडका मारून तुकडे तकडे न करता क्रोधाचा कोंडमारा झालेला हा एक घटक, त्याला पहिल्याने जेथे ठेवले होते तेथेच राहून घालून दिलेल्या मर्यादेतच आपला प्रवाह वाहता कसा ठेवतो? पाणी हलके असल्याने त्याचे नैसर्गिक स्थान पृथ्वीच्याही वर असायला हवे; आणि हवेच्या थराखाली असायला हवे, कारण ते जड आहे. मग त्याच्या नैसर्गिक गुणविशेषाला कोण काबूत ठेवते? मनुष्य तर नक्कीच नाही; आणि तो तसे करूही शकत नाही. त्या निर्मात्याचा हुकूमच केवळ त्याला लगाम घालतो. "तू येथवरच ये, यापलीकडे तू येता कामा नये. येथे तुझ्या उन्मत्त लहरी थांबल्या पाहिजेत" (ईयोब ३८:११). देवाचे सामर्थ्य जगाचे रक्षण करते याचे किती संस्मरणीय जिवंत उदाहरण !

*शासनव्यवस्थेतील* देवाचे सामर्थ्य पाहा. सैतानाच्या कपटकारस्थानांना तो कसा लगाम घालतो. "तुमचा शत्रू सैतान गर्जणाऱ्या सिंहासारखा कोणाला गिळावे हे शोधत फिरतो" (१पेत्र ५:८). त्याच्या मनात देवाविषयी अत्यंत द्वेश भरलेला आहे. मानवाशी व विशेषत: पवित्र जनांशी तो क्रूर, रानटी शत्रुत्व करतो. आदामाचा त्या नंदनवनात त्याने हेवा केला आणि आता आपण देवाच्या आशीर्वादांचे सुख उपभोगतो म्हणून आपला हेवा करतो. त्याची इच्छा असली तर तो ईयोबाला वागवले तसेच आपल्याला पण वागवू शकतो: तो भूतलावरील फळफळावळीवर आकाशातून अग्नी पाठवू शकतो. कळपांचा नायनाट करू शकतो. वाऱ्याच्या तडाख्याने आपली घरे उलथून पाडू शकतो. आणि आपली शरीरे गळवांनी भरून टाकू शकतो. पण मानवाला हे क्वचितच समजते की देव त्याला फार मोठ्या प्रमाणात लगाम घालून आकळतो. त्याच्या पापभ्रष्ट योजना अमलात आणण्यापासून त्याला अटकाव करतो. त्याला त्याच्यासाठी नेमलेल्या मर्यादांपर्यंतच ठेवतो. अशाच प्रकारे देव मानवाच्या स्वाभाविक भ्रष्टतेला प्रतिबंध करतो. एखादे सुरू झालेले पाप तो पुरेसे सहन करतो यासाठी की मानवाने आपल्या निर्मात्याशी धर्मत्याग केल्याने कसा अनर्थ ओढवतो हे त्याला दाखवून द्यायचे असते. पण देवाने आपला नियंत्रण ठेवणारा हात काढून घेईपर्यंत मानव भयानक अवस्थेत किती दूरवर जाईल याची कल्पना कोण करू शकतो? "त्यांचे तोंड शापाने व कडूपणाने भरलेले आहे. त्यांचे पाय रक्तपात करण्याकरता उतावळे झाले आहेत" (रोम ३:१४-१५) — आदामाच्या प्रत्येक संतानाचा स्वभाव असाच आहे. जर देवाच्या सामर्थ्याने हस्तक्षेप करून जलप्रलयाच्या वेळी जलाशयांचे दरवाजे बंद केले नसते तर बेलगाम हेकेखोरपणे परवाना असल्यासारख्या चुका करत मानवाने या जगात किती विजयानंद केला असता. स्तोत्र ९३:३-४ पाहा.

*न्यायामधील* देवाच्या सामर्थ्यावर मनन करा. तो तडाखे देतो तेव्हा त्याला कोणी प्रतिकार करू शकत नाही. यहेज्केल २२:१४ वाचा. जलप्रलयात हे किती नमुनादाखल व्यक्त झाले. देवाने आकाशकपाटे उघडली व खोल भागातून प्रचंड झरे उफळवले. आणि तारवातले सोडल्यास संपूर्ण मानवजात त्याच्या क्रोधाच्या सुनामीपुढे असहाय ठरली आणि पार धुवून गेली. अग्नी व गंधकाचा आकाशातून वर्षाव झाला आणि सखल भागातील नगरांचा समूळ नाश केला. फारो व त्याचे सैन्य तांबड्या समुद्रापाशी असहाय असताना देवाने त्यांना उधळून लावले. रोम ९:२२ वचन काय जबरदस्त आहे! "आपला क्रोध दर्शवावा व आपले सामर्थ्य व्यक्त करावे असे देवाच्या मनात असताना नाशासाठी सिद्ध झालेल्या क्रोधाच्या पात्रांना मोठ्या सहनशीलतेने त्याने वागवून घेतले." देव अनैतिक चालीच्या मनुष्यांवर आपले सामर्थ्य प्रदर्शित करील ते केवळ त्यांना गेहन्नात डांबून नव्हे तर त्याच्या दैवी सामर्थ्याने त्यांचे शरीर व आत्मा सदासर्वकाळ अग्निसरोवरात जतन करण्याने.

अशा देवासमोर सर्वांनी *थरथर कापायला हवे*! चिलटासारख्या कीटकाला आपण जसे चिरडतो, तसा चुराडा करून टाकू शकणाऱ्या देवाशी वागणारा माणूस आत्महत्या करणाऱ्या वृत्तीचा आहे. जो सार्वभौमत्वाचे वस्त्र पांघरलेला आहे, त्याच्या मनास आले तर आपले तुकडे तुकडे करून आपल्याला कोणत्याही क्षणी जो अग्निसरोवरात टाकू शकतो, त्याचा उघडपणे अवमान करणे म्हणजे मूर्खपणाचा कळस होय. अशा वेडेपणाला अगदी खालच्या पायरीवरचे स्थान द्यावे आणि देवाच्या आज्ञेकडे कान देणे शहाणपणाचे होईल, "पुत्राने रागावू नये आणि तुम्ही वाटेने नाश पावू नये म्हणून त्याचे चुंबन घ्या. कारण त्याचा क्रोध त्वरित पेटेल" (स्तोत्र २:१२).

अशा देवाला प्रकाश पावलेल्या आत्म्याने *प्रेमादर करावा*! हा अद्भुत व अमर्याद परिपूर्ण देव त्याच्या उपासनेसाठी आपल्याला पाचारण करतो. जर पराक्रम व कीर्ती प्राप्त केलेली माणसे जगाच्या कौतुकाला पात्र ठरतात, तर या सर्वसमर्थ देवाच्या सामर्थ्याने आपण किती आश्चर्याने व आदराने भरून गेले पाहिजे. "हे परमेश्वरा, देवांमध्ये तुझ्यासारखा कोण आहे? पावित्र्यामुळे वैभवी, स्तवनीय कृत्यांनी भयानक, अद्भुते करणारा असा जो तू, त्या तुझ्यासारखा कोण आहे? (निर्गम १५:११).

संताने अशा देवावर *विश्वास* ठेवायला हवा. तो पूर्णपणे विश्वास ठेवण्यास लायक आहे. त्याला अवघड काहीच नाही. जर देव त्याच्या सामर्थ्यात अपूरा असता, त्याच्या ताकदीला मर्यादा असती तर आपल्याला निराश व्हायला कारण असते. पण जर त्याने सर्वसमर्थतेचे वस्त्र पांघरले आहे, तर तो उत्तर देऊ शकणार नाही अशी एकही प्रार्थना नाही. अशी कोणती गरज इतकी मोठी नाही की *त्याला* पुरवता येणार नाही. कोणती तळमळ इतकी प्रबल नाही की जी तो आपल्या ताब्यात आणू शकणार नाही. कोणता मोह इतका बलवान नाही की ज्याच्यापासून तो सोडवू शकणार नाही. कोणतेही दु:ख असे नाही की तो निवारण करू शकत नाही. "परमेश्वर माझ्या जीवाचे सामर्थ्य आहे, मी कोणाचे भय धरू?" (स्तोत्र २७:१).

> "आपण ज्याची काही मागणी किंवा कल्पना करतो त्यापेक्षा आपल्यामध्ये कार्य करणाऱ्या शक्तीने फारच फार करावयास जो शक्तिमान आहे, त्याला पिढ्यानपिढ्या मंडळीत व ख्रिस्त येशूमध्ये युगानुयुग गौरव असो (इफिस ३:२०,२१).

# प्रकरण १०

# देवाचा विश्वासूपणा

## सर्व गोष्टीत सर्व समयी विश्वासू

सध्याच्या वाईट दिवसात चटकन लक्षात येणारे एक पाप म्हणजे अविश्वासूपणा. व्यापाराच्या विश्वात तर माणसाने शब्द पाळणे पराकाष्ठेचे दुर्मिळ झाले आहे, आणि ते बंधनकारकही राहिलेले नाही. जगाच्या समाजजीवनात, वैवाहिक संबंधात सर्वत्र अप्रामाणिकपणा आढळून येतो. एखादे जुने झालेले वस्त्र फेकून द्यावे तशी वैवाहिक बंधने क्षुल्लक कारणांनी तोडण्यात येतात. उपदेशकांच्या क्षेत्रात हजारो जण गांभीऱ्याने सत्य घोषित करण्यास करारबद्ध झाले असूनही त्या सत्यावर हल्ले झाल्यास त्यांच्या मनाला काही टोचणी न लावता प्रतिहल्ला न करता ते सत्य नाकारतात. या भयानक पापापासून वाचक किंवा लेखकही मुक्त नाहीत. कितीतरी प्रकारांनी आपण ख्रिस्ताशी अविश्वासू राहिलो आहोत. देवाने आपल्याकडे दिलेला प्रकाश व सोपवलेल्या संधींशी किती अविश्वासू राहिलो आहोत! धुळधाण झालेल्या या देखाव्यावरून आपली नजर वर करून अवर्णनीय आशीर्वादाकडे लावल्यास किती ताजेतवाने वाटेल! कारण तो विश्वासू देव, सर्व गोष्टीत विश्वासू, सर्व समयी विश्वासू राहणारा देव तुमच्या नजरेस पडेल.

"हे लक्षात घे की तुझा देव परमेश्वर हाच देव आहे, तो *विश्वसनीय* देव आहे" (अनुवाद ७:९). त्याचा हा मूलभूत गुण आहे. या गुणाशिवाय तो देवच असू शकत नाही. कारण देव अविश्वासू असणे हे त्याच्या स्वभावाविरुद्ध आहे. असे असणे अशक्य आहे. "आपण अविश्वासी झालो तरी तो विश्वासू राहतो, कारण त्याला स्वत:विरुद्ध वागता येत नाही" (२ तीमथ्य २:१३). विश्वासूपणा हा त्याच्या अस्तित्वाचे परिपूर्ण गौरव आहे. त्याने ते वस्त्राप्रमाणे पांघरले आहे: "हे सेनाधीश देवा, परमेश्वरा, हे परमेशा, तुझ्यासारखा समर्थ कोण आहे? तुझी विश्वसनीयता *तुझ्याभोवती* आहे" (स्तोत्र ८९:८). जेव्हा देव देहधारी होण्याविषयी तसेच म्हटले, "धार्मिकता त्याचे वेष्टन व सत्यता त्याचा कमरबंद होईल" (यशया ११:५).

स्तोत्र ३६:५ चे शब्द तर पाहाच, "हे परमेश्वरा, तुझे वात्सल्य आकाशापर्यंत पोहोंचले आहे. तुझी विश्वसनीयता गगनाला जाऊन भिडली आहे. "देवाच्या न बदलणाऱ्या विश्वासूपणाची व्याप्ती सर्वाधिक महत्त्वाची आहे. देवाविषयी सारे काही महान, विस्तीर्ण व अतुलनीय आहे. तो कधी विसरत नाही, कधी अपयशी होत नाही, तो कधी चुकत नाही, त्याचा शब्द त्याने न पाळल्याबद्दल त्याला दंड झाला असे होऊ शकत नाही. प्रभू आपल्या जाहीर केलेल्या प्रत्येक अभिवचनाला किंवा भाकिताला अचूक चिकटून आहे. त्याच्याशी संबंधित असलेला प्रत्येक करार किंवा इशारा भलेच करणारा आहे. कारण "देव काही मनुष्य नाही की त्याने लबाडी करावी; तो काही मानवपुत्र नाही की त्याने अनुताप करावा. दिलेले वचन तो पाळणार नाही काय? दिलेला शब्द तो पुरा करणार नाही काय?" (गणना २३:१९). म्हणूनच विश्वासी व्यक्ती उद्गारते, "त्याच्या करुणेत खंड पडत नाही. ती रोज नवी होते. तुझी विश्वसनीयता थोर आहे" (विलापगीत ३:२२-२३).

देवाचे वचन त्याच्या विश्वासूपणाची भरपूर उदाहरणे देते. चार हजारांहून अधिक वर्षांमागे त्याने म्हटले आहे, "पृथ्वी राहील तोवर पेरणी व कापणी, थंडी व ऊन, उन्हाळा व हिवाळा, दिवस व

रात्र ही व्हावयाची राहणार नाहीत." (उत्पत्ती ८:२२). दर वर्षी ती होत राहतात, ही देव त्याचे अभिवचन पूर्ण करत असल्याची साक्ष आहे. उत्पत्ती १५ मध्ये यहोवाने अब्राहामाला जाहीर केले की, "तू निश्चितपणे समज की जो देश स्वत:चा नाही अशा देशात तुझे संतान उपरी होऊन राहील व तेथल्या लोकांचे दास्य करील...तुझ्या चौथ्या पिढीचे लोक इकडे माघारे येतील" (उत्पत्ती १५:१३-१६). काही शतके त्यांची कष्टात गेली. मिसरातील विटभट्ट्यांमध्ये अब्राहामाचे संतान कण्हत होते. देव त्याचे अभिवचन विसरला होता का? नाही. मुळीच नाही. निर्गम १२:४१ वाचा. "चारशे तीस वर्षे संपली त्याच दिवशी परमेश्वराच्या सर्व सेना मिसर देशातून निघाल्या. "यशयाद्वारे देवाने घोषित केले की "पाहा, कुमारी गर्भवती होऊन पुत्र प्रसवेल, त्याला इम्मानुएल म्हणतील" (यशया ७:१४). पुन्हा काही शतके गेली, पण "काळाची पूर्णता झाली तेव्हा देवाने आपल्या पुत्राला पाठवले; तो स्त्रीपासून जन्मलेला...होता (गलती ४:४).

देव सत्य आहे.त्याची अभिवचनाची वचने सत्य आहेत. आपल्या लोकांशी प्रत्येक संबंध जोडण्यात देव विश्वासू आहे. आपण सुरक्षितपणे त्याच्यावर अवलंबून राहू शकतो. कोणीही आजवर त्याच्यावर ठेवलेला विश्वास व्यर्थ गेला नाही. विश्वसनीयता हे दैवी गुणविशेषांचे मूलभूत अंग आहे हे त्याच्या लोकांना समजावे म्हणून हे मोलवान सत्य देवाच्या वचनात ठिकठिकाणी स्पष्ट केलेले दिसते. आपल्या त्याच्यावरील विश्वासाचा हा मूलभूत पाया आहे. पण देवाच्या विश्वसनीयतेचे हे दैवी सत्य स्वीकारणे ही एक गोष्ट झाली आणि त्यानुसार कृती करणे ही दुसरी गोष्ट झाली. देवाने आपल्याला "अतिशय मोलवान व महान अभिवचने दिली आहेत" पण त्यांची परिपूर्ती होण्यावर आपण खरोखर अवलंबून राहतो का? त्याने जे काही म्हटले आहे ते सर्व तो आपल्यासाठी करणार अशा उत्कंठेने आपण अपेक्षा करतो का? "कारण ज्याने वचन दिले तो *विश्वसनीय* आहे,'' (इब्री १०:२३) या वचनावर आपण तक्रार न करता खात्रीपूर्वक विसावतो का?

## जेव्हा अडचणी येतात

सर्वांच्या, अगदी ख्रिस्ती व्यक्तींच्या जीवनातही एक काळ असा येतो की जेव्हा देव विश्वसनीय आहे असा विश्वास धरण्याइतके सर्व काही सोपे नसते. आपल्या विश्वासाची कसून परीक्षा केली जाते; आपली दृष्टी अश्रूंमुळे अंधुक झालेली असते, आणि आपल्याला देवाच्या प्रेमाच्या कृतीचा मागमूस लागत नसतो. जगाच्या अनेक आवाजांनी आपल्या कानांना व्यत्यय येत असतो. सैतानाच्या नास्तिक विचारांची कुजबुज हैराण करून टाकत असते, आणि देवाची शांत, मंद, गोड वाणी आपल्या कानांना ऐकू येत नसते. जोपासलेल्या योजनांना उघडपणे धाक दाखवला जातो, ज्या मित्रपरिवारावर आपण अवलंबून राहिलेले असतो त्यांनी धोका दिलेला असतो, ख्रिस्तामधील बांधव म्हणवणाऱ्यांनी विश्वासघात केलेला असतो, आपला थरकाप उडालेला असतो. आपण देवाशी विश्वासू राहण्याची खटपट केलेली असते आणि आता काळ्या मेघाने त्याला आपल्यापासून झाकलेले असते. आपल्याला ह्या साऱ्याचा दैहिक कारणांमुळे, त्याच्या रागीट मुद्रेतील तरतूदी व त्याची कृपावचने यात मेळ घालणे कठीण व अशक्य वाटते. हे चुका करणाऱ्या व गंभीरपणे कसोटीस लावण्यात आलेल्या माझ्या सोबतीच्या वाटसरू, यशया ५०:१०कडे लक्ष लावण्यास कृपेची याचना कर, "परमेश्वराचे भय बाळगून त्याच्या सेवकाचे ऐकणारा असा तुमच्यामध्ये कोण आहे? जो अंधारात चालतो, ज्याला प्रकाश मिळत नाही त्याने परमेश्वराच्या नामावर भाव ठेवावा, *आपल्या देवाचा आश्रय करावा*."

जेव्हा तुम्हाला देवाच्या विश्वसनीयतेविषयी शंका येते, तेव्हा ओरडून म्हणा, "अरे सैताना, निघून जा." जर तुम्ही देवाची रहस्यमय वागणूक व त्याने उघडपणे दिलेली त्याच्या प्रेमाची कबुली यांचा

आता मेळ घालू शकत नसला तर आणखी थोडी त्याची वाट पाहा. तो त्याच्या योग्य समयी तुम्हाला सर्व स्पष्ट करील. "मी करतो ते तुला आता कळत नाही; ते तुला पुढे कळेल" (योहान १३:७). परिणामी देव हेच प्रदर्शित करील की त्याने त्याच्या मुलांना सोडून टाकून दिले नाही की फसवलेही नाही." ह्यामुळे परमेश्वर तुम्हावर प्रसन्न होण्यास विलंब लावील, तुम्हावर करुणा करावी म्हणून उच्चस्थानी आरूढ होईल; परमेश्वर न्यायी देव आहे; जे त्याची वाट पाहातात ते धन्य" (यशया ३०:१८).

*प्रभुचा नको करूस न्याय, अल्प जाणीवेने*
*ठेव त्याजवर भाव, कृपेसाठी*
*सार्वभौमत्वाच्याच्या रागीट मुद्रेमागे*
*आहे त्याचे स्मितहास्य लपलेले*

*भयग्रस्त संता, धर पुन्हा धाडस*
*मेघांना ज्या भितोस एवढा*
*दयापूर्णतेने त्याच्या फुटतील ते*
*होतील मस्तकी तुझ्या आशीर्वाद ते.*

" तू आपले निर्बंध न्याय्य व परिपूर्ण विश्वसनीय असे लावून दिले आहेत." (स्तोत्र ११९:१३८). देवाने आपल्याला फक्त उत्तम तेच सांगितले असे नाही तर अत्यंत जे वाईट तेही सांगायचे आवरून धरले नाही. पतनाच्या परिणामामुळे जे नाश पावले त्याचे वर्णनही त्याने विश्वासूपणे करून ठेवले आहे. पापाने निर्माण झालेल्या भयानक अवस्थेचे त्याने विश्वासूपणे निदान सांगून ठेवले. अधर्माच्या सवयींमध्ये दृढमूल होण्याचा तिटकारा त्याने विश्वासूपणे निदर्शनास आणून दिला; व त्याबद्दल शासन करणे त्याला भाग असल्याचेही सांगितले. तो "भस्म करणारा अग्नी असल्याचा" (इब्री १२:२९) त्याने विश्वासूपणे इशारा दिला. त्याने दिलेल्या अभिवचनांची पूर्तता होण्याविषयी भरपूर उदाहरणे देवाचे वचन देते पण त्याचे इशारे विश्वासूपणे कल्याण करत असल्याचीही असंख्य उदाहरणे देते. इस्राएलांच्या इतिहासाच्या प्रत्येक टप्प्यावर हे गंभीर सत्य उदाहरणादाखल दिसते. तीच गोष्ट अनेक व्यक्तींच्या जीवनातून दिसते. फारो, कोरह, आखान आणखी कितीतरी पुरावे उदाहरणादाखल देता येतील. माझ्या वाचका, *तुझ्या* बाबतीतही तसेच होईल. जर तू आश्रयासाठी ख्रिस्ताकडे धाव घेतलीस तर ठीक. न घेतलीस तर सार्वकालिक अग्नीचे सरोवर नक्कीच तुझ्या वाट्याला येईल. देव विश्वसनीय आहे.

## विश्वासूपणा प्रदर्शित केला

देव आपल्या लोकांचे *रक्षण* करण्यात विश्वसनीय आहे. "ज्याने स्वपुत्र येशूख्रिस्त आपला प्रभू ह्याच्या सहभागीपणात तुम्हाला बोलावले तो देव विश्वसनीय आहे" (१ करिंथ १:९). त्यापूर्वीच्या वचनात अभिवचन दिले आहे की देव आपल्या लोकांना शेवटपर्यंत दृढ राखील. विश्वासीयांचे पूर्ण संरक्षण त्यांच्या बलाच्या किंवा त्यांच्या निर्धाराच्या किंवा सुरक्षित राहण्याच्या त्यांच्या क्षमतेच्या पायावर नव्हे; तर जो सत्य असून खोटे बोलत नाही त्याच्या विश्वसनीयतेवर आहे असा या प्रेषिताचा भरवसा आहे. देवाने त्याच्या पुत्राला काही लोक वतनादाखल देण्याचे वचन दिले आहे. त्यांना पापापासून व दंडाज्ञेपासून मुक्ती देऊन, सार्वकालिक गौरवी जीवनाचे वाटेकरी करून घेण्यासाठी त्यातील कोणाचाही तो नाश होऊ देणार नाही हे नक्की.

देव आपल्या लोकांना *शिस्त लावण्यात* विश्वासनीय आहे. तो जे आवरून धरतो त्यात तो विश्वासू आहे, तो जे देतो त्यात काही कमी पडू देत नाही. तो दु:ख पाठवण्यात तसेच आनंद देण्यातही विश्वासू आहे. देव विश्वसनीय आहे ह्या सत्याची आपण केवळ सारे काही सुरळीत चाललेले असताना कबुली द्यायची नसून जेव्हा त्याने कडक कानउघाडणी केल्याने आपल्याला चुटपुट लागलेली असते तेव्हाही ही कबुली द्यायची. आपली ही कबुली फक्त तोंडाने नसावी तर अंत:करणपूर्वक असावी. जेव्हा देव शिक्षेच्या काठीने तडाखा देतो, तेव्हा तो *विश्वसनीयतेने* आपल्याला चालवत असतो. हे जाणून घेणे म्हणजे त्याच्यासमोर नम्र होणे, आपण त्याच्या या शिक्षेला पात्र असल्याची जबाबदारी स्वीकारणे, आणि तक्रार कुरकुर न करता त्या शिक्षेसाठी आभार मानणे होय. देव विनाकारण संकट पाठवत नसतो. "या कारणास्तव तुम्हामध्ये पुष्कळ जण दुर्बल व आजारी आहेत" (१ करिंथ ११:३०). या तत्त्वाचे उदाहरण देताना पौल हे बोलत आहे. जेव्हा त्याची काठी आपल्यावर पडते तेव्हा आपण दानीएलासोबत म्हणू या "हे प्रभो न्यायत्व काय ते तुझ्याच ठायी आहे; पण आमच्या तोंडाला काळोखी लागली आहे" (दानीएल ९:७).

" हे परमेश्वरा, तुझे निर्णय न्यायानुसार आहेत, आणि *सत्यतेने* तू मला पीडले आहे हे मी जाणतो" (स्तोत्र ११९:७५). सार्वकालिक करारातील प्रतिज्ञेनुसार देवाची प्रीती संकट व क्लेशांशी निगडित आहे एवढेच नव्हे तर त्या कराराच्या व्यवस्थापनेचा ते भाग आहेत. त्या संकटात तग धरण्यासाठीही देव विश्वासू असतो आणि ती पाठवण्यातही तो विश्वासू असतो." तर मी त्यांच्या अपराधांचे शासन दंडाने करीन, त्यांच्या अनीतीचे शासन फटक्यांनी करीन; तरी त्याच्यावरील माझी दया मी दूर करणार नाही, मी आपल्या सत्यवचनांचा भंग करणार नाही" (स्तोत्र ८९:३२,३३). शासन देवाच्या प्रेमदयेमुळे समेट करू शकते पण त्या शासनाचा ती प्रेमदया परिणाम व प्रदर्शित होणेही असते. जर देवाच्या लोकांनी लक्षात ठेवले की त्याच्या कराराची प्रीती त्यांना प्रसंगानुरूप शासन करण्यास त्याला बंधन घालते तर देवाच्या लोकांची मने कितीतरी शांतता पावतील. संकटक्लेश आपल्यासाठी आवश्यक आहेत: "ते संकटसमयी माझा धावा कळकळीने करतील" (होशेय ५:१५).

देव आपल्या लोकांचे *गौरव करण्यात* विश्वासू आहे. "तुम्हास पाचारण करणारा विश्वसनीय आहे; तो हे करीलच करील" (१ थेस्सलनी ५:२४). याचा आधीच्या वचनाशी संबंध आहे: "आपला प्रभू येशु ख्रिस्त ह्याच्या आगमनसमयी तुमचा आत्मा जीव व शरीर यथासांग अशी राखली जावोत" देव आपल्या गुणवत्तेच्या आधारावर आपल्याला वागणूक देत नाही, (कारण आपल्यात काही नाहीच) तर त्याच्या महान नामास्तव तो वागवतो. देव सतत त्याच्या व त्याच्या कृपेच्या उद्देशासाठी कार्यरत असतो: "ज्यांना त्याने पाचारण केले...त्यांचे त्याने गौरवही केले" (रोम ८:३०). पुरते फलदायी होण्यासाठी देवाने आपल्या निवडलेल्यांना पाचारण करून अंध:कारातून आपल्या अद्भुत प्रकाशात आणले. यातून देव आपल्या निवडलेल्यांसाठी सातत्याने असलेले आपले सार्वकालिक चांगुलपण प्रदर्शित करतो. त्यामुळे या निवडलेल्यांना हे चांगुलपण असेच चालू राहणार याविषयी खात्री असायलाच हवी. "देवाने घातलेला स्थिर पाया *टिकून राहतो*" (२ तीमथ्य २:१९). पौल पुढील वाक्य तो देवाच्या विश्वासूपणावर विसावलेला असताना बोलतो. "मी ज्याच्यावर विश्वास ठेवला आहे, त्याला मी जाणतो आणि तो माझी ठेव त्या दिवसासाठी राखावयास शक्तिमान आहे असा मला भरवसा आहे" (२ तीमथ्य१:१२).

## देवाच्या विश्वसनीयतेवर भरवसा

या आशीर्वादित सत्याचे आकलनच आपल्याला सर्व चिंतांपासून *राखील*. सतत चिंताग्रस्त असणे, आपली सध्याची परिस्थिती भावी काळात काळीकभिन्न आपत्ती घेऊन येत आहे अशाच विचारात सतत राहाणे, उद्याच्या चिंता गृहीत धरून त्यांच्याकडे खेदाने पाहात राहणे, हे देवाच्या विश्वासूपणावर असमाधानकारकपणे ठपका ठेवण्यासारखे आहे. ज्याने मागील सर्व वर्षे त्याच्या मुलाची काळजी घेतली तो वृद्धपणी त्याला टाकणार नाही. ज्याने गत काळी तुमच्या प्रार्थना ऐकल्या तो आता तुमच्या तातडीच्या गरजा पुरवण्यास नकार देणार नाही. ईयोब ५:१९ मधून समाधान घ्या. "तो तुला सहा संकटातून *सोडवील*; सातांनी तुला अपाय होणार नाही."

या आशीर्वादित सत्याचे आकलनच आपल्या *कुरकुरींवर* नियंत्रण ठेवील. आपल्या प्रत्येकासाठी उत्तम काय आहे ते प्रभू जाणतो. आणि या सत्यावर विसावण्याचा एक फायदा म्हणजे आपले क्षुल्लक कारणांवरून तक्रार करून चिडणे शांत होईल. जेव्हा आपण संकटातून व शिक्षेतून जात असताना देवाविषयी उत्तम विचार करत राहतो, त्याचे ज्ञान व न्याय यांची सत्यता शाबीत करतो, आणि आपल्या कानउघडणी मागील त्याची प्रीती ओळखतो तेव्हा देवाचा महान सन्मान होतो.

या आशीर्वादित सत्याचे आकलनच आपल्यामध्ये देवावरील वाढता *विश्वास* उत्पन्न करील. "ह्यामुळे देवाच्या इच्छेप्रमाणे दु:ख भोगणाऱ्यांनी सत्कृत्ये करीत आपले जीव विश्वासू निर्माणकर्त्याला सोपवून द्यावे" (१ पेत्र ४:१९). जेव्हा आपण देवावर भरवसा टाकून स्वत:मधून माघार घेऊन सर्व कारभार त्या देवाच्या हाती सोपवून देऊ, त्याच्या विश्वासूपणाचा व प्रीतीचा पाठपुरावा करू तेव्हा लागलीच होणाऱ्या त्याच्या पुरवठ्याने समाधान पावू व आपल्याला कळून येईल की "तो सर्व काही चांगलेच करतो."

# प्रकरण ११

# देवाचा चांगुलपणा

## प्रकट झालेला देवाचा चांगुलपणा

"देवाचे चांगुलपण अखंड आहे" (स्तोत्र ५२:१). देवाचे चांगुलपण त्याच्या स्वभावाची परिपूर्णता दर्शवते. "देव प्रकाश आहे आणि त्याच्याठायी मुळीच अंधार नाही" (१ योहान १:५). देवाच्या स्वभावात इतकी पूर्णता आहे की तो अधिक चांगला करण्यासाठी त्यात कसलीही कमतरता नाही किंवा काही दोष नाही, की काही भर टाकण्याची गरज नाही.

> तो मुळातच चांगला आहे. चांगुलपण त्याच्या स्वत:चे आहे. ते दुसऱ्या कोणाचे नाही. दुसऱ्या सर्व प्राणिमात्रांचे चांगुलपण त्याला देवाशी वाटेकरी झाल्याने व त्याच्याशी झालेल्या सुसंवादाने प्राप्त होते. पण देव मुळातच चांगला आहे; केवळ चांगला आहे इतकेच नाही तर तोच चांगुलपणा आहे: प्राणिमात्रांचे चांगुलपण हे त्यांना अधिक महत्त्वाची भर टाकून मिळालेले असते. देवाचा तर तो गाभाच आहे. तो अफाट चांगला आहे. प्राणिमात्रांचे चांगुलपण म्हणजे एखादा थेंब. पण देवामध्ये सर्व चांगुलपणा एकवटलेला अथांग महासागरच आहे. तो सदासर्वदा व कधीही बदलणार नाही असा चांगला आहे. तो आहे त्यापेक्षा कमी चांगला होऊ शकत नाही. त्याच्यात काही भर टाकता येत नाही किंवा काही कमी करता येत नाही (थॉमस मॅन्टन).

देव *summum bonum* म्हणजे अत्युच्च चांगला आहे.

आपल्या देव या इंग्लिश शब्दाचा सॅक्सन पोटभाषेत अर्थ आहे, "जो चांगला आहे." देव सर्व अस्तित्वात असलेल्यांमध्ये महान आहे एवढेच नव्हे तर अत्युत्तम आहे. कोणत्याही प्राणिमात्रात असलेले चांगुलपण त्याच्यामध्ये निर्मात्याने ठेवले आहे. पण देवाचे चांगुलपण त्याला कोणापासून प्राप्त झालेले नाही. कारण त्याच्या सार्वकालिक स्वभावाचे ते मर्म आहे. सनातन काळापासून म्हणजे देवाची सर्वसमर्थता प्रदर्शित करण्याची त्याने कोणतीही कृती करण्यापूर्वीपासून, त्याच्या वैपुल्याविषयी सुसंवाद होण्यापूर्वीपासून, किंवा कोणा प्राणिमात्रामध्ये ते ठेवण्यापूर्वीपासून देवाचे सामर्थ्य अथांग असल्यामुळे तो सदासर्वकाळ चांगला आहे. अशा प्रकारे त्याच्या दैवी परिपूर्णतेचे पहिले प्रकटीकरण सर्व अस्तित्वात आणण्यामध्ये आहे. "तू चांगला आहेस व तू चांगले करतोस" (स्तोत्र ११९:६८). देवामध्ये अथांग व कधी न संपणाऱ्या सर्व आशीर्वादांचा, सर्व गोष्टी व्यापून टाकणारा खजिना आहे. सर्वांचा उगम देवापासून आहे — त्याचा संकल्प, त्याची निर्मिती, त्याचे नियमशास्त्र, त्याच्या तरतुदी — चांगल्याशिवाय दुसरे काही असूच शकत नाहीत: कारण असे लिहिले आहे की "आपण केलेले सर्व फार चांगले आहे असे देवाने पाहिले" (उत्पत्ती १:३१). अशा प्रकारे देवाचे चांगुलपण प्रथम निर्मितीत पाहायला मिळते. प्राणिमात्रांचा जितक्या बारकाईने अभ्यास करू तितके त्या निर्मात्याच्या सत्कृत्यांचे स्पष्ट दर्शन घडते. भुतलावरील देवाच्या सर्वोच्च प्राणिमात्राचे — मानवाचे, उदाहरण घेतले तर स्तोत्रकर्त्याबरोबर पुढील शब्द उद्गारण्यास विपुल

कारणे सापडतात, "भयप्रद व अद्भुत रीतीने माझी घडण झाली आहे म्हणून मी तुझे उपकारस्मरण करतो; तुझी कृत्ये अद्भुत आहेत हे माझा जीव पूर्णपणे जाणून आहे" (स्तोत्र १३९:१४). आपल्या शरीररचनेविषयीचे सर्व काही त्यांच्या निर्मात्याच्या चांगुलपणाची साक्ष देतात. त्यांना किती यथायोग्य कामे नेमून देण्यात आली आहेत! थकल्या शरीराला ताजेतवाने होण्यासाठी त्याने निद्रेची व्यवस्था करून ठेवली आहे! आपल्या डोळयांच्या संरक्षणासाठी पापण्या व भुवयांची रचना करण्यामागे त्याची सदिच्छा प्रवृत्ती दिसते! म्हणून आपण अनिश्चित काळातही चालू राहतो.

निर्मात्याचे हे चांगुलपण केवळ मानवाशी निगडित नसून; त्याच्या सर्व प्राणिमात्रांमध्ये ते कार्यरत असलेले दिसते. "सर्वांचे डोळे तुझ्याकडे लागतात; आणि तू त्यांना त्यांचे अन्न यथाकाळी देतोस. तू आपली मूठ उघडून प्राणिमात्रांची इच्छा पुरी करतोस" (स्तोत्र १४५:१५,१६). हे सत्य विस्ताराने सांगण्यास मोठे ग्रंथ लिहिता येतील आणि लिहिण्यात आलेही आहेत. ते आकाशातील पक्षी असोत, की जंगलातील श्वापदे असोत, नाहीतर जलाशयातील मासे असोत; त्यांची प्रत्येक गरज भागवण्यासाठी त्याने विपुल तरतूद केली आहे. "तो सर्व प्राण्यांना अन्न देतो, कारण त्याची दया सनातन आहे" (स्तोत्र १३६:२५). "खरोखर परमेश्वराच्या चांगुलपणाने पृथ्वी भरली आहे" (स्तोत्र ३३:५).

देवाने त्याच्या प्राणिमात्रांना पुरवलेल्या विविध नैसर्गिक सुखातून देवाचे चांगुलपण दिसून येते. आपल्या रसनेंद्रियांना संतुष्ट करणारे अन्न न देता आपली भूक भागवण्यात देवाला संतोष नव्हता — त्याने मांस, भाज्या व फळांमध्ये विविध प्रकारचा स्वाद ठेवला आहे, यातही त्याची सदिच्छा प्रवृत्ती दिसून येते. देवाने आपल्याला केवळ इंद्रिये दिली नाहीत तर तो त्यांना सुखावून आनंदित ठेवतो. यातूनही त्याचे चांगुलपणच निदर्शनास येते. त्याने पृथ्वीचा पृष्ठभाग केवळ सुपिक नव्हे तर रंगीबेरंगी व आनंददायीही ठेवला. आपले शरीर सुंदर फुलांशिवाय जगू शकले असतानाही त्याने आपल्या डोळयांना सुखावणारी व  नाकाला मधूर सुगंध देणारी रंगीबेरंगी फुले निर्माण केली. रानमाळातून जाताना आपल्या कानांवर पक्षांचे सुरेल संगीत पडून त्यांना सलामी दिल्याशिवाय आपल्याला राहावत नाही. पण केव्हा ही आनंददायी मोहकता इतक्या स्वैरपणे निसर्गाच्या मुखावर विखुरण्यात आली? खरोखर प्रभूची दया "त्याच्या सर्व कृत्यांवर आहे" (स्तोत्र १४५:९).

जेव्हा मानवाने त्या निर्माणकर्त्याचे नियम मोडून पाप केले, तेव्हा देवाची अनुमती असलेला त्याचा क्रोध त्याने लागलीच अमलात आणायला सुरुवात केली नाही; यात देवाचे चांगुलपण दिसते. पतित मानवाचे सर्व आशीर्वाद, सर्व सुखे, सर्व आनंद देव हिरावून घेऊ शकत होता. पण उलट तो दया व न्याय यांच्या मिलाफाने मिश्रित अशा निसर्गक्षेत्रात आला. याचा योग्य विचार केला तर हे फारच अद्भुत आहे. जितक्या बारकाईने ह्या क्षेत्राचे परीक्षण करू  तितके अधिक असे आढळेल की "दया न्यायावर विजय मिळवते" (याकोब २:१३). आपल्या पतित अवस्थेत अधर्म तग धरून राहतो तरी चांगुलपणाचे पारडे जडच असते. दुर्मिळ अपवाद सोडता तुलनेने यातना व आजारापेक्षा अधिक काळ आरोग्य उपभोगणाऱ्यांची संख्या मोठी आहे. जगात प्राणिमात्रांना दु:खापेक्षा आनंद अधिक आहे. आपले दु:खही बऱ्यापैकी हलके होत असते. देवाने मानवी मनाला अशी लवचिकता दिली आहे की ज्यामुळे परिस्थितीशी तडजोड करून तो तिचा जास्तीत जास्त फायदा उठवत असतो.

जगात दु:खे व क्लेश आहेत म्हणून देवाच्या सदिच्छा प्रवृत्तीवर आपण प्रश्न उठवू शकत नाही. देवाने चांगुलपण दाखवूनही मानव त्याच्याविरूद्ध पाप करतो तेव्हा तो "देवाचे  चांगुलपण, क्षमा व सहनशीलतेच्या विपुलतेचा अनादर करतो. आपल्या हटवादीपणाने पश्चात्तापहीन अंत:करणाने

देवाचा क्रोध व यथोचित न्याय ह्यांच्या प्रकटीकरणाच्या दिवसासाठी स्वत:करता क्रोध साठवून ठेवतो" (रोम २:४,५), यात स्वत: मानव नाही तर कोण दोषी आहे? देवाच्या आशीर्वादांचा गैरवापर करणाऱ्यांना त्याच्या सदिच्छा प्रवृत्तींना पायदळी तुडवून त्यांचा दुरुपयोग करणाऱ्यांना देवाने शिक्षा केली नाही तर तो चांगला आहे असे म्हणता येईल का? त्याचे आज्ञानियम मोडणाऱ्यांना, त्याचा अधिकार झुगारून देणाऱ्यांना, त्याच्या संदेशांचा उपहास करणाऱ्यांना, त्याच्या पुत्राची थट्टा करणाऱ्यांना आणि ज्यांच्याकरता तो मरण पावला त्यांचा छळ करणाऱ्यांना जेव्हा तो भूतलावरून दूर करील, तेव्हा त्याने असे करण्यात त्याच्या चांगुलपणाचे प्रतिबिंब पडत नाही तर ते उलट उदाहरणासह सिद्ध होऊन अधिक तेजस्वी दिसते.

देवाने आपल्या पुत्राला पाठवण्याच्या उदाहरणात देवाचे चांगुलपण स्पष्ट दिसते. "तो स्त्रीपासून जन्मलेला, नियमशास्त्राधीन जन्मलेला असा होता. ह्यात हेतू हा होता की — आपल्याला पुत्राचा हक्क मिळावा" (गलती ४:४,५). मग स्वर्गातील सैन्याच्या समुदायाने त्यांच्या निर्मात्याची स्तुती करीत म्हटले, "ऊर्ध्वलोकी देवाला गौरव, आणि पृथ्वीवर मनुष्यांत शांती, त्यांजवर त्याचा प्रसाद झाला आहे" (लूक २:१४). शुभवर्तमानामध्ये देवाची कृपा प्रकट झाली आहे. "सर्वांना तारण देणारी देवाची कृपा (ग्रीकमध्ये या शब्दाचा अर्थ देवाचे चांगुलपण किंवा सदिच्छा प्रवृत्ती सूचित करतो) प्रगट झाली आहे" (तीत २:११). देवाने प्रत्येक पाप्याला त्याच्या मुक्ती देणाऱ्या कृपेच्या अधीन आणले नाही म्हणून आपण त्याच्या सऱ्हदयतेवर प्रश्न करू शकत नाही. त्याने तिचा सर्व पतित दूतांवरही वर्षाव केला नाही. त्याने सारेच नाशासाठी ठेवले असते तर त्याचे चांगुलपण प्रतिबिंबित झाले नसते. कोणीही या विधानाला आव्हान दिले तर आम्ही देवाच्या सार्वभौमतेवरील त्याने उत्तरासह केलेला प्रश्न समरणात आणून देऊ: "जे माझे आहे त्याचे मी आपल्या मर्जीप्रमाणे करण्यास मुखत्यार नाही का? अथवा मी उदार आहे हे तुझ्या डोळ्यात सलते काय?" (मत्तय २०:१५).

## प्रभूच्या चांगुलपणाबद्दल त्याचे स्तवन करा

" परमेश्वराच्या दयेबद्दल व त्याने मनुष्यासाठी केलेल्या अद्भुत कृत्यांबद्दल लोक त्याचे उपकारस्मरण करोत" (स्तोत्र १०७:८). देवाच्या सदिच्छा प्रवृत्तीबद्दल त्याचा उपभोग घेणाऱ्यांनी त्याचे उतराई म्हणून निदान कृतज्ञता व्यक्त करणे न्याय्य व आवश्यक आहे. तरीही त्याचे चांगुलपण सातत्याचे व विपुल असल्याने त्याचा फायदा घेणाऱ्या मोठ्या वर्गाकडून कृतज्ञता दाखवली जात नाही. त्याची गांभीऱ्याने प्रशंसा केली जात नाही कारण ते अगदी सर्व सामान्य मार्गांनी कार्यरत होत असते. रोजच आपण ती अनुभवत असल्याने ते आपल्याला तितक्या प्रकर्षाने जाणवत नाही. "त्याच्या विपुलतेचा *तू अनादर* करतोस काय?" (रोम २:४). जेव्हा लोकांना पश्चात्तापी होण्याचे साधन म्हणून चालवण्यात ते वापरले जात नाही तेव्हा उलट देव पापाकडे पूर्ण कानाडोळा करत असल्याचे वाटून घेऊन लोक कठीण ऱ्हदयी बनतात.

> देवाचे चांगुलपण विश्वासी व्यक्तीच्या जीवनाचा प्राण आहे. देवाचे हे श्रेष्ठत्वच आपल्या अंत:करणाला सर्वाधिक स्पर्श करते. त्याचे चांगुलपण सदासर्वकाळ राहते म्हणूनच आपण कधीच निराश होऊ नये:- "परमेश्वर चांगला आहे. विपत्काली तो शरणदुर्ग आहे, जे त्याच्यावर भाव ठेवतात त्यांना तो ओळखतो (नहूम १:७). जेव्हा कोणी आपल्याशी वाईट वागते तेव्हा तर देवाचे अधिक मनापासून आभार मानायला आपल्याला चेतना मिळावी. कारण तो चांगला आहे, आणि आपण तर चांगले असण्यापासून फार दूर आहोत याबाबत आपण जागृत असतो तेव्हा आपण त्यासाठी अधिक आदराने त्याचा धन्यवाद करावा की

तो चांगला आहे. देवाच्या चांगुलपणावरील तातडीचा अविश्वास आपण खपवून घेऊ नये. दुसऱ्या कशावरही प्रश्न उभा राहू दे; ही गोष्ट खात्रीची आहे की यहोवा चांगला आहे. त्याचे संकल्प निरनिराळे असतील पण त्याचा स्वभाव नेहमी सारखाच आहे (सी. एच. स्पर्जन).

# प्रकरण १२

# देवाचा धीर

दैवी गुणवैशिष्ट्यांमधील श्रेष्ठत्वाविषयी तुलनेने या गुणावर इतर गुणांपेक्षा फार कमी लिहिले गेले आहे. पुष्कळ लोक दैवी गुणविशेषांवर विस्ताराने बोलतात पण धीर ह्या गुणाचा उल्लेख मात्र करतात आणि अधिक भाष्य न करता पुढे जातात. याचे काही कारण सांगता येणार नाही. पण देवाचे धीराने सहन करणे हे वैशिष्ट्य देवाची परिपूर्णता, त्याचे ज्ञान, सामर्थ्य किंवा पावित्र्याइतकेच महत्त्वाचे असून तितक्याच आदराने आपण त्याची प्रशंसा केली पाहिजे. हे खरे आहे की प्रत्यक्षात शब्दस्थलदर्शक कोशात इतर गुणविशेषांइतका हा शब्द पुष्कळ वेळा आलेला नाही. पण त्याच्या या कृपेचे गौरव वचनाच्या बहुतेक पानापानांत झळकताना दिसते. पण आपण जर देवाच्या धीराने सहन करण्यावर वरचेवर मनन करत नाही व प्रार्थना करत नाही की आपली अंत:करणे व मार्ग अधिक पूर्णत्वाने त्याच्याशी निगडित व्हावीत तर आपण बरेच काही गमावत आहोत.

इतके लेखक या विषयावर आपल्याला विशेष काही देऊ शकण्यात अपयशी ठरल्याचे प्रमुख कारण दैवी चांगुलपण व दया यापासून हा गुण स्वतंत्रपणे मांडण्यात त्यांना अडचण आली असावी. कारण देवाची कृपा व दया यासोबत देवाचे धीराने सहन करणे पुनःपुन्हा जोडून आलेले दिसते. उदाहरणार्थ निर्गम ३४:६; गणना १४:१८; स्तोत्र ८६:१५ इ. देवाचे धीराने सहन करणे खरे तर त्याच्या दयेचे व्यक्त होणे आहे. आणि या प्रकारे ते वारंवार प्रकट केले आहे हे नाकारता येत नाही. पण धीर व दया ही सारख्याच श्रेष्ठतेची असली, विभक्त करता येत नसली तरी आपण ते मान्य करू शकत नाही. त्यांच्यात भेद करणे अवघड असले तरी देवाचे वचन धीराविषयी काही गोष्टींबाबत विशिष्ट खात्री देते, ती इतर गुणांमध्ये गोवलेली नाही.

## देवाच्या धीराचे वर्चस्व

प्युरिटन स्टीफन शरनॉक देवाच्या धीराची व्याख्या अशी देतात:-

> हा देवाच्या चांगुलपणाचा व दयेचा भाग आहे, तरीही दोहोंपेक्षा भिन्नही आहे. देव चांगुलपणात महान असल्याने सौम्यतेतही महान आहे. सौम्यता हा नेहमीच खऱ्या चांगुलपणाचा सोबती असतो. जितका चांगुलपणा महान तितकी सौम्यता महान. ख्रिस्तासमान पवित्र कोण आहे, आणि ख्रिस्तासमान सौम्य तरी कोण आहे? देवाची मंदक्रोधता ही त्याच्या दयेचीच शाखा आहे. "परमेश्वर कृपाळू व दयाळू आहे; तो मंदक्रोध व अतिदयाळू आहे" (स्तोत्र १४५:८). पदार्थावरील औपचारिक दयेपेक्षा ती निराळी आहे. दया प्राणिमात्राला गरीब, दु:खी मानते. धीर हा प्राणिमात्रांना गुन्हेगार मानतो. दया त्याच्या दारिद्र्यात त्याची कीव करते. तर धीर जे पाप त्या दारिद्र्याला कारणीभूत होते व आणखी पापांना जन्म देते ते पाप सहन करतो.

दैवी धीराची आपण स्वतंत्र व्याख्या करू लागलो तर ती अशी होईल; देव स्वत:वर नियंत्रण ठेवण्यासाठी वापरत असलेले सामर्थ्य. त्याद्वारे तो दुष्टाची दुष्टाई सहन करतो इतकी की त्याची शिक्षा दीर्घ काळ थोपवून धरतो. नहूम १:३ मध्ये आपण वाचतो, "परमेश्वर मंदक्रोध व महापराक्रमी आहे," यावर मि. शरनॉक म्हणतात:

> जगात थोर असलेल्या माणसांच्या वासना पटकन उद्दिपित होतात. त्यांना इजा झाल्यास ते इतके नीच पातळीवर जातात की त्यांना दुखावणाऱ्याचे ते सहनही करू शकत नाहीत किंवा त्या व्यक्तीला क्षमाही करू शकत नाहीत. अशा व्यक्तीमध्ये सत्तेची हाव असते; त्यामुळे चिथावणी मिळताच ती अनुचित वागते. जो राजपुत्र आपल्या वासनांना लगाम घालतो, तो स्वत:चा व त्याच्या प्रजेचाही राजा असतो. देव मंदक्रोध आहे कारण तो महासामर्थ्यवान आहे. त्याच्या स्वत:वरील त्याचे सामर्थ्य त्याच्या प्राणिमात्रांवरील त्याच्या सामर्थ्यापेक्षा काही कमी नाही.'

या वरील मुद्द्यावरून आपण म्हणतो की देवाचा धीर व देवाची दया यात अगदी स्पष्ट भेद आहे. याचा प्राणिमात्रांना भरपूर फायदा होतो. पण देवाचा धीर स्वत:चा सन्मान राखतो. त्याच्या इच्छेने तो स्वत:ला आवर घालतो. तर त्याची दया पूर्णपणे त्याच्या प्राणिमात्रांवरच समाप्त होते. देवाच्या धीराचे श्रेष्ठत्व त्याला तत्काळ सूड न घेता प्रचंड इजा सहन करायला भाग पाडत असते. त्याला धीर धरण्याचे सामर्थ्य असते तसेच न्याय करण्याचेही सामर्थ्य असते. म्हणून दैवी सहनशीलतेसाठी वापरलेल्या हिब्रू शब्दाचा अर्थ नहेम्या ९:१७, स्तोत्र १०३:८ इ. मध्ये "मंदक्रोध " असा आहे. दैवी स्वभावात काही तीव्र इच्छा आहेत असे नाही. पण देवाचे ज्ञान व इच्छा त्याचे उंचावलेले वैभव बनत असलेल्या या सौम्यतेने व गांभीऱ्याने अशी कृती करणे पसंत करते.

आपल्या वरील व्याख्येचा आधार घेऊन आपण याकडे लक्ष वेधू या की जेव्हा कादेश बर्णा येथे इस्राएलांनी भयानक पाप केले व यहोवाला क्रोधविष्ट केले तेव्हा दैवी स्वभावातील या श्रेष्ठत्वामुळेच मोशेने देवाकडे विनवणी केली. त्यावेळी देवाच्या सेवकाला प्रभू म्हणाला," मी त्यांचा मरीने संहार करून त्यांचा वारसा नष्ट करीन" तेव्हा ख्रिस्ताप्रमाणे मध्यस्थी करीत मोशे मध्ये आला आणि विनवणी केली की "तुझ्या म्हणण्याप्रमाणे प्रभूच्या सामर्थ्याची महती दिसू दे; तू म्हटलेच आहेस की परमेश्वर मंदक्रोध ---आहे" (गणना १४:१७). *"मंदक्रोध"* असणे हा देवाचे स्वत:ला आवर घालण्याचे सामर्थ्य असलेला गुण आहे.

पुन्हा आपण रोम ९:२२ मध्ये वाचतो, "आपला क्रोध दर्शवावा व आपले *सामर्थ्य* व्यक्त करावे असे देवाच्या मनात असताना नाशासाठी सिद्ध झालेल्या क्रोधाच्या पात्रांना मोठ्या *सहनशीलतेने* वागवून घेतले." जर देवाने ताबडतोब या पात्रांना नापसंत करून त्यांचे तुकडे केले असते तर त्याचे स्वत:वर नियंत्रण ठेवण्याचे सामर्थ्य इतक्या स्पष्टपणे दिसले नसते. पण त्यांची दुष्टता सहन करून आणि दीर्घकाल त्यांची शिक्षा आवरून धरून देवाचे धीराने सहन करण्याचे सामर्थ्य गौरवाने प्रदर्शित झाले. दुर्जन त्याच्या धीराने सहन करण्याचा अर्थ अगदी वेगळाच लावतात — "दुष्कर्माबद्दल शिक्षा तत्काळ होत नाही म्हणून मानवपुत्रांचे मन दुष्कर्म करण्याकडे प्रवृत्त होते" (उपदेशक ८:११) — पण ते जे तुच्छ लेखतात ते अभिषिक्ताच्या नेत्रांना अत्यंत प्रिय आहे.

"धीर देणारा देव" (रोम १५:५) हे देवाचे आणखी एक शीर्षक आहे. देवत्व अशा प्रकारे प्रदर्शित झाले. पहिली गोष्ट, देव संतासाठी धीराचा व कृपेचा उत्पादक आहे आणि तोच धीर व कृपाही आहे. दुसरी गोष्ट, धीराची ही आणखी एक परिपूर्णता त्याच्यामध्ये आहे. तिसरी गोष्ट, आपल्यासाठी तो नमुनादाखल आहे: "तेव्हा तुम्ही देवाचे पवित्र व प्रिय असे निवडलेले लोक

आहा, म्हणून करुणायुक्त ऱ्हदय, ममता, सौम्यता, लीनता, *सहनशीलता* ही धारण करा" (कलसै ३:१२). मग पुन्हा, "तर मग देवाची प्रिय मुले ह्या नात्याने तुम्ही त्याचे अनुकरण करणारे व्हा" (इफिस ५:१). दुसऱ्याच्या उदासीनतेमुळे वीट येण्याचा मोह झाला, किंवा तुमच्या विरुद्ध वागलेल्याचा सूड घ्यावा असे वाटू लागते, तेव्हा देवाची तुमच्यासंबंधीची अमर्याद सहनशीलता व धीर यांचे स्मरण करा.

## देवाचा धीर — तेव्हा आणि आता

*पाप्यांचा समाचार घेताना* देवाचा धीर व्यक्त झालेला दिसतो. जलप्रलयापूर्वी थक्क करून टाकावे असा तो प्रकट झाला. जेव्हा साऱ्या विश्वातील मानवजात बिघडून गेली होती, दैहिक भ्रष्टतेने आपला मार्ग धरला होता, तेव्हाही देवाने पूर्वसूचना दिल्याशिवाय त्यांचा विध्वंस केला नाही. "देव वाट पाहात होता" (१पेत्र ३:२०). सुमारे १२० वर्षांहून अधिक काळ त्याने वाट पाहिली (उत्पत्ती ६:३). त्या काळात नोहा "नीतिमत्वाचा उपदेशक होता" (२ पेत्र २:५). पुढेही जेव्हा विदेशी लोकांनी निर्मात्याला सोडून निर्मितीची उपासना व सेवा केली; निसर्गनियमांविरुद्ध वागून त्यांनी घृणास्पद अमंगळ कृत्ये केली; (रोम १:१९-२६), त्यामुळे ते अधर्मांनी भरून गेले. तेव्हा देवाने त्यांचा अशा बंडखोरीबद्दल समूळ नाश केला नाही तर "सर्व राष्ट्रांना आपापल्या मार्गांनी चालू दिले व आकाशातून पर्जन्य व फलदायक ऋतू त्यांना दिले" (प्रे. कृ. १४:१६-१७).

*इस्राएलांसही* देवाने अद्भुत प्रकारे आपल्या धीराचे प्रदर्शन केले. प्रथम त्याने चाळीस वर्षे अरण्यात "त्यांचे गैरवर्तन सहन केले" (प्रे. कृ.१३:१८). पुढे कनानात प्रवेश केल्यानंतर त्यांनी सभोवतालच्या राष्ट्रांच्या चालीरीतींचे अनुकरण केले, आणि मूर्तिपूजेकडे ते वळले; म्हणून देवाने जरी त्यांना तीव्र शासन केले तरी त्यांचा संपूर्ण नायनाट केला नाही तर त्यांच्या संकटकाळी त्यांच्यातून मुक्तिदाते उभे केले. त्यांच्या अधर्माने इतका कळस गाठूनही कोणी नव्हे तर देवाच्या अमर्याद धीरानेच त्यांचे सर्व सहन केले. बाबेलच्या बंदीवासात जाईपर्यंत दीर्घकाळ त्याने त्यांच्यावर दया केली. अखेर त्यांच्या बंडखोरीने एवढा कळस गाठला की देवाच्या पुत्रालाच त्यांनी वधस्तंभी दिले. त्यानंतरही ४० वर्षे रोमी त्यांच्याविरुद्ध उठेपर्यंत त्याने वाट पाहिली आणि त्यांनी स्वत:वर न्याय ओढवून घेतला व "स्वत:ला सार्वकालिक जीवनाकरता अयोग्य ठरवले" (प्रे. कृ. १३:४६).

*जगालाही आज* देव किती अद्भुत प्रकारे धीर दाखवत आहे. सर्व बाजूंनी लोक भयाण पापे करत आहेत. देवाचे दैवी नियम पायदळी तुडवले जात आहेत; खुद्द देवाचा उघडपणे धिक्कार होत आहे. जे इतक्या निर्लज्जपणे त्याला अवमानतात त्यांना तो तत्काळ मृत्युचा तडाखा देत नाही याचे मोठे नवल वाटते. निर्लज्जपणे ख्रिस्ताविरुद्ध दुर्भाषण करणाऱ्याला व गर्विष्ठपणे त्याला तुच्छ मानणाऱ्याला तो छाटून का टाकत नाही? त्याच्या लोकांचा छळ करणाऱ्यांना गिळून टाकण्याची भूमीला तो का आज्ञा देत नाही म्हणजे दाथान व अबीरामसारखे ते जिवंतपणी पृथ्वीच्या अधोभागी जाऊन पडतील? आणि धर्मभ्रष्ट ख्रिस्ती जगताचे तरी काय; तिथे सर्व प्रकारची पापे खपवून घेतली जातात; आणि ख्रिस्ताच्या पवित्र नावाखाली ती सर्रास केली जातात? या सर्व तिरस्करणीय गोष्टींचा स्वर्गातून त्याचा नीतिमान क्रोध उतरून त्यांचा अंत का करत नाही? याला एकाच उत्तराची शक्यता आहे ते हे की "नाशासाठी सिद्ध झालेल्या क्रोधाच्या पात्रांना तो *मोठ्या सहनशीलतेने* वागवून घेतो" (रोम ९:२२).

वाचक आणि लेखकांचे  काय? आपल्या जीवनाचा आढावा घेऊ या. वाईट कृत्यांसाठी आपण मोठ्या जमावाचे अनुकरण फार पूर्वीपासून करत आलो आहोत. देवाच्या गौरवाची पर्वा केली नाही; केवळ स्वत:ला संतुष्ट करण्याकरता जगलो. त्याने किती धीराने आपले अधम आचरण सहन केले! त्या कृपेने आपल्याला जळत्या भट्टीतून कोरेकरकरीत असे ओढून काढले. आपल्याला देवाच्या कुटुंबात स्थान दिले. आणि आपल्याला त्याच्या गौरवी सार्वकालिक वतनाचे वारस केले. आपण त्याची परतफेड किती वाईट प्रकारे करतो! आपली कृतज्ञता किती उथळ आहे! आज्ञापालनात आपण किती मंद व आळशी आहोत! किती वरचेवर आपण पतन पावतो! देव विश्वासी व्यक्तीच्या जीवनात उरून राहिलेली दैहिकता का सहन करतो याचे एकच कारण आहे; "तो *आपल्यासाठी* असलेली *सहनशीलता* त्याद्वारे प्रदर्शित करतो" (२ पेत्र ३:९). हा दैवी गुण फक्त या जगातच व्यक्त होत असल्याने त्याचा फायदा आपल्या स्वत:च्या लोकांना मिळावा हे तो पाहातो.

## पवित्र अनुभवांची शाळा

देवाच्या या दैवी श्रेष्ठत्वावर मनन करून आपली  अंत:करणे आपण मृदु करू या. आपला विवेकभाव कोमल बनवू या. आणि देवाच्या पवित्र अनुभवांच्या शाळेत "पवित्र जनांचा धीर" शिकू या. म्हणजे दैवी इच्छेच्या अधीन राहू या आणि सतत सत्कृत्ये करीत राहू या. कळकळीने हे दैवी श्रेष्ठत्व मिळवण्याची खटपट करू या. "ह्यास्तव जसा तुमचा स्वर्गीय पिता पूर्ण आहे तसे तुम्हीही पूर्ण व्हा" (मत्तय ५:४८). या आधीची संदर्भवचने पाहिली तर त्यात ख्रिस्त वैऱ्यांवरही प्रीती करायचा बोध करतो. आपल्याला शाप देणाऱ्यांना आशीर्वाद द्यायला सांगतो. आपला द्वेश करणाऱ्यांचेही चांगले करायला सांगतो. दुर्जनांचीही असंख्य पापे लावून न धरता देव सहन करतो. मग केवळ एकदा दुखावले गेल्याबद्दल आपण सूड घेण्याची इच्छा करावी का?

# प्रकरण १३

# देवाची कृपा

## दैवी स्वभावाची परिपूर्णता

कृपा ही दैवी स्वभावाची परिपूर्णता आहे व ती फक्त निवडलेल्यांसाठीच कार्य करते. जुन्या अगर नव्या करारात देवाची कृपा सर्वसामान्य मानवजातीच्या संदर्भात उल्लेखलेली आढळत नाही. मग निर्मितीच्या खालच्या स्तरांवर तर दिसतच नाही. पुन्हा इथे ती देवाच्या "दयेपेक्षा" निराळी दाखवली आहे. "कारण त्याची दया त्याने केलेल्या सर्व कृत्यांवर आहे" (स्तोत्र १४५:९). कृपा या एकमेव उगमामधून आपल्या निवडलेल्यांकरता देवाची सदिच्छावृत्ती, प्रीती आणि तारण वाहाते. दैवी स्वभावातील या गुणाची व्याख्या अब्राहाम बूथ यांनी द *रेन ऑफ ग्रेस* या त्यांच्या पुस्तकात केली आहे ती अशी:

> कृपा ही देवाची सर्वकाळाकरता अगदी मोफत मेहरबानी आहे; अपराधी व अपात्रांवर ही मेहरबानी होऊन त्यांच्यावरील आत्मिक व सार्वकालिक आशीर्वाद त्यातून व्यक्त होतात.

ज्यांच्यामध्ये कसलीही गुणवत्ता नाही अशांवर देवाच्या दैवी कृपेची सार्वभौम व तारणदायी मेहरबानी कार्य करते आणि *त्यांनी तिची* भरपाई करावी असा आग्रह देखील येथे नाही. ज्यांची स्वत:ची अशी काहीही लायकी नाही, तर केवळ जे वाईटच होण्याच्या व नरकाच्याच पात्रतेचे आहेत; त्यांच्यावर देवाने केलेली ही मेहरबानी. याहून अधिक काहीही नाही. ही कृपा पूर्णपणे गुणवत्ताहीन असलेले, हरवलेले; आकर्षून घेण्यासारखे ज्यांच्यामध्ये काहीही नाही अशावर तिचा वर्षाव होतो. कृपा कोणाही प्राणिमात्राला विकत घेता येत नाही, कमवता येत नाही किंवा जिंकून घेता येत नाही. तसे झाले तर कृपा ही कृपा म्हणून राहूच शकत नाही. "कृपा" प्राप्त होण्याविषयी काहीही बोलताना त्याचा अर्थ असा होतो की ती प्राप्त होण्यासाठी ती व्यक्ती दावा करू शकत नाही, त्या व्यक्तीला ती देणे लागत होती असेही नाही. ती त्याला शुद्ध दान म्हणून, न मागता, इच्छा न करता प्राप्त होते.

प्रेषित पौलाच्या पत्रांमधून देवाच्या या आश्चर्यकारक कृपेचा पूर्ण उलगडा केलेला सापडतो. त्याच्या लिखाणात "कृपा" ही कोणत्याही प्रकारची व स्तरावरील सत्कृत्ये, पात्रता, *सर्व* सत्कर्मे व लायकी त्यांच्या विरोधात रेखाटली आहे. हे रोम ११:६ मध्ये अगदी सुस्पष्ट केले आहे; "आणि जर कृपेने, तर ते कर्मांनी नाहीच; नाहीतर कृपा ही कृपा होणार नाही. पण जर ती कर्मांनी असेल तर ते कृपेने नाहीच; मग कर्मे ही कर्मेच राहणार नाहीत." जसे आम्ल हे अल्कली होऊ शकत नाही तसेच कृपा व कर्मे यांचा संयोग होऊ शकत नाही. "तुमचे तारण कृपेनेच विश्वासाच्या द्वारे झाले आहे, आणि हे तुमच्या हातून झाले नाही तर हे देवाचे दान आहे; आपण आढ्यता बाळगू नये म्हणून कर्मे केल्याने ते झाले नाही" (इफिस २:८-९). जसे पाणी व तेल यांचा मिलाफ होऊ शकत नाही तशी देवाची ही परिपूर्ण मेहरबानी मानवाच्या गुणवत्तेशी मुळीच संबंधित नाही (रोम ४:४-५ वाचा).

दैवी कृपेच्या स्वभावगुणाची तीन तत्त्वे आहेत. पहिले, कृपा ही *सार्वकालिक* आहे. कृपा कार्यरत करण्यापूर्वी योजण्यात आली होती, ती देऊ करण्यापूर्वीच तिचा संकल्प झाला होता. जगाचा प्रारंभ होण्यापूर्वीच आपल्याला ती ख्रिस्तामध्ये देण्यात आली होती (२ तीमथ्य १:९). दुसरे, कृपा ही *मोफत* आहे. ती कधीही कोणी विकत घेतली नाही: "ते कृपेने विनामूल्य नीतिमान ठरतात" (रोम ३:२४). तिसरे, ती कृपा *सार्वभौम* आहे. कारण देवाने त्याच्या इच्छेस येईल त्यांच्यावर ती कार्यरत करून तिचा वर्षाव केला. "ख्रिस्त प्रभू याच्या कृपेद्वारे राज्य करावे" (रोम ५:२१). जर कृपा राज्य करते तर ती राजासनावर आहे. आणि राजासनावर बसणारा सार्वभौम आहे. म्हणून ते "कृपेचे राजासन" आहे (इब्री ४:१६).

## देवाची सार्वभौमत्वाने निवड

कृपा *गुणवत्ता न पाहता केलेली मेहरबानी* असल्याने ती सार्वभौमत्वाने कार्यरत झाली पाहिजे. म्हणून देव घोषित करतो की "ज्याच्यावर कृपा करायची त्याच्यावर मी कृपा करीन" (निर्गम ३३:१९). जर देवाने आदामाच्या संपूर्ण संतानाला कृपा दाखवली असती तर लगेच लोकांनी निष्कर्ष काढला असता की देवाने मानवाला पापात पडायची मुभा दिली म्हणून त्याची भरपाई करायला मानवजातीला योग्य ठरवून स्वर्गात नेणे देवाला भाग पडले. पण हा महान देव त्याच्या कोणाही निर्मितीच्या ऋणात राहात नाही. त्याच्याशी बंडखोरी करणाऱ्याच्या तर मुळीच नाही.

सार्वकालिक जीवन हे *दान* आहे. त्यामुळे ते सत्कर्मांनी कमवता येत नाही की हक्क म्हणून त्यावर दावा करता येत नाही. तारण हे जर देवाचे दान आहे तर ते कोणावर वर्षावे हे देवाला सांगण्याचा अधिकार कोणाला आहे? जे हे दान प्राप्त करून घेण्याची त्याच्या सर्व नेमून दिलेल्या नियमांना धरून पूर्ण मनाने खटपट करतात अशांना हा दाता ते दान नाकारत नाही. मुळीच नाही. त्याने नेमल्यानुसार रिक्तहस्ते त्याच्याकडे येणाऱ्याला तो धिक्कारत नाही. परंतु जगातील पश्चात्ताप न करणाऱ्या व अविश्वासी बंडखोरांमधून मर्यादित संख्येने काहींना निवडून त्यांचे तारण करण्याचे कार्य देवाने त्याच्या सार्वभौमतेने केले; तर त्यात कोणाचे चुकले? जे देवाच्या दानाची किंमत करत नाहीत अशांवर जबरदस्तीने ते दान देण्यास देव कोणाच्या *ऋणात* आहे का? ज्यांनी *आपल्याच मार्गाने जाण्याचा निर्धार* केला आहे अशांवर देव तारणाची सक्ती करू शकतो का?

मानवावर सार्वकालिक, मोफत व पूर्णपणे दैवी सार्वभौमत्व असलेली कृपा दिली जाण्याने दैहिक मानवामध्ये एवढेच घडते की त्याचे जन्मापासूनच दृढमूल झालेले देवाशी असलेले शत्रुत्व उफाळून पृष्ठभागावर येते. निर्मितीचा सल्ला न घेता युगारंभापूर्वीच देवाने आपला संकल्प तयार केला ही गोष्ट भग्न न पावलेल्या अंत:करणांना नमवणारी आहे. मानवाला देवाची कृपा कमवता येत नाही किंवा कोणत्याही प्रयत्नांनी ती जिंकून घेता येत नाही ही गोष्ट स्वधार्मिक लोकांना अगदीच रिकामे करणारी आहे. कृपा तिला ज्यांच्यावर स्वखुषीने मेहरबानी करायची आहे, अशांना निवडून बाजूला काढते ही गोष्ट गर्विष्ठ बंडखोरांमध्ये प्रखर निषेध निर्माण करते. माती उठून कुंभाराला विरोध करत प्रश्न करते, "तू मला असे का घडवले?" स्वैराचार करणारा बंडखोर धाडस करून दैवी सार्वभौमत्वाच्या न्यायाला प्रश्न करतो.

ज्यांना आपली उच्च मेहरबानी प्राप्त होण्यासाठी देवाने आपल्या सार्वभौमत्वाने निवडून वेगळे केले त्यांचे तारण करण्यात देवाची विलक्षण कृपा दिसून येते. "वैशिष्ट्यपूर्ण" म्हणजे ती कृपा भेद करते, फरक करते, कोणाला निवडते तर इतरांना ओलांडून जाते. याच "वैशिष्ट्यपूर्ण" कृपेने देवाने अब्राहामाला मूर्तिपूजक शेजारवासीयांमधून निवडले व त्याला "देवाचा मित्र बनवले". त्याच्या

याच वैशिष्ट्यपूर्ण कृपेने "जकातदार व पाप्यांचे" तारण केले, पण धार्मिक परूश्यांना म्हटले, "त्यांना असू द्या" (मत्तय१५:१४). देवाच्या मोफत व सार्वभौम कृपेचे गौरव त्याच्या अयोग्य व अपात्र जनांवर डोळ्यात भरेल असे कशाहीपेक्षा सर्वाधिक तळपताना दिसते. जेम्स हर्वे (१७५१) याचे सुरेख उदाहरणासह स्पष्टीकरण करतात;

स्वर्गाच्या दरबारातील घोषणा म्हणते की, जेथे पाप विपुल होते तेथे कृपा अधिक झाली. मनश्शे हा रानटी श्वापदच होता. कारण त्याने आपल्या पोटच्या मुलांचा अग्नीत होम केला व यरुशलेमातून निरपराध्यांच्या रक्ताचे पाट वाहवले. तो अधर्मात प्रवीण होता. कारण त्याने स्वत: पवित्र गोष्टींचा व धर्मविषयक पूज्य भावनांचा बहुत व अमर्याद पातळीवर अनादर केला आणि शिवाय प्रजेचीही सिद्धांत व तत्त्वे यांचा विपर्यास करून ती विषारी केली व त्यांना अत्यंत तिरस्करणीय मूर्तिपूजक विदेश्यांपेक्षाही अधिक वाईट बनवले (२ इतिहास ३३). तरीही या अतिविपुल कृपेमुळे तो नम्र झाला, तो सुधारला, व प्रीतीने क्षमा पावून देवाचे मूल झाला आणि अविनाशी गौरवाचा वारस झाला.

तो कटू व रक्तपाती छळवादी शौल पाहा; धाकदपटशाचे फुत्कार टाकत व कत्तल करण्याच्या निर्धाराने त्याने येशूच्या कोकरांना चिंताग्रस्त केले व त्याच्या शिष्यांना मारून टाकले. त्याने प्रचंड अनर्थ माजवला. कित्येक निरपराध कुटुंबे त्याने उध्वस्त करून टाकली होती. एवढ्याने त्याचा सूडी आत्मा शांत झाला नाही. त्याला ही चटक लागली होती. उलट आता त्याला अधिकच रक्तपाताची भूक लागली आणि या मार्गाचा तो अधिक त्वेशाने पाठपुरावा करू लागला आणि अधिक विध्वंस करण्यासाठी त्याचा जीव लुलपू लागला. हिंसेची व खुनाची त्याला अजुनही तहान होती. त्याची तहान इतकी उत्कट व अतृप्त होती की तो अजुनही धमक्या देणे व घात करणे याविषयीचे तो फुत्कार टाकत होता (प्रे कृ ९:१). त्याचे शब्द बाणासारखे व भाल्यासारखे आणि त्याची जीभ तीक्ष्ण तलवारीसारखी दिसते. ख्रिस्ती लोकांना धमकी देणे त्याला हवेत फुत्कार टाकण्यासारखे स्वाभाविक वाटते. पण नाही, ते तर दर तासाला त्याच्या अंत:करणातील दीर्घद्वेशामुळे व उद्दिष्टांमुळे घायाळ होऊन रक्त सांडत होते. केवळ सत्तेच्या लालसेपोटी त्याचा प्रत्येक फुत्कार, उच्चारलेला प्रत्येक शब्द होता, व लोक ठार होत होते त्यात अनेक शिष्य बळी जात होते. जगाच्या न्यायाच्या सिद्धांतानुसार त्याला कोणी क्रोधाचा प्याला व आगामी काळासाठी अटळ विनाश असे संबोधले नसते? पण तसे झाले नाही. कोणी असा न्याय दिला नसता की अगदी वजनातल्या वजनी साखळदंडांनी त्याला जखडून जगातली जी खोल अंधार कोठडी अशा खऱ्या धर्माशी शत्रुत्व करणाऱ्यांना बंदिस्त करण्यासाठी सिद्ध आहे तिच्यात त्याला टाका? तेही झाले नाही. म्हणूनच त्या कृपेच्या अथक भांडाराला आदराने आपण वंदन करू या — अशा या शौलाचा प्रवेश संदेष्ट्यांच्या सहभागितेत करण्यात आला, थोर रक्तसाक्षांच्या पलटणीत त्याची गणना करण्यात आली, तो प्रेषितांच्या सोबतीतील एक लक्षणीय व्यक्ती झाला.

करिंथकर लज्जास्पद दुष्टतेत होते (त्यांच्याबाबत ही म्हणच प्रचलित झाली होती). त्यांच्यातील काहींमध्ये अत्यंत घाणेरडे, निंद्य दुर्गुण होते. आणि नीतिनियम झुगारून अन्यायाची कृत्ये करण्याची त्यांना सवयच झाली होती. हे सारे मानवी स्वभावाला दूषण देणारे होते. तरीही हे हिंसेचे व देहवासना तृप्त करण्याचे गुलाम झालेले पुत्र धुतले गेले, नीतिमान ठरवले गेले व त्यांचे पवित्रीकरण झाले (१करिंथ ६:९-११). मुक्तिदात्याच्या मरणाने सांडलेल्या मोलवान रक्तात ते धुतले गेले, धन्यवादित आत्म्याच्या सामर्थ्यशाली

कार्यामुळे त्यांचे पवित्रीकरण झाले, तर अफाट कोमल असलेल्या दयामय देवाच्या कृपेने ते नीतिमान ठरले गेले. जे पूर्वी भूमीला भार होते ते आता स्वर्गाला आनंद व दुतांना हर्ष असे झाले.

आता देवाची कृपा *प्रभू येशू ख्रिस्तामध्ये, त्याच्यामधून व त्याच्याद्वारे* प्रगट झाली. "नियमशास्त्र मोशेच्या द्वारे देण्यात आले पण कृपा व सत्य येशू ख्रिस्ताच्या द्वारे आली" (योहान १:१७). याचा अर्थ असा नाही की देवाचा पुत्र मानवधारी होण्यापूर्वी देवाची कृपा कार्यरत नव्हती — उत्पत्ती ६:८; निर्गम ३३:१९ इ. मध्ये ते स्पष्ट दिसते. परंतु जेव्हा मुक्तिदाता या भूतलावर आला व वधस्तंभावर मरण पावला तेव्हा कृपा व सत्य ही संपूर्ण व परिपूर्णपणे उदाहरणासह सुस्पष्टपणे सिद्ध झाली. केवळ मध्यस्थ जो ख्रिस्त याच्याद्वारे देवाची ती कृपा निवडलेल्यांप्रत वाहते. "देवाची कृपा आणि एक मानव येशूख्रिस्त ह्याच्या कृपेचे दान ही पुष्कळ जणांकरता विशेष करून विपुल झाली — जे कृपेचे व नीतिमत्वाचे दान ह्याची विपुलता स्वीकारतात, ते विशेषकरून त्या एकाच येशू ख्रिस्ताच्या *द्वारे* जीवनात राज्य करतील — तसे कृपेने नीतिमत्वाच्या योगे सार्वकालिक जीवनासाठी येशूख्रिस्त आपला प्रभू ह्याच्या *द्वारे* राज्य करावे" (रोम ५:१५,१७,२१).

देवाची कृपा *शुभवर्तमानांमध्येही घोषित* झाली (प्रे. कृ. २०:२४). स्वधार्मिकतेत आत्मसंतुष्ट असणाऱ्या यहुद्यांना ती "अडखळण्याचा धोंडा "अशी होती. तर अहंकारी व तत्वज्ञानी ग्रीकांना ती "मूर्खता" अशी होती. आणि असे का? कारण मानवातील अहंकाराला स्वीकारण्यासारखे त्यात काहीही नव्हते. ती घोषित करते की आपले कृपेने तारण झाल्याशिवाय आपले तारण होऊच शकत नाही. ती जाहीर करते की ख्रिस्ताद्वारे, देवाच्या कृपेचे अवर्णनीय दान प्राप्त झाले नाही तर प्रत्येक मानवाची अवस्था अत्यंत निराश, सर्व उपाय हरलेली व असहाय असते. शुभवर्तमान मानवाची ओळख अपराधी, दोषी, नाशाला चाललेला गुन्हेगार अशी करते. ती जाहीर करते की अत्यंत दैहिक लाड पुरवण्यास उत्तेजन देणाऱ्या चारित्र्यहीनाने धार्मिकतेचे शिक्षण देऊन आपल्या शक्तिनिशी धार्मिकतेचे प्रदर्शन केले तरी नैतिकतेचा कडक पाठपुरावा करणारा देखील त्याच भयानक दैन्यास्थेत आहे; बायबलचा तिरस्कार करणाऱ्या व धर्मावर विश्वास नसलेल्यापेक्षा तो काही चांगला नाही.

आदामाच्या प्रत्येक संतानाला शुभवर्तमान पतित, प्रदुषित, नरकाला पात्र आणि असहाय पापी लेखते. कृपा जी सुवार्ता प्रकाशित करते तीच त्याच्यासाठी एक आशा आहे. सर्व मानवजात देवासमोर त्याच्या पवित्र नियमांचे अपराधी, पापी व दोषपात्र गुन्हेगार असल्याच्या खात्रीने उभी राहते. ते केवळ मरणदंडाची वाट पाहत असतात. पण त्यांना मरणदंडाची शिक्षा होऊन चुकली आहे (योहान ३:१८; रोम ३:१९). कृपा पक्षपाती आहे अशी तक्रार करणे म्हणजे आत्मघात आहे. जर पाप्याने खऱ्या न्यायाचा आग्रहच धरला तर त्याच्या वाट्याला सर्वकाळासाठी अग्निसरोवरच येईल. त्याच्यावर जो दैवी न्याय ठोठावला आहे त्यापुढे मान तुकवण्यातच त्याला आशा आहे. त्यातील नीतिमत्व पूर्णपणे आपल्या पदरात पाडून घेऊन देवाच्या दयेवरच सर्वस्वी अवलंबून राहून त्याने शुभवर्तमानात ओळख करून देण्यात आलेली कृपा प्राप्त करून घेण्यासाठी आपले रिक्त हस्त त्याच्यापुढे पसरावेत.

देवत्वातील तिसरी व्यक्ती ही *कृपा आपल्यापर्यंत आणते*. म्हणून त्याला विशेष नाव आहे, "कृपेचा आत्मा" (जखऱ्या १२:१०). देव जो पिता, तो कृपेचा झराच आहे. त्याने स्वत:मध्येच सार्वकालिक तारणाच्या कराराचा संकल्प केला. देवाचा पुत्र ती कृपा कार्यरत करण्याचे साधन बनला. सुवार्ता ती कृपा प्रकाशित करणारी आहे. पवित्र आत्मा त्या कृपेचा वर्षाव करणारा आहे. तोच आत्म्याला तारण्याच्या सामर्थ्याने त्या सुवार्तेचे लागूकरण करतो — निवडलेले आत्म्याने मृत पावलेले असता

तो त्यांना जिवंत करतो. त्यांच्या बंडखोर इच्छेवर ताबा मिळवतो. त्यांच्या  कठीण ऱ्हदयाला पाझर फोडतो. त्यांचे अंध नेत्र उघडतो. त्यांना पापाच्या कुष्ठरोगापासून शुद्ध करतो. आपण स्व. जी. एस. बिशप बरोबर म्हणू या:

> जे पतन पावले आहेत अशांसाठी कृपा आहे. ते न्यायदंड हाती घेऊ शकत नाहीत. ते इतके भ्रष्ट आहेत की ते आपला स्वभाव बदलू शकत नाहीत. ते देवाच्या इतके विरोधात आहेत की ते त्याच्याकडे माघारे वळू शकत नाहीत. ते इतके अंध आहेत की ते पाहू शकत नाहीत. ते इतके बहिरे आहेत की त्याचे ते ऐकू शकत नाहीत. ते इतके मृत आहेत की देवानेच त्यांच्या कबरा उघडाव्यात आणि त्यांना पुनरुत्थित करावे.

# प्रकरण १४

# देवाची दया

## देवाच्या चांगुलपणात त्याच्या दयेचा उगम आहे

"परमेश्वराचे उपकारस्मरण करा कारण तो चांगला आहे; त्याची दया सनातन आहे" (स्तोत्र १३६;१). देवाच्या या दैवी गुणाच्या परिपूर्णतेबद्दल त्याची फारच स्तुती करायला हवी. तीनहून अधिक वेळा स्तोत्रकर्ता या  वंदनीय गुणाबद्दल देवाची स्तुती करायला संतांना पाचारण करतो. एवढे वैपुल्य प्राप्त करणाऱ्यांकडून एवढी माफक अपेक्षा ठेवण्यात काहीच गैर नाही. जेव्हा आपण दैवी श्रेष्ठत्वावर गंभीरपणे विचार करतो तेव्हा देवाचा धन्यवाद करण्याशिवाय दुसरे काहीच करू शकत नाही. त्याची दया "मोठी" आहे (१ राजे ३:६), "विपुल" आहे (स्तोत्र ८६:५), "मृदु" म्हणजे कोमल आहे (लूक १:७८), ती "महा दया" म्हणजे परम दया आहे (१ पेत्र १:३), त्याचे भय धरणाऱ्यांवर ती युगानुयुग असते (स्तोत्र १०३:१७). आपणही स्तोत्रकर्त्याबरोबर म्हणू या, "मी उच्च स्वराने तुझी स्तोत्रे गाईन" (स्तोत्र ५९: १६).

" मी आपले सर्व चांगुलपण तुझ्यापुढे चालवीन; तुझ्यासमोर परमेश्वर ह्या नामाची घोषणा करीन; ज्याच्यावर कृपा करावीसे वाटेल त्याच्यावर मी कृपा करीन आणि ज्याच्यावर दया करावेसे वाटेन त्याच्यावर मी दया करीन" (निर्गम ३३:१९). देवाची दया देवाच्या कृपेहून कोणत्या बाबतीत निराळी आहे? देवाच्या दयेचा उगम त्याच्या चांगुलपणाच्या झऱ्यात आहे. देवाच्या चांगुलपणाचा पहिला मुद्दा हा आहे की देव त्याच्या सऱ्हदयतेने किंवा वैपुल्याने, औदार्याने त्याच्या प्राणिमात्रांना ते प्राणिमात्र म्हणून मुक्तहस्ते देतो. याप्रमाणे सर्वांना त्याने अस्तित्व व जीवन दिले आहे. दुसरा मुद्दा देवाच्या चांगुलपणाचा अर्थ असा आहे की त्याच्या दयेचा कल पतित प्राणिमात्रांना त्यांच्या क्लेशातून दिलासा देण्याकडे असतो. अशा प्रकारे दयेला पापाची पूर्वकल्पना असते.

प्रथमच विचार करताना देवाची दया व कृपा या दोहोतील खऱ्या भेदाचे आकलन होणे सोपे जाणार नाही. त्यासाठी त्याने पतित न झालेल्या देवदुतांना कसे वागवले यावर काळजीपूर्वक मनन केल्यास बरीच मदत होईल. त्याने त्यांच्यावर कधीच दया केली नाही कारण त्यांना त्याची गरज पडावी असे काहीच नव्हते. पापही केले नव्हते त्यामुळे त्यांना कृपेचीही गरज पडली नाही. तरीही ते देखील देवाच्या सार्वभौम व मोफत कृपेची प्रजा आहेत. याचे पहिले कारण म्हणजे ते संपूर्ण देवदुतांच्या जगतातून *निवडलेले* आहेत (१ तीमथ्य ५:२१). दुसरे कारण, सैतानाने बंड करून स्वत:चा व सोबत एक तृतीयांश स्वर्गीय देवदुतांचा अध:पात करून घेतला, तेव्हा त्या निवडीचा परिणाम असा झाला की त्या धर्मत्यागापासून देवाचे *संरक्षण* या देवदुतांना लाभले (प्रकटी १२:४). तिसरे कारण त्यांनी ख्रिस्ताला आपले *मस्तक* केले (कलसै २:१०; १पेत्र ३:२२), त्यामुळे सर्वकाळाकरता त्यांना निर्माण केलेल्या पवित्र अवस्थेत ते सुरक्षित आहेत. चौथे कारण त्यांना *उच्चपदी नेमले* आहे: देवाच्या निकट सान्निध्यात राहण्यासाठी (दानीएल ७:१०), त्याच्या मंदिरात सतत त्याची सेवा करण्यासाठी, त्याच्याकडून आलेली सन्मान्य आज्ञा झेलण्यासाठी (इब्री १:१४). त्यांच्यावर

झालेली ही *कृपेची* कारणे आहेत पण ही दया नाही.

देवाच्या दयेचा वचनात दिल्यानुसार अभ्यास करताना, सत्याचे वचन नीट "सांगायचे असेल" तर देवाच्या वचनात जी दया वर्णिली आहे, त्यात तिहेरी भेद करायला हवेत. पहिले म्हणजे देवाची *सर्वसाधारण* कृपा. ती केवळ सर्व मानवांवर नव्हे तर सर्व विश्वासी व अविश्वासीयांवर समप्रमाणात आणि संपूर्ण निर्मितीवर सुद्धा करण्यात आली "त्याची कोमल दया त्याच्या सर्व कृत्यांवर आहे" (स्तोत्र १४५:९). जीवन, प्राण व सर्व काही तो स्वत: सर्वांना देतो (प्रे. कृ. १७:२५). निर्बुद्ध व मूर्ख निर्मितीवर त्यांच्या गरजेच्या वेळी देवाची दया असते व तो त्यांना योग्य तो पुरवठा करतो. दुसरे म्हणजे, त्याची *विशेष* कृपा मानवांच्या मुलांवर कार्यरत असते. ते पापी असल्याने त्यांच्या पापाचा तिरस्कार करूनही त्यांना तो मदत करत असतो. त्यांनाही तो सर्व जीवनावश्यक गोष्टींचा पुरवठा करतो: "तो वाईटांवर व चांगल्यांवर आपला सूर्य उगवतो आणि नीतिमानांवर व अनीतिमानांवरही पाऊस पाडतो" (मत्तय ५:४५). तिसरे म्हणजे, तारणाच्या वारसदारांसाठी *सार्वभौम* दयेने राखून ठेवण्यात आलेली कृपा. ती कराराद्वारे त्यांना मध्यस्थाद्वारे कळवण्यात येते.

## त्याच्या दयेचा वर्षाव

वरीलपैकी दोन व तीन मध्ये भेद करताना महत्त्वाचा मुद्दा लक्षात घ्यायला हवा की देव दुष्टावर जी दया वर्षतो, ती केवळ *तात्पुरत्या* स्वरूपाची असते. म्हणजे ती प्रकर्षाने फक्त या सध्याच्या जीवनापुरतीच असते. कबरेपलीकडे त्यांच्यावर दयेचा वर्षाव केला जाणार नाही: "ते लोक ज्ञानशून्य आहेत म्हणून त्यांच्या उत्पन्नकर्त्याला त्यांचा कळवळा येत नाही, त्यांचा निर्माणकर्ता त्यांच्यावर कृपा करत नाही" (यशया २७:११). तरी काही वाचकांपुढे एक अडचण उपस्थित होईल की, पण देवाचे वचन म्हणत नाही का, की "त्याची दया सनातन आहे" (स्तोत्र १३६:१)? या संदर्भात दोन गोष्टी लक्षात घेणे गरजेचे आहे. देव दया करण्याचे कधी थांबवत नाही, कारण दैवी गाभ्याचे हे गुणवैशिष्ट्य आहे (स्तोत्र ११६:५). पण त्याच्या सार्वभौम इच्छेने त्याची दया शिस्तबद्धतेने कार्यान्वित होते. हे असेच असायला हवे, कारण त्याला कोणतीही गोष्ट त्याच्या बाहेरून, त्याला चालना देऊन त्याला कृती करण्यास उद्युक्त करत नाही. अशी कोणती गोष्ट असती तर तीच *सर्वोच्च* ठरली असती आणि मग देवाचे दे*व म्हणून अस्तित्वच राहिले नसते*.

केवळ शुद्ध देवाची कृपाच दैवी दयेची कार्ये ठरवत असते. देव हे सत्य रोम ९:१५ मध्ये ठामपणे व्यक्त करतो. "कारण तो मोशेला म्हणतो, ज्या कोणावर मी दया करतो त्याच्यावर मी दया *करीन*." प्राणिमात्रांची दुष्टता त्याला दया दाखवायला भाग पाडते असे नव्हे. कारण आपल्यावर जसा बाह्य गोष्टींचा प्रभाव पडतो तसे देवाचे नसते. पाप्यांच्या तिरस्करणीय कुष्ठरोगाच्या यातनांचा देवावर प्रभाव पडला *असता* तर, तर त्याने *सर्वांचेच* तारण करून त्यांना वाचवले असते. पण तो तसे करत नाही. का? याचे साधे सोपे कारण असे की असे करणे त्याच्या इच्छेत नाही आणि त्यात त्याला संतोषही नाही. प्राणिमात्रांची गुणवत्ता तर त्याला मुळीच त्यांच्यावर दयेचा वर्षाव करायला भाग पाडत नाही. कारण *गुणवत्ता लक्षात घेऊन* दयेविषयी काहीही बोलणे विसंगत आहे. "आपण केलेल्या नीतीच्या कृत्यांनी नव्हे तर नव्या जन्माचे स्नान व पवित्र आत्म्याने केलेले नवीकरण ह्यांच्याद्वारे आपल्या दयेनुसार त्याने आपल्याला तारले" (तीत ३:५) — ही दोन्ही अगदी परस्परविरुद्ध आहेत. देव त्याच्या निवडलेल्यांवर ख्रिस्ताच्या गुणवत्तेने चेतना दिल्यामुळे दया करायला प्रवृत्त होत नाही: त्यामुळे कारणाऐवजी परिणाम घातला जातो. पण त्याच्या हळुवार "दयेनुसार" अगर दयेमुळे त्याने ख्रिस्ताला आपल्या लोकांकडे पाठवले (लूक १:७८). ख्रिस्ताच्या गुणवत्तेमुळे आपल्या निवडलेल्यांवर आत्मिक दयेचा वर्षाव करणे त्याला शक्य होते. त्या खात्रीमुळे

त्याचा न्याय पूर्णपणे समाधान पावतो. *केवळ* देवाच्या अधिकारयुक्त इच्छा व हुकुमाशिवाय कोणावर दया होत नाही.

## कोणाला देवाची दया प्राप्त होते?

जरी हे खरे असले, धन्यवादित व गौरवी सत्य असले की "देवाची दया सनातन आहे "तरी त्याची दया कोणाला दाखवली जाते हे काळजीपूर्वक निरीक्षण करून पाहायला हवे. अनैतिक चालीच्या दुर्जनाला अग्निसरोवरात टाकणे हे देखील देवाचे दयेचे कृत्य आहे. दुर्जनांना होणारे शासन यावर तीन दृष्टाकोनांमधून खोल व गंभीर विचार करायला हवा. देवाची एका बाजूने ही न्यायत्वाची कृती आहे, त्यातून त्याची सन्मान्य निर्दोषता व सत्यता प्रस्थापित होते. त्याच्या पावित्र्य व नीतिमत्वाविषयी दूषित पूर्वग्रहदृष्टी असणाऱ्यांना त्याची दया दाखवली जात नाही. त्यांच्यासाठी ती न्यायत्वाची योग्य कृती आहे. जेव्हा त्यांना दु:खसहन करावे लागेल तेव्हा त्यांच्या अधर्मांबद्दलचे ते त्यांचे योग्य प्रतिफळ असेल. पण मुक्ती पावलेल्यांच्या दृष्टिकोनातून, दुर्जनांना होणारे शासन ही अनिर्वाच्य दया होय. जर सद्ध्याच्या काळाच्या राहाटीप्रमाणे देवाची मुले आणि सैतानाची मुले एकत्र राहाणे सदा सर्वकाळातही चालू राहिले असते तर किती भयानक झाले असते! जर तेव्हाही पवित्र जनांच्या कानावर अनैतिक दुर्जनांचे दुर्भाषण व घाणेरडी भाषाच पडत राहिली असती तर स्वर्ग हा स्वर्गच राहिला नसता. देवाची केवढी दया की "नवीन यरुशलेमात कोणत्याही निषिद्ध गोष्टी आणि अमंगळ व असत्य आचरणारा इसम ह्यांचा प्रवेश होणारच नाही" (प्रकटी २१:२७).

शेवटच्या उताऱ्यांमध्ये वाचकाने आतापर्यंत आम्ही वचनातून जे विचार माडले त्यांना देवाच्या वचनातून पुष्टी देणाऱ्या वचनांवर विचार करावा. स्तोत्र १४३:१२मध्ये दावीद म्हणतो, "तू आपल्या दयेने माझ्या वैऱ्यांचा नायनाट कर; माझ्या जीवाला जाचणाऱ्या सर्वांचा नाश कर; कारण मी तुझा दास आहे." तर स्तोत्र १३६:१५ मध्ये आपण वाचतो, "ज्याने फारोला व त्याच्या सैन्याला तांबड्या समुद्रात गडप केले त्याचे; कारण त्याची दया सनातन आहे." फारो व त्याच्या सैन्याचा बदला घेण्याची ती कृती होती; पण इस्राएलांसाठी ती दयेची कृती होती. प्रकटीकरण १९:१-३ वचने वाचा:-

"ह्यानंतर स्वर्गातील मोठ्या जनसमुदायाची जशी काय एक मोठी वाणी मी ऐकली, ती म्हणाली: हालेलूया; तारण तारण, गौरव व सामर्थ्यही आमच्या देवाची आहेत; कारण त्याचे न्यायनिर्बंध सत्याचे व नीतीचे आहेत; ज्या मोठ्या कलावंतिणीने आपल्या जारकर्माने पृथ्वी भ्रष्ट केली तिचा न्यायनिवाडा त्याने केला आहे, आणि आपल्या दासांच्या रक्ताबद्दल तिचा सूड घेतला आहे. ते दुसऱ्यांदा म्हणाले, हालेलूया तिचा धूर युगानुयुग वर चढत आहे."

वरील सर्व वचने लक्षात घेता आपल्याला आढळते की दुर्जनांनी काही आशा धरणे किती व्यर्थ आहे; तरीही त्यांनी सातत्याने देवाला विरोध करूनही ते हिशेबात न धरता तो त्यांच्यावर दया करत राहतो. कित्येक लोकांचा विश्वास असतो की देव मला कदापि नरकात टाकणार नाही; कारण तो अतिशय दयाळू आहे. अशी आशा उराशी जतन केलेल्या फुरशासारखी आहे. तो त्यांना मरणदायी दंश करील. देव हा न्यायी देव असतानाच दयामय देवही आहे. त्याने स्पष्टपणे घोषित केले आहे की तो "अपराधी जनांची मुळीच गय न करणारा आहे" (निर्गम ३४:७). होय. तो म्हणतो, "देवाला विसरणारी सर्व राष्ट्रे म्हणजे दुर्जन अधोलोकात परत जातील" (स्तोत्र ९:१७). लोक असेही

म्हणतील की खूप घाण साचू दिली आणि मैला साचून राहिला आणि लोक ताज्या हवेला वंचित झाले तर दयाळू देव त्यांना प्राणघातक  तापाची शिकार होऊ देईल असे मला वाटत नाही. वास्तव हे आहे की आरोग्याच्या नियमांकडे जे लोक दुर्लक्ष करतील ते रोगराईमध्ये वाहावत जातात. त्यांच्यावर देवाची दया होऊ शकत नाही. तसेच अध्यात्मिक बाबतीतही खरे आहे की जे देवाच्या आत्मिक आरोग्याच्या नियमांकडे दुर्लक्ष करतात ते सार्वकालिक मरणदंड म्हणजे दुसरे मरण भोगतील.

त्याच्या या अनिर्वाच्य दैवी परिपूर्णतेकडे अविचाराने पाहणे ही अनिर्वाच्य गंभीर बाब आहे. ते सतत देवाच्या अधिकाराला तुच्छ लेखतात, त्याचे नियम पायदळी तुडवतात, पापातच राहतात आणि तरीही त्याची दया गृहीत धरून चालतात. पण देव स्वत:शीच अन्याय करणार नाही. देव पश्चात्ताप न करणाऱ्याला नव्हे तर खरा पश्चात्ताप  करणाऱ्याला दया दाखवतो (लूक १३:३). पाप चालू ठेवायचे आणि शिक्षा कमी व्हावी म्हणून दयेवर विसंबून राहायचे हे निर्दय व दुष्टपणाचे वागणे होय. एक म्हण आहे, "चला, अधर्म करू या पुढे चांगलेच होणार आहे" मग अशाबद्दल लिहिले आहे की "अशा लोकांची दंडाज्ञा यथान्याय्य आहे" (रोम ३:८). गृहीत धरल्याने नक्कीच निराशा होते. अनुवाद २९:१८-२० काळजीपूर्वक वाचा. ख्रिस्त हा दयासन आहे. आणि जे सर्व त्याच्या प्रभुत्वाचा धिक्कार करतील "ते वाटेने नाश पावतील, कारण त्याचा क्रोध त्वरित पेटेल" (स्तोत्र २:१२).

शेवटी आपला अखेर हाच विचार हवा की देव त्याच्या स्वत:च्या लोकांवर आत्मिक दया करतो. "तुझी दया आकाशापर्यंत ऊंच आहे" (स्तोत्र ५७:१०). त्याची संपन्नता आमच्या विचारांस उत्तुंग व्यापते." जसे पृथ्वीच्यावर आकाश उंच आहे तशी त्याची दया त्याचे भय धरणाऱ्यांवर विपुल आहे" (स्तोत्र १०३:११). कोणीच तिचे मापन करू शकत नाही. निवडलेल्या जनांची "दयेची पात्रे" अशी रचना केली आहे (रोम ९:२३). ते पापात मृत असता याच दयेने त्यांना चैतन्य देऊन जिवंत केले (इफिस २:४,५). ती दयाच त्यांचे तारण करते (तीत ३:५). त्याच्या विपुल दयेनेच त्याने आपल्याला जन्म देऊन सार्वकालिक वारसत्व दिले (१ पेत्र १:३). आपली जोपासना करणारी, संरक्षण करणारी, क्षमा करणारी, पुरवठा करणारी दया वर्णन करण्यासाठी आपल्याला वेळ पुरणार नाही. त्याच्या स्वत:च्या लोकाचा तो "दयामय पिता आहे" (२ करिंथ १:३).

सारी तुझी दया देवा माझ्या
निरखितो माझा उत्सुक आत्मा
भारून मी प्रीती स्तुती नवलाने
हरवून जातो पुलकित दृश्यांनी

# प्रकरण १५

# देवाचे वात्सल्य

वाचकासमोर देवाचे आणखी एक श्रेष्ठत्व आणणे हा आमचा हेतू आहे — प्रत्येक ख्रिस्ती व्यक्ती त्याचे असंख्य पुरावे देऊ शकते. देवाच्या वात्सल्यावर विचार करण्यामागे आमचा हेतू आहे की दैवी परिपूर्णतेचे योग्य मापन व्हावे. कारण आपला नेहमी त्यांची एकच बाजू पाहण्याकडे कल असतो. आपण याबाबत योग्य समतोल राखला पाहिजे. जसे की "देव प्रकाश आहे" (१योहान १:५) आणि "देव प्रीती आहे" (१ योहान ४:८) या दोन विधानांमध्ये आढळतो. दैवी स्वभावातील आश्चर्य करायला लावणाऱ्या कडक गुणांची भरपाई मृदु व अल्हादकारक गुणांद्वारे होते. जर आपण संकुचितपणे फक्त देवाचे सार्वभौमत्व आणि वैभव; किंवा फक्त पावित्र्य आणि न्यायत्व एवढ्यापुरतेच मर्यादित राहिलो, तर आपली कधीही दुरुस्त करता येणार नाही अशी हानी होईल. आपण संकुचितपणे नाही तरी वारंवार त्याच्या चांगुलपणावर व दयेवर मनन करायला हवे. पवित्र वचनात दिलेल्या संपूर्ण दैवी परिपूर्णतेचे थोडेही दृश्य आपल्या हातून वगळले न गेल्याचे आपल्याला समाधान लाभले पाहिजे.

## देवाचे ख्रिस्ती व्यक्तीवरील असंख्य आशीर्वाद

देवाचे वचन त्याची "आपल्यावरील दया व विपुल करुणा" (यशया ६३:७) म्हणजे वात्सल्याविषयी बोलते. त्याची गणना कोण करू शकते? स्तोत्रकर्ता म्हणतो, "हे देवा, तुझे वात्सल्य किती अमोल आहे! (स्तोत्र ३६:७). मानवाची लेखणी, देवदुतांची जिव्हा, ही देखील तिचे वर्णन करायला अपुरी पडतील. देवाच्या लोकांना परिचित व आशीर्वादित असलेल्या या दैवी गुणाचे प्रकटीकरण मात्र पूर्णपणे विलक्षण आहे. कोणाही पूर्वजांना एवढी प्रिय वाटणारी परिपूर्णता त्यांच्या दैवतांमध्ये स्वप्नातही शोधून सापडली नसेल. मूर्तिपूजकांनी आजवर सौम्यता व मृदुता हे गुण दर्शवणाऱ्या आराध्याची पूजा केली नसेल. याउलट सत्य हे आहे की त्यांच्या मूर्त्या आपले हिडीस रूप दाखवतात. वरील गुण अशा मूर्त्यांना लावणे हे विद्वान तत्त्वज्ञानी लोक परिपूर्ण देवाला मान देणे असे समजतात. पण आपल्या देवाचे वात्सल्य, किंवा आपल्या लोकांसाठी त्याने पितृप्रेमाने केलेली मेहेरबानी व त्यांच्यासाठी त्याला असलेला हळवा जिव्हाळा याविषयी देवाचे वचन फार काही बोलते.

दैवी परिपूर्णतेचा प्रथम उल्लेख मोशेला झालेल्या अद्भुत प्रकटीकरणात आढळतो. तेथे यहोवा आपले नाम घोषित करतो, म्हणजे आपली ओळख करून देतो. "परमेश्वर, परमेश्वर, दयाळू व कृपाळू देव, मंदक्रोध, दयेचा व सत्याचा सागर" (निर्गम ३४:६). वारंवार हिब्रु शब्द चेसेद म्हणजे "दयाळू" व "कृपाळू" अथवा वत्सल या अर्थाने वापरला आहे. इंग्लिश भाषांतरात प्रथम देवाशी निगडित संदर्भ स्तोत्र १७:७ मध्ये दाविदाच्या प्रार्थनेत आला आहे; "तुझा आश्रय करणाऱ्यांना त्यांच्या विरोध्यांपासून तू आपल्या उजव्या हाताने वाचवतोस; तर तू आता विशेष वात्सल्य दाखव". हे किती अद्भुत आहे की जो आपल्याही अफाट वर आहे, कल्पनेपलीकडे एवढा गौरवी आहे, वर्णन करण्यापलीकडे पवित्र आहे, त्याने आपल्यासारख्या मातीतील कीटकाकडे लक्ष द्यावे एवढेच नव्हे तर त्याचे अंत:करण त्यांच्यावर खिळवावे, आपल्या पुत्राला त्यांच्याकरता द्यावे, त्यांची सर्व भ्रष्टता व बहकणे इतके सहन करावे की आपले वात्सल्य त्यांच्यावरून कदापि काढून घेऊ नये.

पवित्र जनांसाठी त्याने या दैवी गुणाने केलेल्या कृत्यांच्या काही पुराव्यांवर विचार करा, "त्याने जगाच्या स्थापनेपूर्वी आपल्याला ख्रिस्ताच्या ठायी निवडून घेतले, त्याने आपल्या मनाच्या संकल्पाप्रमाणे आपल्याला येशू ख्रिस्ताच्याद्वारे स्वत:चे दत्तक होण्याकरता प्रेमाने पूर्वीच नेमले होते" (इफिस १:४-५). या वचनांनुसार हे जग अस्तित्वात येण्यापूर्वीच त्याची प्रीती त्यांच्यासाठी कार्यरत होती. "देवाने आपल्या एकुलत्या एक पुत्राला जगात पाठवले आहे, ह्यासाठी की त्याच्याद्वारे आपणास जीवन प्राप्त व्हावे, ह्यावरून देवाची आपल्यावरील प्रीती प्रकट झाली" (१ योहान ४:९). आपल्यासारख्या पतित प्राणिमात्रांसाठी हा त्याचा विलक्षण पुरवठा होता. "मी सार्वकालिक प्रेमवृत्तीने तुझ्यावर प्रेम करीत आलो म्हणून मी तुला वात्सल्याने जवळ केले आहे" (यिर्मया ३१:३). माझ्या आत्म्याने जिवंत करण्याचे कार्य करून, माझ्या विजयी कृपेच्या सामर्थ्याने, तुझ्यामध्ये गरजेविषयीची खोल जाणीव निर्माण करून व माझ्या आकर्षणाने तुला मोहून टाकून मी हे सारे केले. "मी तुला सर्वकाळची आपली वाग्दत्त असे करीन. धर्माने व न्यायाने, ममतेने व दयेने मी तुला आपली वाग्दत्त करीन" (होशेय २:१९). ज्या दिवशी प्रभू त्याच्या सामर्थ्याने आपण त्याला स्वत:चे समर्पण करण्याची आपल्याला इच्छा देतो, तेव्हाच प्रभू आपल्याशी विवाहाच्या सार्वकालिक कराराने बद्ध होतो.

देव त्याचे हे वात्सल्य त्याच्या मुलांपासून कदापि काढून घेत नाही. आपल्याला असे भासेल की त्याने ते काढून घेतले आहे की काय, पण तसे कदापि होऊ शकत नाही (रोम ८:३९). देव आपल्याशी गांभीऱ्याने करारबद्ध आहे. आणि आपले पाप हे सर्व व्यर्थ करू शकत नाही. देवाने शपथवार सांगितले आहे की जर त्याच्या मुलांनी त्याच्या आज्ञांचे पालन केले नाही तर तो "दंडाने त्यांच्या अपराधांचा व फटक्यांनी त्यांच्या अधर्मांचा समाचार घेईल" तरी पुढे तो म्हणतो, "त्यांच्यावरील माझी दया मी दूर करणार नाही, मी आपल्या सत्यवचनांचा भंग करणार नाही; मी आपला करार मोडणार नाही" (स्तोत्र ८९:३१-३४). देवाचे त्याच्या लोकांविषयीचे वात्सल्य ख्रिस्तकेंद्रित आहे. कारण त्याचे वात्सल्य करारबद्ध आहे. ते परत परत त्याच्या सत्याशी निगडित आहे (स्तोत्र ४०:११; १३८:२). ते व्यक्त करून तो अभिवचन घेऊन पुढे सरसावतो. म्हणून आपण मुळीच निराश होण्याचे कारण नाही.

"पर्वत दृष्टीआड होतील, टेकड्या ढळतील, पण माझी तुझ्यावरची दया ढळणार नाही; माझा शांतीचा करार हलणार नाही असे तुझ्यावर करुणा करणारा परमेश्वर म्हणतो" (यशया ५४:१०). होय. आणि या कराराला त्याच्या मध्यस्थाने मंजुरी दिली आहे. त्या रक्तामुळे (पापामुळे होत असलेले) शत्रुत्व दूर करण्यात आले आणि परिपूर्ण समेट घडून आला. ज्यांनी त्याचा करार

अंगिकारला आहे आणि ज्यांचा त्याच्याशी समेट झाला आहे; त्यांच्यासाठी असलेले "त्याच्या मनातील संकल्प हिताचे आहेत अहिताचे नाहीत"( यिर्मया २९:११), म्हणून आपल्याला खात्री आहे की "परमेश्वर दिवसा आपले वात्सल्य आज्ञापील; मी रात्री त्याचे गीत, माझ्या जीवनदात्या देवाची प्रार्थना गात राहीन" (स्तोत्र ४२:८). किती सुरेख वचन आहे हे! देव केवळ वात्सल्य दाखवील किंवा त्याचा वर्षाव करील एवढेच नव्हे तर त्याच्या वात्सल्याला आज्ञा करील. हुकूम देऊन देव ते वात्सल्य पाठवतो. त्यात शाही गुंतवणूक आहे. "तारण... आशीर्वाद व सार्वकालिक जीवन यासाठीही तो आज्ञा देतो " (स्तोत्र ४४:४; १३३:३). यातून तो जाहीर करतो की या त्याच्या वर्षावाला काहीच थोपवू शकत नाही.

## त्याच्या संतांचा प्रतिसाद

आपला प्रतिसाद काय हवा? प्रथम, "तर मग देवाची मुले या नात्याने तुम्ही त्याचे अनुकरण करणारे व्हा — आणि प्रीतीने चाला" (इफिस ५:१-२). "तेव्हा तुम्ही देवाचे पवित्र व प्रिय असे निवडलेले लोक आहा म्हणून करुणायुक्त ऱ्हदय, ममता, सौम्यता, लीनता, सहनशीलता ही धारण करा" (कलसै ३:१२). दाविदाने हे असे केले: "तुझे वात्सल्य माझ्या दृष्टीपुढे आहे; तुझ्या सत्यमार्गाने मी चाललो आहे" (स्तोत्र २६:३). यावर मनन करण्यात त्याला आनंद वाटत असे. त्यामुळे त्याचा आत्मा तजेलदार होत असे. त्याचे शीलही यामुळे घडले. आपण जितके देवाच्या चांगुलपणात व्यस्त राहू तितके आपण आपल्या आज्ञापालनाविषयी अधिक दक्ष राहू. देवाच्या नियमशास्त्राच्या दहशतीपेक्षा देवाची गळ घालणारी प्रीती व कृपा अधिक शक्तीशाली आहेत. "हे देवा तुझे वात्सल्य किती अमोल आहे! मानवजाती तुझ्या पंखांच्या छायेचा आश्रय करते" (स्तोत्र ३६:७).

दुसरी गोष्ट, दैवी परिपूर्णतेच्या जाणीवेने आपला विश्वास अधिक बलवान होतो. देवावरील भरवसा वाढतो.

तिसरी गोष्ट, त्यामुळे आराधना करण्यास आपण उद्युक्त होतो. "तुझे वात्सल्य जीवनाहून उत्तम आहे; माझे ओठ तुझी स्तुती करतील" (स्तोत्र ६३:३; १३८:२). चौथी गोष्ट, खिन्न असताना आपला धावा असावा, "तुझ्या वात्सल्याने मला सांत्वन प्राप्त होऊ दे" (स्तोत्र ११९:७६). ख्रिस्त यातना सहन करत असताना त्याने हेच केले (स्तोत्र ६९:१७). पाचवी गोष्ट, आपली प्रार्थनेत विनंती हवी की, "हे परमेश्वरा, तू आपल्या वात्सल्याने मला नवजीवन दे" (स्तोत्र ११९:१५९). दाविदाने या दैवी गुणविशेषामुळेच देवाजवळ नवीन शक्ती प्राप्त व्हावी व जोम वाढावा म्हणून विनंती केली होती. सहावी गोष्ट, आपण जेव्हा आपल्या मार्गातून बहकून पतन पावतो तेव्हा आपण अशी विनंती करायला हवी; "हे देवा, तू आपल्या वात्सल्यास अनुसरून माझ्यावर कृपा कर (स्तोत्र ५१:१). तुझ्या अतिसौम्य गुणानुसार मला वागवून घे. तुझी मृदुता माझ्या उदाहरणातून पुराव्यासह सिद्ध होऊ दे. सातवी गोष्ट, आपल्या संध्याकाळच्या प्रार्थनेत ती आपली विनवणी असावी. " प्रात:काळी तुझ्या वात्सल्याचे शब्द मला ऐकू दे" (स्तोत्र १४३ :८). माझा आत्मा गीत गातच उठू दे; तुझ्या चांगुलपणाच्या विचारांनीच मी उठावे असे कर.

# प्रकरण १६

# देवाची प्रीती

## देवाचा स्वभाव

देवाच्या स्वभावाविषयी तीन गोष्टी देवाच्या वचनात सांगितल्या आहेत. पहिली, "देव आत्मा आहे"(योहान ४:२४). ग्रीकमध्ये उपपद वापरलेले नाही. त्यामुळे इंग्लिशमध्ये " गॉड इज अ स्पिरिट" असे म्हणणे आक्षेपार्ह आहे. त्यामुळे त्याला इतरांसोबत त्यांच्या वर्गात बसवले जाते. देव आत्मा आहे असे म्हणण्यातून त्याचे अत्युच्च स्थान व्यक्त होते. तो आत्मा आहे म्हणजे तो देहविरहित आहे. दृश्य स्वरूपात नाही. जर देवाला स्पर्श करण्यासारखे शरीर असेल तर तो सर्वोपस्थित असू शकला नसता. तो एका स्थळापुरताच मर्यादित राहिला असता. तो आत्मा असल्याने तो आकाश व पृथ्वी व्यापून आहे. दुसरी, "देव प्रकाश आहे" (१ योहान १:५). म्हणजे अंधाराच्या उलट आहे. देवाच्या वचनात पाप, अघर्म, मरण यांच्यासाठी "अंधकार" हा शब्द वापरला आहे. आणि पावित्र्य, चांगुपण, जीवन यासाठी प्रकाश हा शब्द वापरला आहे. "देव प्रकाश आहे" म्हणजे सर्व श्रेष्ठत्व त्याच्यामध्ये एकवटले आहे. तिसरी, "देव प्रीती आहे" (१योहान ४:८). देव केवळ प्रीती करतो एवढेच नाही तर तो स्वत:च प्रीती आहे. प्रीती हे केवळ त्याचे गुणवैशिष्ट्यच नाही तर ते त्याचे स्वरूप आहे.

आज देवाच्या प्रीतीविषयी बोलणारे पुष्कळ आहेत, पण ते प्रीतीच्या देवाशी पूर्णपणे अपरिचित आहेत. दैवी प्रीतीला सर्वसामान्यत: एक प्रकारचा दुर्बल सुस्वभाव असे लेखले जाते. एक प्रकारच्या सुस्वभावाने केलेला लाड; म्हणजे मानवी भावनेच्या नमुन्याची केवळ एक दुर्बल पातळी त्याला दाखवली आहे. सत्य हे की इतर गुणांप्रमाणेच या गुणावरही आपले विचार देवाच्या पवित्र वचनात प्रकट केल्यानुसार साकार झाले पाहिजेत व त्याच चाकोरीत बद्ध असले पाहिजेत ही गोष्ट गरजेची आहे. खेद वाटतो की ख्रिस्ती म्हणवणाऱ्यांमध्ये आध्यात्मिक पातळी इतकी खाली गेलेली दिसते आणि अज्ञान सर्वत्र इतके  बोकाळलेले दिसते की ही तातडीची गरज भासत आहे. देवासाठी किती थोड्या प्रमाणात खरी प्रीती आहे. त्याचे एक प्रमुख कारण म्हणजे देवाच्या लोकांसाठी आपली अंत:करणे त्याच्या प्रीतीने फारशी भरलेली नाहीत. जितके अधिकाधिक आपण त्याच्या प्रीतीशी, अधिक स्वभावाशी, परिपूर्णतेशी, धन्यतेशी निगडित होऊ, तितकी अधिक आपली अंत:करणे त्याच्या प्रीतीने ओसंडून वाहतील.

## देवाच्या प्रीतीचा स्वभाव व धन्यता

१. देवाच्या प्रीतीवर कोणी प्रभाव पाडू शकत नाही. म्हणजे मला म्हणायचे आहे की त्याच्या प्रीतीला त्याची कोणतीही प्रजा कार्यान्वित करण्यास पाचारण करू शकत, त्याच्या निर्मितीमध्ये त्याच्या प्रीतीला आकर्षित करण्याची अथवा उद्युक्त करण्याची कसलीही क्षमता नाही. त्या प्राणिमात्रांचे परस्परांवरील प्रेम त्यांच्यामध्ये जे काही आहे त्यामुळे आहे. पण देवाचे प्रेम स्वतंत्र व सहजस्फूर्त असून त्या प्रेमाला काही कारण लागत नाही. देव कोणावरही प्रीती करतो याचे एकमेव कारण त्याच्या स्वत:च्या सार्वभौम इच्छेत सापडते: "परमेश्वराने तुमच्यावर प्रेम करून तुम्हाला निवडले ह्याचे कारण तुम्ही संख्येने पुष्कळ होता म्हणून नव्हे; उलट तुम्ही सर्व राष्ट्रांमध्ये संख्येने कमी होता :ह्याचे कारण हेच की तुमच्यावर त्याचे प्रेम आहे" (अनुवाद ७:७,८). देवाने आपल्या लोकांवर युगारंभापूर्वीपासून प्रेम केले, त्यामुळे युगारंभापूर्वी या प्राणिमात्रांमधील काहीतरी त्याला प्रेम करायला कारण झाले असे म्हणायला जागाच नाही "त्याच्या स्वत:च्या संकल्पाप्रमाणे" त्याच्या स्वत:मधील प्रीतीने तो प्रेम करतो (२ तीमथ्य १:९).

"पहिल्याने त्याने आपल्यावर प्रीती केली म्हणून आपण त्याच्यावर प्रीती करतो" (१योहान ४:१९). आपण देवावर प्रीती केली म्हणून त्याने आपल्यावर प्रीती केली नाही. तर आपल्यामध्ये प्रीतीचा एक कणही येण्यापूर्वी त्याने आपल्यावर प्रीती केली. जर आपल्या प्रीतीची परतफेड करायला देवाने आपल्यावर प्रीती केली असती तर ती त्याच्याकडून उत्स्फूर्तपणे केली गेली असे म्हणता आले नसते. पण आपण प्रीतीहीन असताना त्याने आपल्यावर प्रीती केली. यावरून स्पष्ट होते की त्याच्या प्रीतीवर कशाचाही प्रभाव पडला नव्हता. देवाचा सन्मान करावा यासाठी व त्याच्या मुलांचे प्रेम प्रस्थापित होण्यासाठी ही गोष्ट अत्यंत महत्त्वाची आहे की या मोलवान सत्याविषयी आपल्याला स्पष्टता असावी. माझ्यावरील व "देवाचे स्वत:चे" असणाऱ्या प्रत्येकावरील त्याची प्रीती आपल्यामधील कशानेही न ढळता स्थिर होती. देवाच्या ऱ्हदयातील प्रीतीला आकर्षून घेण्यासारखे माझ्यामध्ये असे काय होते? अजिबात काहीही नव्हते. तर उलट सर्व काही त्याला तिरस्करणीय वाटेल असे होते. त्याने किळस करावी यातच माझी गणना होत होती. मी पापभ्रष्ट, कुमार्गाने चाललेला, प्रचंड भ्रष्टतेने व्याप्त "माझ्यात कसलेही चांगुलपण नसलेला" असा होतो.

निर्मात्यास हर्ष देई असे
काय स्तुत्य गुण मजमध्ये?
मी गावे तुझे गुणगान
हेच तव दृष्टीला वाटे बरे

२. ती सार्वकालिक आहे. हे आवश्यकच आहे. देव स्वत: सनातन आहे, आणि देव प्रीती आहे. आणि देवाला स्वत:ला प्रारंभ नसल्याने त्याच्या प्रीतीलाही प्रारंभ नव्हता. आपल्या दुर्बल मनापुढे ही संकल्पना अतिशय उत्तुंग आहे. आपल्याला तिचे आकलन झाले नाही तरीसुद्धा आपण नतमस्तक त्याची आराधनाच करावी. यिर्मया ३१:३ मधील साक्ष किती सुस्पष्ट आहे, "मी सार्वकालिक प्रेमवृत्तीने तुझ्यावर प्रेम करीत आलो म्हणून मी तुला वात्सल्याने जवळ केले आहे" या महान व पवित्र देवाने स्वर्ग व पृथ्वी निर्माण होण्यापूर्वी आपल्या लोकांवर प्रीती केली व युगारंभापूर्वीपासून त्यांच्याकडे आपले अंत:करण लावले हे समजण्यात आपली केवढी धन्यता आहे. हा स्वच्छ पुरावा आहे की त्याची प्रीती उत्स्फूर्त होती. कारण त्यांना अस्तित्व प्राप्त होण्यापूर्वी अनंतकाळ त्याने त्यांच्यावर प्रीती केली. हेच सत्य इफिस १:४-५ मध्ये सांगितले आहे, "आपण त्याच्या समक्षतेत निर्दोष व पवित्र असावे म्हणून जगाच्या स्थापनेपूर्वी आपल्याला ख्रिस्ताच्या ठायी निवडून घेतले . त्याने आपल्या मनाच्या सत्संकल्पाप्रमाणे — प्रेमाने पूर्वीच नेमले." त्याच्या प्रत्येक मुलाच्या मुखातून केवढी स्तुती बाहेर पडावी! अंत:करणाला किती निरामय शांती देणारे

आहे हे: माझ्यासाठी असलेल्या देवाच्या प्रीतीला आरंभ नव्हता त्यामुळे शेवटही नसणार! कारण तो युगानुयुगींचा देव आहे. आणि हा देव जर प्रीती आहे तर तो युगानुयुग आपल्या लोकांवर प्रीती करतो हे तितकेच खरे आहे.

३. ती सार्वभौम आहे. हे देखील स्वयंसिद्ध आहे. देव स्वत: सार्वभौम आहे, कोणाच्याही ऋणात नाही, त्याचे नियम स्वत:मध्येच आहेत, तो नेहमीच आपल्या साम्राज्याच्या सौख्यासाठी कार्यरत असतो. हा देव सार्वभौम आहे, तो प्रीती आहे, त्यामुळे सहाजिकच त्याची प्रीती सार्वभौम आहे. देव हा देव आहे म्हणूनच तो त्याच्या इच्छेस येईल तेच करतो. देव प्रीती आहे म्हणून त्याला हवे त्यांच्यावर तो प्रेम करतो. त्याने स्वत:च तसे ठाम सांगितले आहे: "मी याकोबावर प्रीती केली व एसावाचा द्वेष केला" (रोम ९:१३). याकोबावरच दैवी प्रीती करावी असे कोणते कारण होते की जे याकोबात होते, पण एसावात नव्हते ? त्या दोघांचे आईबाप एकच होते, जुळे असल्याने दोघांचा जन्म एकाच वेळी झाला होता, तरी देवाने एकावर प्रीती केली व दुसऱ्याचा द्वेष केला! का? कारण असे करण्यात त्याला संतोष होता. प्राणिमात्रांमधील कशाचाही देवावर प्रभाव पडत नसतो या सत्यातून देवाची सार्वभौम प्रीती प्रवाहित होणे अगत्याचे आहे. त्यामुळे देवाच्या प्रीतीचे कारण त्याच्या स्वत:मध्येच आहे. याला पुष्टी देताना तो त्याच्या इच्छेस येईल त्याच्यावर प्रीती करतो असे म्हणण्याची ही एक पद्धत आहे. क्षणभर याउलट गृहीत धरा. समजा देवाच्या इच्छेशिवाय दुसऱ्या कशाने तरी देवाच्या प्रीतीचे नियमन केले: मग देव नियमानुसार प्रीती करील, मग त्याला प्रीतीच्या नियमाच्या अधीन व्हावे लागेल, मग तो पूर्ण स्वतंत्रतेपासून दूर जाईल, स्वत: देवावरच नियमांचे राज्य चालेल .
"त्याने जगाच्या स्थापनेपूर्वी आपल्याला ख्रिस्ताच्या ठायी निवडून घेतले — " काय? "आपल्या मनाच्या सत्संकल्पाप्रमाणे आपल्याला येशू ख्रिस्ताच्याद्वारे स्वत:चे दत्तक होण्याकरता प्रेमाने पूर्वीच नेमले" (इफिस १:४,५).

४. ती अमर्याद आहे. देवाविषयीचे सर्व काही अमर्याद आहे. त्याच्या मुलतत्त्वाने स्वर्ग व पृथ्वी भरून गेली आहे. त्याचे ज्ञान अमर्याद आहे; कारण त्याला वर्तमानकाळ, भूतकाळ भविष्यकाळ ही ज्ञात आहेत. त्याचे सामर्थ्य अनिर्बंध आहे; कारण त्याला अवघड असे काहीही नाही. तसेच त्याच्या प्रीतीला सीमा नाही. तिची खोली कोणी मापू शकत नाही अशी आहे. तिची उंची इतकी उत्तुंग आहे की तिचे मोजमाप कोणी करू शकत नाही. तिला लांबी रुंदी आहे पण त्या मोजमापाचे आव्हान कोणी स्वीकारू शकणार नाही. इफिस २:४ मध्ये तिचा सुरेख परिचय करून दिला आहे; "देव दयासंपन्न आहे म्हणून आपण आपल्या पापांमध्ये मृत झाले असताही त्याने आपल्यावरील स्वत:च्या अपरंपार प्रेमामुळे — तारण केले." येथील "अपरंपार" हा शब्द योहान ३:१६ मधील "एवढी" या शब्दाशी सादृश आहे. त्याचा अर्थ हाच आहे की देवाची प्रीती इतकी उत्तुंग अथांग आहे की तिचा अंदाजच लागत नाही.

कोणतीही जिव्हा देवाच्या असीम प्रीतीचे पूर्णपणे वर्णन करू शकत नाही की कोणत्याही मनाला तिचे आकलन होऊ शकत नाही: "ती समजण्यापलीकडे आहे" (इफिस ३:१९). त्या दैवी प्रीतीविषयी सीमित मनाच्या कितीही अफाट कल्पना असल्या तरी देवाच्या प्रीतीच्या खऱ्या अमर्याद स्वरूपाच्या खूपच खालच्या पातळीवर आहेत. स्वर्ग जितका पृथ्वीहून उंच असेल त्याहीपलीकडे देवाचे चांगुलपण उच्च असल्याने मानव जेवढ्या काही कल्पना करील त्या या ऊंचीपुढे ठेंगण्या आहेत. तो असा महासागर आहे की त्याचा विस्तार उंच उंच पर्वत व सर्व वस्तु यापलीकडे आहे. जे त्याच्यात रुची घेतात त्यांच्यासाठी सर्व चांगुलपणाचा तो वाहता झरा आहे (जॉन ब्राइन १७४३).

५. ती न बदलणारी आहे. जसा देव स्वत: बदलत नाही, "तो बदलत नाही व फिरण्याने छायेत जात नाही" (याकोब १:१७). त्याच्या प्रीतीला बदलणे किंवा क्षय पावणे माहीतच नाही. स्वत:ला य:त्किंचित समजणारा याकोब प्रभावी उदाहरण देताना म्हणतो, "यहोवाने घोषित केले की मी याकोबावर प्रीती केली," आणि याकोबाने अविश्वास दाखवला व मार्गभ्रष्ट झाला तरी त्याच्यावर प्रीती करणे त्याने थांबवले नाही. योहान १३:१ मध्ये आणखी एक सुरेख उदाहरण दिले आहे. त्या येशूला रात्री एका प्रेषिताने म्हटले, "पिता आम्हास दाखवा" तर दुसरा त्या रात्री शापोच्चारण करून त्याला नाकारणार होता. ते सर्व जण त्या रात्री त्याला दुखावणार होते आणि त्याला सोडून जाणार होते. तरीसुद्धा "ह्या जगातील स्वकीयांवर त्याचे जे प्रेम होते, ते त्याने शेवटपर्यंत केले." दैवी प्रीती कोणत्याही प्रकारचे फेरबदल करत नाही. दैवी प्रीती ही "मृत्युसारखी प्रबळ असते — असले प्रेम महाजलांच्यानेही विझवणार नाही; महापुरांनाही ते बुडवून टाकता येणार नाही"( गीतरत्न ८: ६,७). काहीच त्यापासून आपल्याला विभक्त करू शकत नाही (रोम ८:३५-३९).

ठावे त्याच्या प्रीतीस ना अंत ना माप
ना वळवी काहीही बदल तिच्या मार्गास
चिरकाल ती सतत वाहे अशीच
तव एकाच सनातन उगमातून

६. ती पवित्र आहे. देवाची प्रीती त्याच्या मनची लहर किंवा उत्कट इच्छा किंवा भावनांच्या चाकोरीतून कार्यरत होत नाही तर तत्वांनी चालते. कृपा जशी स्वत:च्या किंमतीवर  नाही तर "नीतिमत्वाच्या योगे राज्य करते" तशी त्याची प्रीती त्याच्या पावित्र्याशी संघर्ष करत नाही. "देव प्रकाश आहे" (१योहान १:५) हा उल्लेख "देव प्रीती आहे" (१ योहान ४:८) च्या आधी आला आहे. देवाची प्रीती हा दुर्बल सुस्वभाव नाही किंवा नामर्द मृदुता नाही. देवाचे वचन घोषित करते की "ज्याच्यावर परमेश्वर प्रीती करतो त्याला तो शिक्षा करतो. आणि ज्या पुत्रांना तो स्वीकारतो त्यांना तो फटके मारतो" (इब्री १२:६). देव स्वत:च्या लोकांच्या पापालाही डोळे मिचकावणार नाही. त्याची प्रीती शुद्ध आहे. ती कोणत्याही  मद्यप्याप्रमाणे बडबडणाऱ्या मनुष्यासारखी भावनावश होणारी नाही.

७. ती कृपाळू आहे. देवाची प्रीती व देवाची मेहरबानी ही विभक्त करता येणार नाहीत अशी अतूट आहेत. हे स्पष्टपणे रोम ८::३२-३९मध्ये आढळते. ज्या प्रीती पासून तुम्हाला काहीही विभक्त करू शकत नाही. ती प्रीती काय आहे हे तेथे दिलेल्या जवळच्या  संदर्भाची रचना व व्याप्ती यांच्याकडे पाहून सहज समजू शकेल: देवाचा सत्संकल्प व देवाची कृपा यामुळे आपल्या पुत्राला पाप्यांसाठी पाठवायचा देवाचा निर्धार झाला. ख्रिस्ताच्या मानवधारी होण्यामागे देवाची प्रीती ही प्रेरणा होती: "देवाने जगावर एवढी प्रीती केली की त्याने आपला एकुलता एक पुत्र दिला" (योहान ३:१६). देवाने आपल्यावर प्रीती करावी म्हणून येशू मृत्यू पावला नाही तर त्याने आपल्या लोकांवर प्रीती केली म्हणून मरण पावला. काल्वरी हे त्याची दैवी प्रीती प्रदर्शित करण्याचे स्थान होते. तुम्हाला कधीही देवाच्या प्रीतीवर शंका घेण्याचा मोह झाला तर हे ख्रिस्ती वाचका, परत काल्वरीकडे जा.

हेच दैवी दु:खसहनावर धीराने विश्वास ठेवण्याचे समृद्ध कारण आहे. ख्रिस्त देवाचा एकुलता एक पुत्र असूनही त्यालाही दारिद्र्य, अपमान व छळ ही सुटली नाहीत. त्याचीही भूकमार झाली, त्याला तहान लागली. जेव्हा देवाने ख्रिस्तावर थुंकायची व त्याला मारहाण करण्याची मानवाला परवानगी दिली तेव्हा तेथे ख्रिस्तासाठीची देवबापाची प्रीती  विसंगत नव्हती. म्हणूनच ख्रिस्ती व्यक्तीवर संकटक्लेश, परीक्षा येतात तेव्हा तिने देवाच्या प्रीतीवर प्रश्न उठवू नयेत. ख्रिस्ताला या भूतलावर

देवाने पवित्र आत्मा विपुल दिला होता (योहान ३:३४). मग हे ध्यानात घ्या की आध्यात्मिक आशीर्वाद ही दैवी प्रीतीची प्रमुख वरदाने आहेत. जेव्हा जग आपला द्वेष करते तेव्हा देव आपल्यावर प्रीती करतो याचे ज्ञान होण्यात केवढी धन्यता आहे!

## प्रकरण १७

# देवाची आपल्यावरील प्रीती

"आपल्यावरील" म्हणजे त्याच्या लोकांवरील. जरी आपण "ख्रिस्त येशू आपला प्रभू याच्यामध्ये" असलेली प्रीती असे वाचतो, तेव्हा पवित्र बायबलला ख्रिस्ताबाहेर कोणतीही प्रीती माहीत नाही. "परमेश्वर सगळ्यांना चांगला आहे; त्याची कृपा त्याने केलेल्या सर्व कृत्यांवर आहे" (स्तोत्र १४५:९). म्हणूनच तो कावळ्यांनाही अन्न पुरवतो. "तो कृतघ्न व दुर्जन ह्यांच्यावरही उपकार करणारा आहे" (लूक ६:३५). तो नीतिमान व अनीतिमानांसही पुरवठा करतो (मत्तय ५:४५). पण त्याची प्रीती त्याच्या निवडलेल्यांसाठी राखून ठेवण्यात येते. म्हणजे त्याच्या गुणविशेषांनी सुस्पष्टपणे प्रस्थापित करण्यात येते कारण त्याच्या प्रीतीचे गुणविशेष त्याच्याशी सदृश आहेत. हे तर अटळ आहे कारण "देव प्रीती आहे."

**ख्रिस्तामधील देवाची प्रीती**
हे स्वयंसिद्ध मानल्यास वेगळ्या पद्धतीने असे म्हणता येईल की देवाची प्रीती त्याच्यासारखीच सर्वकाळापासून सर्वकाळापर्यंत न बदलणारी अक्षय आहे. देवाचा प्रिय असलेला कोणीही सर्वकाळाच्या नाशाला जाईल व त्याच्या सूडाचा सदा सर्वकाळ अनुभव घेत राहील ह्या कल्पनेच्या मूर्खपणाइतके दुसरे काहीही नाही. ती "देवाच्या ठायी" असल्यामुळे ती त्या प्राणिमात्रांमधील कशानेही आकर्षिली गेली नाही. त्यांच्याद्वारे किंवा त्यांच्यातील कशाने किंवा त्यांच्याकडून ती दूर लोटलीही जाणार नाही. "ह्या जगातील स्वकीयांवर त्याचे जे प्रेम होते ते त्याने शेवटपर्यंत केले" (योहान १३:१). योहान ३:१६ मधील "जग" हा शब्द यहूदी वापरत असलेल्या सर्वसाधारण अर्थाने वापरलेला नाही. म्हणून या वचनाचा अर्थ लावताना स्तोत्र ५:५; ६:७; योहान ३:३६; रोम ९:१३ या वचनांशी तो विसंगत नसावा.

देवाची प्रमुख योजना ही आहे की देवाच्या ख्रिस्तामधील प्रीतीची प्रशंसा व्हावी कारण केवळ देव ह्या एकाच मार्गातून ती वाहते. पुत्राने पित्याला त्याच्या लोकांवर प्रीती करण्यास प्रवृत्त केले नाही; तर त्याच्या लोकांवरील प्रीतीने त्यांच्यासाठी आपल्या पुत्राला देऊन टाकण्याची त्याला प्रेरणा दिली. राल्फ अर्स्काइन म्हणतात:

> देवाने आपली प्रीती व्यक्त करण्याचा अद्भुत मार्ग निवडला. जेव्हा तो आपले सामर्थ्य दाखवतो तेव्हा तो पृथ्वी बनवतो. त्याला आपली सुज्ञता प्रदर्शित करायची असते तेव्हा तो ती एका चौकटीत व रचनेत घालून त्याचे स्वरूप किती अफाट आहे हे तो प्रदर्शित करतो. जेव्हा त्याला आपल्या गौरवी नामाचे वैभव व्यक्त करायचे असते तेव्हा तो स्वर्ग बनवतो, आणि त्यात देवदूत, मुख्यदूत, सत्ता, अधिकार ही ठेवतो. आणि जेव्हा त्याला

आपली प्रीती प्रदर्शित करायची असते तेव्हा तो काय करणार नाही? ती ख्रिस्तामध्ये व्यक्त करण्याचा देवाने महान व अद्भुत मार्ग निवडला: त्याचे व्यक्तित्व, त्याचे रक्त, त्याचे मरण, त्याची नीतिमत्ता.

"देवाची वचने कितीही असोत, त्याच्याठायी होय हे आहे, म्हणून आम्ही देवाच्या गौरवाला त्याच्याद्वारे आमेन म्हणतो" (२ करिंथ १:२०). आपण ख्रिस्तामध्ये निवडलेले आहोत (इफिस १:४), आपण त्याच्यामध्ये स्वीकारले गेले आहोत (इफिस १:६), आपले जीवन त्याच्यामध्ये गुप्त ठेवण्यात आले आहे (कलसै ३:३), म्हणून आपण त्याच्यामध्ये प्रिय झालो आहोत — "ख्रिस्त येशूमधील देवाच्या प्रीतीने" : तो आपले मस्तक व आपला पती आहे म्हणून आपण त्याच्यामध्ये आहोत, या कारणास्तव आपल्याला त्याच्यापासून काहीही विभक्त करू शकत नाही. कारण हे ऐक्य अभेद्य आहे.

**देवाची त्याच्या संतांवरील प्रीती**

देवाच्या प्रीतीवर खोल आत्मिक मनन करून पवित्र जनांच्या अंत:करणाला मिळणारी ऊब इतर कशानेही मिळत नाही. त्या प्रीतीशी समरस झाल्याने तो आपल्या स्वत:च्या दुष्टतेतून बाहेर पडून सर्व गोष्टींपासून वर उंचावला जातो. त्याच्या विश्वासाची पकड घट्ट होऊन त्याच्या आत्म्याचे नवीकरण झाल्याने तो पवित्र समाधानाने भरतो; आणि स्वर्गाच्या या बाजूला असताना तो शक्य तितका आनंदी होतो. देवाची माझ्यासाठी असलेली प्रीती समजून तिच्यावर विश्वास ठेवल्याने स्वर्गाच्या जीवनाची चव आधीच कळते व स्वर्गाविषयीची उत्कंठाही वाढते. देव ख्रिस्तामध्ये त्याच्या लोकांवर प्रीती करतो, ते त्यांच्यामधील काही सुस्वभावामुळे किंवा काही आकर्षणामुळे नव्हे. "मी याकोबावर प्रीती केली." होय, स्वभावाने आकर्षक नसलेल्या, होय, नीच याकोबावर — "तू कीटकासारखा असलेल्या याकोबा," तुझ्यावर. देव ख्रिस्तामध्ये त्याच्या लोकांवर प्रीती करतो. त्यांच्या फलदायीपणामुळे ती प्रवृत्त होत नाही. तर ती सदासर्वकाळ सारखीच आहे. तो ख्रिस्तामध्ये त्यांच्यावर प्रीती करतो म्हणून पिता त्यांच्यावर ख्रिस्तासारखी प्रीती करतो. एक वेळ अशी येईल की त्याची प्रार्थना ऐकण्यात येईल, "जगाने समजून घ्यावे की, तू मला पाठवले आणि जशी तू माझ्यावर प्रीती केली तशी त्यांच्यावरही केली" (योहान १७:२३). फक्त विश्वासानेच या अद्भुत गोष्टी आकलन होऊ शकतात. हे तर्कशुद्ध विचार करून किंवा भावनांनीही साध्य होत नाही. देव ख्रिस्तामध्ये आपल्यावर प्रीती करतो. पिता आपल्या लोकांना त्याच्या पुत्रामध्ये पाहतो तेव्हा त्याला कोण हर्ष होत असेल! आपले सर्व आशीर्वाद त्या मोलवान झऱ्यातून वाहतात.

देवाची आपल्या लोकांवरची प्रीती कालची नाही. त्यांच्या त्याच्यावरील प्रीतीतून ती उगम पावली नाही. मुळीच नाही. "आपण त्याच्यावर प्रीती केली कारण त्याने आपल्यावर प्रीती केली" (१ योहान ४:१९). आपण त्याला प्रथम काही देत नाही की त्याने आपली परतफेड करावी. आपले पुनरुज्जीवन करणे हा त्याच्या प्रीतीचा उद्देश नव्हे तर त्याच्या प्रीतीचे हे कारण आहे की आपले नवीकरण करून आपल्याला त्याच्या प्रतिमेचे करावे. जेव्हा त्याचे हे प्राणिमात्र त्याला शोधण्याची खटपट करण्यातही गुंतले नसताना, ते अत्यंत बिघडलेले असताना त्याने त्यांच्यावर प्रीती केली हे सत्य पहिल्यापासून वारंवार प्रकट होते.

"मग तुजजवळून जाताना मी तुला पाहिले; तो ती वेळ तुझ्या प्रेमविकासाची होती; तेव्हा मी तुझ्यावर पदर घालून तुझी नग्नता झाकली, प्रभू परमेश्वर म्हणतो, तेव्हा मी शपथ वाहून तुझ्याबरोबर करार केला व तू (प्रकटीकरणाद्वारे) माझी झालीस" (यहेज्केल १६:८).

जेव्हा देवाची प्रीती प्रथम त्याच्या प्राणिमात्रांना प्रकट करण्यात आली तेव्हा तार्सकर शौलाप्रमाणे ते केवळ बिघडलेले होते एवढेच नव्हे तर प्रत्यक्ष दुराचार करण्यात व्यस्त होते. देवाची प्रीती ही केवळ आपल्यासाठी घेतलेली प्रतिज्ञा नव्हती तर ती आपली अंधाराच्या सत्तेतून सुटका होण्यापूर्वी त्याने त्याच्या ऱ्हदयात बाळगली होती; आणि आपण सदेह त्याच्या पुत्राच्या राज्यात जाईपर्यंत तशीच असणार आहे. ती काळाच्या बंधनात सुरू झाली नाही पण तिच्यावर चिरकालत्वाचा शिक्का आहे. "मी सार्वकालिक प्रेमवृत्तीने तुझ्यावर प्रेम करीत आलो" (यिर्मया ३१:३).

" प्रीती म्हणावी तर हीच; आपण देवावर प्रीती केली असे नाही, तर त्याने तुम्हां आम्हांवर प्रीती केली आणि तुमच्या आमच्या पापांचे प्रायश्चित्त व्हावे म्हणून स्वपुत्राला पाठवले" (१योहान ४:१०). या शब्दप्रयोगावरून हे स्पष्ट होते की देवाचे लोक त्यांच्या स्वभावाच्या अवस्थेप्रमाणे, कृपाविरहित, देवाप्रीत्यर्थ अंशत: देखील मनात प्रेम न बाळगणारे, किंवा त्याच्यावर विश्वास नसलेले; होय, त्याचे ते शत्रू होते तेव्हा त्याने त्यांच्यावर प्रीती केली (रोम. ५:८,१०). हे स्पष्टच आहे की या पार्श्वभूमीमुळे जेव्हा त्याच्या प्रीतीने प्रथमच माझे अंत:करण जिंकून घेतले होते तेव्हापेक्षा त्याच्यावर अधिक प्रेम करण्यास, त्याची अधिक सेवा करण्यास व त्याचे अधिक गौरव करण्यास मी ऋणी आहे. त्याच्या लोकांसाठी या युगात देव जी प्रीतीची कृत्ये व्यक्त करतो ती प्रीती त्याने युगारंभापूर्वीपासून बाळगली आहे. त्याच्या प्रीतीचे दान कधीही न बदलणारे कायमस्वरूपी आहे. "प्रकाशाचा पिता बदलत नाही व फिरून छायेत जात नाही" त्याच्याकडून त्याचा वर्षाव होतो. जेव्हा "आपल्या अंत:करणात तिचा वर्षाव होतो तेव्हा खरोखर देवाची ही प्रीती आपल्या अंत:करणात बदल घडवून आणते. पण देवामध्ये काहीही बदल होत नाही. काहीवेळा आपल्याला या दानाचा पुरवठा करण्यात तो बदल करतो; पण त्याच्या प्रीतीत फेरबदल झाला म्हणून असे घडत नसते. तो आपल्याला शासन जरी करीत असला तरी तेही प्रीतीनेच करीत असतो (इब्री १२:६), कारण त्याच्या मनात आपले चांगलेच करायचे असते.

**देवाच्या प्रीतीची कृती**

देवाच्या प्रीतीच्या काही कृतींविषयी थोडे पाहू. पहिली त्याची निवड करण्याची कृती. "तुम्हांविषयी आम्ही देवाची उपकारस्तुती नेहमी केली पाहिजे; कारण आत्म्याच्याद्वारे होणाऱ्या पवित्रीकरणात व सत्यावरच्या विश्वासात (त्याच्या चालनेमुळे) देवाने तुम्हाला प्रथमफळ म्हणून तारणासाठी निवडले आहे" (२ थेस्सलनी २:१३). देवाची प्रीती आणि ज्यांचे तारण करायचे होते त्यांची त्याने केलेली निवड या दोहोत एक अचूक संबंध आहे. त्याने केलेली निवड हा त्याच्या प्रीतीचा परिणाम होता हे पुन्हा अनुवादातून स्पष्ट होते: "परमेश्वराने तुमच्यावर (१) प्रेम करून (२) तुम्हाला निवडले, ह्याचे कारण तुम्ही संख्येने इतर राष्ट्रांपेक्षा पुष्कळ होता म्हणून नव्हे (अनुवाद ७:७). "जगाच्या स्थापनेपूर्वी आपल्याला ख्रिस्ताच्या ठायी निवडून घेतले, त्याने आपल्या मनाच्या सत्संकल्पाप्रमाणे आपल्याला येशूख्रिस्ताच्या द्वारे — पूर्वीच नेमले होते" (इफिस १:४,५).

दुसरे, त्याची मुक्ती देण्याची कृती. १ योहान ४:१० मध्ये आपण पाहिले की जरी लोकांनी देवाचे नियम मोडल्यामुळे त्यांच्या परिवर्तनापूर्वी देव त्यांच्यावर क्रोधविष्ट होता तरी त्यांच्या पापांचा समाचार घेऊन समाधान पावण्यासाठी त्याने आपल्या सार्वभौम प्रीतीने आपल्या पुत्राला पाठवण्याची तरतूद केली. आणि "तो त्याच्याबरोबर आपल्याला सर्व काही कसे देणार नाही? (रोम ८:३२) — एक स्पष्ट पुरावा म्हणजे देवाचा पुत्र सर्व मानवजातीसाठी "वधस्तंभी देण्यात" आला नाही. कारण तो त्यांना पवित्र आत्मा, नवीन स्वभाव, किंवा पश्चात्ताप व विश्वासही देत नाही.

तिसरे, त्याची पाचारणाची सफल कृती. सिंहासनारूढ असलेल्या तारणाऱ्याकडून पित्याने पवित्र आत्मा पाठवला (प्रे. कृ. २:३३). आपल्या निवडलेल्यांवर सार्वकालिक प्रीतीने प्रीती केल्यावर आपल्या वात्सल्याने तो त्यांना स्वत:कडे आकर्षून घेतो (यिर्मया ३१:३), नवीन जीवनाने चैतन्य देतो, त्यांना अंधारातून काढून त्याच्या अद्भुत प्रकाशात पाचारण करतो, व त्यांना आपली मुले बनवतो. "आपल्याला देवाची मुले हे नाव मिळाले ह्यात पित्याने आपल्याला केवढे प्रीतीदान दिले आहे, पाहा" (१योहान ३:१). जर देवाच्या प्रीतीतून आपले पुत्रत्वाचे नाते खात्रीने साधले गेले नाही तर मग या या वचनाचा हेतू तरी काय?

चौथे, मागे घसरलेल्या व्यक्तीला बरे करण्याची कृती. "मी त्यांना वाटेवर आणीन, त्यांजवर मोकळ्या मनाने प्रीती करीन (होशेय १४:४), दिरंगाई किंवा नाखुषी न दर्शवता. "असले प्रेम महाजलांच्यानेही विझवणार नाही; महापुरांनाही ते बुडवून टाकता येणार नाही" (गीतरत्न ८:७). असे आहे देवाचे आपल्या लोकांवरील प्रेम — अजिंक्य, न विझणारे. ते संपुष्टात येणे तर शक्य नाहीच, पण पतनाचे काळे पाणीही ते विझवू शकणार नाही, की अविश्वासाचा पूरही त्याला बुडवू शकणार नाही. या भूतलावर मरणाला कोणीच अटकाव करू शकत नाही. तर कृपेच्या क्षेत्रात काहीच देवाच्या प्रीतीपुढे अजिंक्य ठरू शकत नाही. गॉडविन आपले मत व्यक्त करताना म्हणतात:

देवाच्या प्रीतीने किती अडचणींवर मात केली आहे! देवाला स्वत:च्या हृदयावर मात करावी लागली. तुम्हाला काय वाटते आपल्या पुत्राचा वध करताना देवाला काहीच वाटले नसेल?...आपल्याला पाचारण करताना त्याला काहीच अडचणी आल्या नाहीत का की ज्यांच्यावर त्याच्या प्रीतीने मात केली? आपण आपले पाप व अपराध यात मृत होतो, तरी त्याने आपल्या महान प्रीतीने आपल्यावर प्रीती केली. आपल्या भ्रष्टतेच्या कबरेत असताना त्याने आपल्यामध्ये चैतन्य घातले: "पाहा, त्याला घाण सुटली आहे" — तरीही देवाने आपल्याला जिंकून घेतले. पाचारणानंतरही आपण किती चीड आणतो ही खेदाची गोष्ट आहे. शक्यतो निवडलेलेही फसवले जातील अशा परीक्षा झाल्या. सर्व ख्रिस्ती जनांबाबत हे घडते. कोणीही नीतिमान नाही तरी तो थोडक्यात बचावला जातो (१ पेत्र ४:१८). तो बचावण्याचे एकमेव कारण म्हणजे देवाची प्रीती अजिंक्य आहे: ती सर्व अडचणींवर मात करते.

अशा विषयावर लागूकरणाची गरजच पडत नाही. रोज देवाच्या प्रीतीवर भक्तिभावाने मनन करण्यात तुमचे मन गुंतलेले राहू दे. म्हणजे तुमच्या अंत:करणातील प्रीती त्याच्याकडे झेप घेईल. आत्मा खिन्नतेने तळमळत असेल, दु:खदायक कठीण परिस्थिती गुदरली असेल, तेव्हा प्रार्थनेत त्याच्या प्रीतीची याचना करा. ती प्रीती कोणतीही चांगली गोष्ट तुम्हाला देण्यास नकार देणार नाही. देवाच्या प्रीतीमुळे त्याचे आज्ञापालन करण्यास उत्तेजित व्हा — कृतज्ञतेस हेच अत्यावश्यक आहे.

# प्रकरण १८

# देवाचा क्रोध

ही खेदाची गोष्ट आहे की पुष्कळ ख्रिस्ती म्हणवणारे देवाच्या क्रोधाविषयी दिलगिरी व्यक्त करतात, किंवा असे काही घडणार नाही अशी इच्छा व्यक्त करतात. तर काही लोक देवाचा हा गुण त्याच्या दैवी स्वभावाला कलंक लावणारा असल्याचे उघडपणे मान्य करायचे धाडस करतात. हे सांगताना त्यांना फार आनंद वाटतो; त्यांना यावर विचार करायला आवडत नाही. त्यांच्या कानावर याविषयीचा उल्लेख जरी पडला तरी त्यांच्या मनात याविषयीची चीड लपलेली असते. जे न्यायाविषयी सौम्य असतात, त्यापैकी बहुतेकांना वाटते की देवाच्या क्रोधाची तीव्रता इतकी दहशत निर्माण करते की हा विषय मनन करण्यास काही उपयोगाचा नाही. तर दुसरे या संभ्रमास मनात थारा देतात की देवाचा क्रोध त्याच्या चांगुलपणाशी सुसंगत नाही. म्हणून ते देवाच्या क्रोधाविषयीचा विचारच आपल्या मनातून काढून टाकतात.

## देव कोणतीही सत्ये झाकून ठेवीत नाही

होय, पुष्कळ लोक देवाच्या क्रोधाच्या विचाराविषयीच्या दृश्यापासून पाठ फिरवतात. जणू त्यांना वाटते की देवाच्या गुणविशेषांमधील मोठ्या कलंकाकडेच त्यांना पाहायला सांगितले जात आहे, किंवा दैवी शासन व्यवस्थेला कलंक लावला जात आहे. पण देवाचे वचन काय सांगते? वचनांकडे वळलो तर दिसेल की देवाने त्याच्या क्रोधाविषयीची सत्ये झाकून ठेवलेली नाहीत. सूड घेणे व क्रोध ह्यांची मालकी आपल्याकडे असल्याचे सांगायची देवाला लाज वाटत नाही. तो स्वत: आव्हान करतो की:
"आता पाहा, मी, मीच तो आहे; माझ्याशिवाय कोणी देव नाही; प्राणहरण व प्राणदान करणारा मीच आहे. माझ्या हातून सोडवणारा कोणी नाही. मी आपला बाहु आकाशाकडे उभारून म्हणतो, माझ्या सनातन जीविताची शपथ, मी आपली चमकणारी तरवार पाजळली, मी न्याय हाती घेतला, तर मी आपल्या विरोधकांचा सूड घेईन, माझ्या वैऱ्यांचे उसने फेडीन" (अनुवाद ३२:३९-४१).

जर आपण पवित्र शास्त्राच्या स्थलदर्शक शब्दकोशात पाहिले तर आढळून येईल की देवाची प्रीती व ममता यावर जितकी वचने आहेत त्यापेक्षा जास्त वचने देवाचा राग, संताप व क्रोध यावर आहेत. कारण देव पवित्र आहे. तो पापाचा द्वेश करतो. आणि तो पापाचा द्वेश करतो म्हणूनच त्याचा

पाप्यावरील क्रोध भडकत असतो (स्तोत्र ७:११).

देवाची विश्वसनीयता, सामर्थ्य किंवा दया याप्रमाणेच देवाचा क्रोध ही त्याची परिपूर्णता आहे. हे असेच असणे अत्यंत गरजेचे आहे. कारण त्याच्यामध्ये यत्किंचितही दोष नाही व त्याच्या स्वभावात अजिबात उणीव नाही. त्यातून  क्रोध वगळता येत नाही. पापाकडे तटस्थपणे पाहणे हा नैतिक दोष ठरतो आणि जो त्या पापाचा द्वेश करतो तो काही नैतिक महारोगी नाही. ज्याच्यामध्ये सर्व श्रेष्ठता एकवटली आहे, तो सद्गुण आणि दुर्गुण, सुज्ञता आणि मूर्खता याकडे समान समाधानी वृत्तीने कसा पाहू शकेल? जो अमर्याद पवित्र आहे, तो पापाचा अनादर न करता त्याच्यावर तीव्र कठोरता कशी व्यक्त  करणार  नाही? (रोम ११:२२). जो केवळ जे शुद्ध व सुंदर त्यातच आनंद मानतो, तो जे अशुद्ध व अमंगळ आहे त्याचा तिटकारा व किळस कशी करणार नाही? देवाचा प्रत्यक्ष स्वभावच नरकाला खरा व आवश्यक ठरवतो. स्वर्गाप्रमाणेच नरकही परिस्थितीमुळे आवश्यक आहे व अंमलात आणला गेलाच पाहिजे. देवामध्ये अपूर्णता नाहीच नाही. पण त्याच्या पूर्णतेतील एक पूर्णता दुसऱ्या पूर्णतेपेक्षा कमी आहे असे नाही.

देवाचा क्रोध म्हणजे त्याचा अधार्मिकतेविषयीचा चिरकालिक तिरस्कार होय. अधर्माविषयी असलेला संताप चीड व नावड यामुळे असलेला तो दैवी न्याय आहे. पापकृत्यांविरुद्ध ढवळून निघालेले ते देवाचे पावित्र्य आहे. अधर्म करणाऱ्यांना न्याय्य प्राणदंड होण्याचे ते ऱ्हदयद्रावक कारण आहे. देव पापावर क्रोधविष्ट आहे कारण ते त्याच्या अधिकाराविरुध्द बंड करणे आहे. त्याच्या पवित्र सार्वभौमत्वाविरुद्ध चूक करणे आहे. देवाच्या प्रस्थापित शासनव्यवस्थेविरुध्द केलेल्या बंडाला देव हाच प्रभू असल्याचे दाखवून दिले जाईल. त्यांनी ज्या वैभवाचा तिरस्कार केला तो किती महान आहे, हे त्यांना दाखवून देईल. मग जो क्रोध त्यांनी इतका क्षुल्लक लेखला, तो क्रोध किती दहशत वाटण्यासारखा भयानक आहे हे त्यांना समजेल. देवाचा संताप द्वेशाने धुमसणारा, कपटाने सूड घेणारा, केवळ अन्यायाची वागणुक देण्यासाठी लादण्यात आलेला, किंवा त्याच्याशी अन्याय वागल्याबद्दल बदला घेणारा नाही. मुळीच नाही. विश्वाचा प्रशासक म्हणून देव जरी आपली निर्दोषता शाबीत करून राज्यसत्ता प्रस्थापित करील, तरी तो खुनशीपणे वागणार नाही.

वर सादर केलेले विचार दैवी क्रोध ही देवाची एक परिपूर्णताच असल्याचे पुरावे देतात एवढेच नाही तर त्याच्या वचनात याविषयी स्पष्ट घोषित करण्यात आले आहे की "अभक्तीवर व अनीतिवर देवाचा क्रोध स्वर्गातून प्रगट होतो" (रोम १:१८). या वचनावर रॉबर्ट हॅल्डेन असे विश्लेषण करतात:

जेव्हा प्रथमच मरणदंड घोषित करण्यात आला तेव्हा हे उघड केले होते की   पृथ्वी शापित झाली आहे, व पृथ्वीवरील नंदनवनातून मानवाला हाकलून देण्यात आले. त्यानंतरची शिक्षेची जलप्रलयासारखी काही उदाहरणे दिसतात. आकाशातून अग्नी आला व सपाटीवरील नगरे भस्मसात केली. पण विशेष हे   की संपूर्ण भूतलावर मरणाचे साम्राज्य पसरले. नियमशास्त्रात प्रत्येक पापासाठी शाप घोषित करण्यात आला. अर्पणांची स्थापना करून मोशेच्या काळात सर्व सेवांमधून ते सूचित करण्यात आले. या पत्रातील आठव्या अध्यायात प्रेषित विश्वासी जनांचे या सत्याकडे लक्ष वेधून घेतो की संपूर्ण निर्मिती व्यर्थतेच्या स्वाधीन आहे. आणि प्रसूतीच्या यातनांनी कण्हत आहे. जी निर्मिती देव असल्याचे जाहीर करते, व त्याचे गौरव प्रदर्शित करते, तीच पृथ्वी पापाचे शत्रुत्व आणि मानवाच्या गुन्ह्यांचा सूड घेतला जाणार असल्याचेही सिद्ध करते.

पण सर्वात महत्त्वाचे म्हणजे जेव्हा देवाचा पुत्र दैवी गुण प्रदर्शित करण्यास या भूतलावर आला तेव्हा दैवी क्रोध स्वर्गातून प्रकट झाला. आणि तो येशूच्या दु:खसहन व मरणात प्रदर्शित झाला. हा देवाच्या क्रोधाचा प्रकार देवाने यापूर्वी पापाविषयी दाखवलेल्या सर्व नाखुशींपेक्षाही अधिक भयंकर होता. याशिवाय दुर्जनांना भावी काळी होणारी सार्वकालिक शिक्षा जाहीर केली गेली. ती पूर्वीच्या शिक्षांपेक्षा अधिक गंभीर आहे हे स्पष्टच आहे. नवीन संकेताप्रमाणे स्वर्गातून दोन प्रकटीकरणे देण्यात आली आहेत. एक क्रोधाचे, दुसरे कृपेचे.

स्तोत्र ९५:११ मध्ये देवाचा क्रोध ही दैवी परिपूर्णता म्हणून स्पष्ट प्रदर्शित झाल्याचे आपण वाचतो, "म्हणून मी रागाने शपथ वाहून म्हणालो." दोन प्रसंगी देव शपथेने बोलतो: एक, अभिवचन देताना (उत्पत्ती २२:१६), आणि दुसरे, न्याय जाहीर करताना (अनुवाद १:३४). पहिल्या प्रकारात तो आपल्या मुलांवर दया करण्याविषयी शपथेने बोलतो. तर दुसऱ्या प्रकारात दुष्ट पिढीला कुरकुर केल्याबद्दल व अविश्वासाबद्दल त्यांना वतनापासून वंचित करण्याबाबत शपथेने बोलतो. शपथ ठाम असण्यातील गांभीर्य सूचित करते (इब्री ६:१६). उत्पत्ती २२:१६ मध्ये देव म्हणतो, "मी स्वत:ची शपथ घेऊन सांगतो." स्तोत्र ८९:३५ मध्ये तो जाहीर करतो की "एकवार मी आपल्या पवित्रतेची शपथ वाहिली आहे." स्तोत्र ९५:११ मध्ये तो ठाम सांगतो की "म्हणून मी रागाने शपथ वाहून म्हणालो." अशा प्रकारे यहोवा स्वत: त्याच्या क्रोधाची परिपूर्णता त्याच्या पावित्र्याच्या परिपूर्णतेच्या बरोबरीची लेखतो: तो पावित्र्याची जशी शपथ घेतो तशीच क्रोधाचीही शपथ घेतो. "ख्रिस्ताच्या ठायीही देवत्वाची पूर्णता वसते" (कलसै २:९). देवत्वाची संपूर्ण परिपूर्णता त्याच्याकडून वैभवाने दर्शवण्यात आली (योहान १:१८). म्हणूनच आपण प्रकटी ६:१६ मध्ये कोकऱ्याच्या क्रोधाविषयी वाचतो.

## देवाच्या क्रोधावर मनन करण्याचे महत्त्व

देवाचा क्रोध हा दैवी स्वभावाची परिपूर्णता असून त्यावर आपण नेहमी मनन करायला हवे. पहिली गोष्ट म्हणजे देवाला पापाविषयी असलेल्या तिरस्काराबद्दल आपली अंत:करणे योग्यपणे प्रभावित व्हायला हवीत. आपला पापाकडे क्षुल्लक म्हणून पाहण्याकडेच बहुधा कल असतो. पापाची भेसूरता आपल्याला एक फसवा देखावा वाटतो. आपण पापाविषयी सबबी सांगत राहतो. पण जर देवाला पापाविषयी असलेल्या तिटकाऱ्याबाबत आणि तो किती भयानक प्रकारे पापाचा बदला घेणार आहे याबाबत आपण अधिक अभ्यास केला तर पापाची भयंकर दुष्टता आपल्याला अधिक समजून येईल. दुसरी गोष्ट देवाविषयी आपल्या आत्म्यात खरे भय उत्पन्न होण्यासाठी आपण: "देवाला संतोषकारक होईल अशी त्याची सेवा, आदर व भय धरून करू; कारण आपला देव भस्म करणारा अग्नी आहे" (इब्री १२:२८,२९). आपण त्याच्या वैभवाचा योग्य "आदर" बाळगला नाही, त्याच्या सात्विक संतापाबद्दल "देवाचे भय" धरले नाही तर आपली सेवा "देवाला संतोषकारक" होणार नाही. म्हणून आपल्या मनाला सतत आपण बजावत राहायला हवे की "आमचा देव भस्म करणारा अग्नी आहे" तिसरी गोष्ट, "येणाऱ्या क्रोधापासून" आपली सुटका झालेली आहे याबद्दल आपण आत्म्याने सतत त्याला स्तुती आराधना अर्पिली पाहिजे (१ थेस्सलनी १:१०).

देवाच्या क्रोधावर मनन करण्याची तयारी असणे किंवा त्यासाठी आपण उत्सुक नसणे यावरूनच आपल्या त्याच्याविषयीच्या मनोवृत्तीची खात्रीशीर पारख होते. जर देवामधील गुणांसाठी व सदासर्वकाळ त्याच्यामध्ये असणाऱ्या परिपूर्णतेसाठी आपण देवाच्या ठायी खरा आनंद करीत नसू, तर मग देवाची प्रीती आमच्यामध्ये आहे असे आपण कसे म्हणू शकू? आपल्या पापी मनाच्या

कलाप्रमाणे आपल्या विचारांनी आपण देवाची प्रतिमा कल्पू नये म्हणून प्रार्थनापूर्वक त्याच्या संरक्षणाखाली आपण असायला हवे. फार पूर्वीपासून देवाची तक्रार आहे की "मी तुझ्यासारखाच आहे असे तुला वाटले" (स्तोत्र ५०:२१). "त्याच्या पवित्र नामाचे कृतज्ञापूर्वक" आपण हर्ष करीत स्तवन केले नाही (स्तोत्र ९७:१२), आणि लवकरच एक दिवस देव आपल्या क्रोधाचे अत्यंत गौरवी प्रदर्शन करीत त्याला विरोध करणाऱ्यांचा बदला घेणार आहे हे आम्हाला ठाऊक आहे याबद्दल हर्ष करणार नाही; तर आपली अंत:करणे त्याच्या अधीन नसल्याचा, आणि आपण अजून आपल्या पापातच असल्याचा, आणि आपण सदासर्वकाळ जळत राहण्याच्या ठिकाणाच्या मार्गावर आहोत याचा तो पुरावाच होय.

## देवाचा न्याय त्याच्या क्रोधाद्वारे कार्यरत होतो

"राष्ट्रांनो (विदेशांनो) त्याच्या प्रजेचा जयजयकार करा; कारण तो आपल्या सेवकांच्या रक्तपाताचा बदला घेईल, तो आपल्या विरोधकांचा सूड उगवील" (अनुवाद ३२ :४३). पुन्हा आपण वाचतो —

"ह्यानंतर स्वर्गातील मोठ्या जनसमुदायाची जशी काय एक मोठी वाणी मी ऐकली, ती म्हणाली: 'हालेलूया; तारण, गौरव व सामर्थ्य ही आमच्या देवाची आहेत; कारण त्याचे न्यायनिर्बंध सत्याचे व नीतीचे आहेत; ज्या मोठ्या कलावंतिणीने आपल्या जारकर्माने पृथ्वी भ्रष्ट केली तिचा न्यायनिवाडा त्याने केला आहे, आणि आपल्या दासांच्या रक्ताबद्दल तिचा सूड घेतला आहे.' ते दुसऱ्यांदा म्हणाले, 'हालेलूया; तिचा धूर युगानुयुग वर चढत आहे' प्रकटी १९:१-३.

त्या दिवशी जेव्हा देव त्याचे वैभव प्रदर्शित करील, त्याची भयानक सत्ता प्रत्यक्षात आणील, त्याचे न्यायत्व विस्तारून दाखवील, आणि ज्यांनी उघडपणे त्याचा अवमान करण्याचे धाडस केले अशा गर्विष्ठांना पराभूत करील तेव्हा पवित्र जन मोठा हर्ष करतील.

" हे परमेशा, तू अधर्म लक्षात आणशील (दोषारोप ठेवील), तर हे प्रभू, तुझ्यापुढे कोण टिकाव धरील?" (स्तोत्र १३०:३). आपल्यापैकी प्रत्येकाने हा प्रश्न करायला हवा; कारण असे लिहिले आहे की "दुर्जन न्यायसमयी टिकावयाचे नाहीत" (स्तोत्र १:५). ख्रिस्तावर पाप लादले असताना देव त्याच्या लोकांचे अधर्म लक्षात घेऊन दोषारोप करीत असतानाचा अनुभव ख्रिस्ताच्या आत्म्याने प्रचंड प्रमाणात घेतला! त्यामुळेच तो व्याकूळ व अस्वस्थ झाला (मार्क १४:३३). त्याच्या भयानक यातना, त्याला आलेला रक्ताचा घाम, त्याचा आक्रोश व त्याच्या विनवण्या (इब्री ५:७), त्याची पुन्हा पुन्हा केलेली प्रार्थना ("शक्य असल्यास हा प्याला माझ्यापासून टळून जावो"), त्याचा अखेरचा भयानक टाहो (माझ्या देवा, माझ्या देवा, तू माझा त्याग का केलास?), ही सर्व हेच दर्शवतात की देवाने "अधर्म लक्षात आणला" म्हणजे काय याचे त्याला अतिशय भयजनक आकलन झाले. जर खुद्द देवाचा पुत्र देवाच्या क्रोधाच्या भाराखाली दडपून इतका कंपित झाला, तर बिचाऱ्या पाप्याने एवढाच आक्रोश करावा की "प्रभो, तुझ्यापुढे कोणाचा टिकाव लागेल!" हे माझ्या वाचका, जर तू एकमेव मुक्तिदाता ख्रिस्ताकडे "आश्रयासाठी धाव घेतली" नाहीस तर, "यार्देनेच्या महापुरात तू काय करशील?" (यिर्मया १२:५).

जेव्हा मी विचार करतो मानवजातीचा मोठा वर्ग देवाच्या चांगुलपणाचा दुरुपयोग करतो तेव्हा माझ्या मनाला त्याच्याविषयी बोलल्याशिवाय राहवत नाही की जगातील सर्वात मोठा हा चमत्कार आहे की, कृतघ्न जगावरील देवाची असलेली सहनशीलता आणि वैपुल्य. जर एखाद्या राजाच्या एका गावात शत्रू घुसला तर तो त्याला रसद पाठवत नाही तर त्या स्थानाला शक्य तितक्या नजीक जाऊन वेढा घालतो, आणि त्यांची उपासमार करतो. पण हा महान देव त्याच्या शत्रुंच्या नाशाकडे पाहून डोळे मिचकावू शकत असूनही उलट त्यांचे सहन करतो आणि त्यांची जोपासना करण्यास रोज खर्ची पडतो. म्हणूनच जो स्वत: दुर्जन व कृतघ्न जनांचे कल्याणच करतो. तो जेव्हा आम्हाला आज्ञा करतो की शाप देणाऱ्यांना आशीर्वादच द्या, तेव्हा तो योग्यच करतो. पण पाप्यांनो अशाने तुमचा बचाव होईल असे समजू नका. देवाचे जाते हळूहळू दळते, पण बारीक दळते. आता त्याच्या सहनशीलेचे व वैपुल्याचे जितके अधिक कौतुक कराल तितकाच भयानक त्याचा क्रोधही असेल. तो क्रोध त्याच्या चांगुलपणाचा दुरुपयोग केल्यामुळे उत्पन्न होणार आहे, तो कोणालाही आधार देणार नाही. समुद्रासारखे मऊशार असे काही नाही, पण वादळाने तो ढवळून निघाला म्हणजे त्याच्यासारखा खवळलेला कोणी नसतो. तसेच देवाचे चांगुलपण व धीराइतके मधुर काही नाही, पण एकदा का त्याच्या क्रोधाने पेट घेतला तर त्याच्याइतके भयंकर काही नाही (विल्यम गर्नोल १६६०).

मग हे माझ्या वाचका, "धाव घे" ख्रिस्ताकडे धाव घे; "येणाऱ्या क्रोधापासून पळ" (मत्तय ३:७). उशीर होण्यापूर्वीच जा. आम्ही कळकळीने विनवणी करतो की हा संदेश दुसऱ्या कोणाला तरी उद्देशून दिला आहे असे समजू नकोस. हा संदेश तुझ्यासाठी आहे. मी ख्रिस्ताकडे केव्हाच गेलो होतो अशा भ्रमाने आत्मसंतुष्ट राहू नकोस. खात्री करून घे. देवाकडे भीक माग की त्याने तुझ्या अंत:करणाची झडती घ्यावी व तुझे खरे रूप तुला दाखवून द्यावे.

## उपदेशकांसाठी दोन शब्द

बंधूनो, आपली मौखिक सेवा करताना, या गंभीर विषयावर आपण जास्तीत जास्त शिकवण नको का द्यायला? जुन्या कराराचे संदेष्टे वारंवार त्यांच्या श्रोत्यांना सांगत की त्यांच्या दुष्ट जीवनाने इस्राएलांच्या पवित्र देवाचा संताप ते चेतवतात. आणि क्रोधाच्या दिवसासाठी आपल्यावरील देवाचा क्रोध साठवून ठेवतात. आता तर जगाची अवस्था तेव्हापेक्षा काही चांगली आहे असे नाही. धूर्तपणे निष्काळजीपणा चेतवण्याविषयी, दैहिकतेच्या कारणांविषयी, अंत:करणाची झडती घेण्याविषयी "देव प्रतिदिनी दुर्जनांवर क्रोधविष्ट होत आहे" (स्तोत्र ७:११). याविषयी विस्तृतपणे कोणी उघड बोलत नाही. ख्रिस्ताच्या पुढे चालणाऱ्या ललकाऱ्याने आपल्या श्रोत्यांना इशारा दिला होता की "येणाऱ्या क्रोधापासून पळा" (मत्तय ३:७)) तारणाऱ्याने त्याच्या श्रोत्यांना बोध केला होता, "मी तुम्हाला सुचवून ठेवतो वध केल्यावर नरकात टाकायचा ज्याला अधिकार आहे त्याची भीती बाळगा. होय, मी तुम्हास सांगतो त्याचीच भीती बाळगा" (लूक १२:५). पौल म्हणाला, "आम्ही प्रभूच्या भयाची जाणीव बाळगून माणसांची समजूत घालतो" (२ करिंथ ५:११). विश्वासूपणा हीच अपेक्षा करतो की आपण स्पष्टपणे स्वर्गाविषयी जितके बोलतो तितकेच स्पष्टपणे नरकाविषयी बोलावे.

# प्रकरण १९

# देवावर खोल चिंतन

## दैवी स्वभाव

आतापर्यंतच्या अभ्यासात आपण दैवी स्वभावातील अद्भुत व सुरेख परिपूर्णतेचे अवलोकन केले. त्यावरून हे लक्षात आले असेल की त्याच्या गुणविशेषांवरच्या या अत्यंत दुर्बल व सदोष मननावरून स्पष्ट होते की — एक म्हणजे देवाचे व्यक्तिमत्व अनाकलनीय आहे. त्याची अफाट थोरवी पाहून आपल्याला सोफर प्रमाणे बोलणे भाग पडते, "देवाच्या रहस्याचा तुला थांग लागेल काय? सर्वसमर्थाच्या पूर्णतेचे तुला आकलन होईल काय? ते गगनाइतके ऊंच आहे, तेथे तुझे काय चालणार? ते अधोलोकाहून खोल आहे, ते तुला काय कळणार? त्याचे माप पृथ्वीपेक्षा लांब व समुद्रापेक्षा रुंद आहे" (ईयोब ११:७-९). जेव्हा आपण आपले विचार देवाचे सनातनत्व, त्याचे निराकरत्व, त्याची सर्वोपस्थितता, त्याची सर्वसमर्थता याकडे लावतो, तेव्हा आपली मने ओसंडून वाहतात.

## देवत्वाचा अभ्यास

देवाचा स्वभाव अनाकलनीय आहे ही सबब पुढे करून त्याने देवाच्या वचनात एवढी कृपा करून स्वत:विषयी जे काही व्यक्त केले आहे त्याचा आदराने शोध घेण्यासाठी प्रार्थनापूर्वक परिश्रम करणे आपण थांबवू नये. आपण त्याचे परिपूर्ण ज्ञान मिळवण्यास असमर्थ आहोत म्हणून ते प्राप्त करून घेण्यासाठी आम्ही मुळी प्रयत्नच करणार नाही, असे म्हणणे साफ चूक आहे. असे म्हटले गेले आहे की:

देवत्वाच्या महान विषयावर भक्तिभावाने, उत्कंठेने, सातत्याने संशोधन करण्यासाठी मानवाच्या संपूर्ण आत्म्याची बुद्धिमत्ता अफाट किंवा विस्तृत करणारे असे काहीही नाही. आत्म्याला विस्तारून अभ्यास करण्यासाठी आहे. ख्रिस्ताचे विज्ञान, त्याचे वधस्तंभी जाणे आणि देवत्वामधील गौरवी त्र्येकत्वाविषयीचे ज्ञान (सी. एच. स्पर्जन).

या उपदेशकांच्या राजाचे आणखी काही संदर्भ पाहू या :-

ख्रिस्ती व्यक्तीने योग्य अभ्यास जो करायचा आहे, तो देवत्वाचा. हे अत्युच्च विज्ञान आहे. त्यातून उत्तुंग अनुमान निघणार आहे. ते ताकदीचे तत्त्वज्ञान आहे. ते देवाच्या मुलाचे लक्ष त्याचे नाम, त्याचा स्वभाव, त्याचे व्यक्तित्व, त्याचे कार्य, आणि ज्या महान देवाला तो आपला पिता संबोधतो त्याचे अस्तित्व यावर केंद्रित करते. देवपणावर खोल चिंतन करताना अंत:करणाची वाढती सुधारणा करणारे असे काहीतरी त्यात आहे. हा खूप विस्तृत विषय आहे. त्याच्या प्रचंडतेत आपले विचार हरवून जातात. हा विषय इतका खोल आहे की त्याच्या अथांगपणात आपला अहंकार डुबून जातो. इतर विषय आपण ग्रहण करू शकतो व त्यांना मगरमिठी मारून त्यांच्याशी झुंजू शकतो. त्यात आपल्याला एक प्रकारचा आत्मसंतोष मिळतो; आणि "बघा मी किती हुशार आहे" असा विचार करून आपण पुढे जातो. पण जेव्हा आपण या सर्वश्रेष्ठ विज्ञानाकडे येतो आणि आपल्याला शोध लागतो की आपल्या ओळंब्याला याच्या खोलीचा अंदाज लागू शकत नाही, की गरूडनेत्रांनी त्याची उत्तुंग उंची अजमावता येत नाही, तेव्हा आपण माघार घेत उद्गारतो, "मी तर कालचाच आलेला आहे आणि मला काहीही माहीत नाही" (मलाखी ३:६ वरील संदेशातून).

होय, दैवी स्वभावातील अनाकलनीयतेतून आपण नम्रता, दक्षता व आदर ही शिकावीत. आपण मनन करून सर्व शोध घेतल्यावर ईयोबासोबत म्हणावे, "पाहा, ह्या त्याच्या कार्यक्षेत्राच्या फक्त सीमा आहेत; त्याची केवळ चाहूल आपल्या कानी येते; पण त्याच्या प्रभावाच्या गर्जनेचा अंत कोणाला लागेल?" (ईयोब २६:१४). जेव्हा मोशेने देवाने त्याचे तेज दाखववावे म्हणून विनंती केली, तेव्हा देवाने उत्तर दिले, "तुझ्यासमोर परमेश्वर या नावाची मी घोषणा करीन" (निर्गम ३३:१९). कोणी तरी म्हटले आहे की: "त्याचे नाम हा त्याच्या सर्व गुणांचा संग्रह आहे." प्युरिटन जॉन हॉवे अगदी योग्य घोषणा करतात:

म्हणून त्याच्या गौरवाविषयी आपण फक्त अशी कल्पना साकारू शकतो, जसे की एखाद्या ग्रंथाचा सारांश लिहावा, किंवा एखाद्या विस्तीर्ण प्रांताचा नकाशा काढावा. त्याने यात स्वत:विषयीची खरी माहिती दिली आहे; पण पूर्ण माहिती दिलेली नाही; आपल्याला जितके आकलन होऊ शकेल तेवढीच दिली आहे -— त्यामुळे आपली चुकीची कल्पना होत नाही व आपण अज्ञानही राहात नाही. त्याच्या अनेक परिपूर्णतांचे चिंतन आपण आपल्या मनाला लागू करू शकतो. त्यामुळे या धन्यवादित देवाच्या व्यक्तित्वाचा आपल्याला शोध लागतो. आणि त्या सर्व गुणवैशिष्ट्यांच्या संकल्पनांविषयी आपल्या ज्ञानात त्रुटी असल्या व त्यांचे कमी आकलन झालेले असले तरी ते आपल्या विचारातून आपण व्यक्त करू शकतो. जरी त्याच्या अनेक प्रकारच्या श्रेष्ठत्वाचे आपले आकलन त्याने आपल्याला पेलवेल तेवढ्यापुरतेच दिलेले असले, तरी आपल्याला त्याच्या गौरवाची कल्पना येऊ शकते.

जरी देवाच्या संतांना या जीवनात देवाचे होणारे ज्ञान व जे ज्ञान त्यांना स्वर्गात गेल्यावर होईल या दोहोत खरोखर मोठा फरक असला तरी आताच्या ज्ञानाची किंमत ते अपूर्ण आहे म्हणून कमी लेखू नये; त्यामुळे स्वर्गीय ज्ञानाची थोरवी व त्याहून विशेष म्हणजे त्याची वास्तवता काही कमी होत नाही. खरे तर वचन सांगते की आपण त्याला "साक्षात" म्हणजे तोंडोतोंड पाहणार आहोत; पूर्णपणे सर्व कळणार आहे व ओळखणार आहोत. पण यावरून असा तर्क काढणे की जसे तो आपल्याला ओळखतो तसे तेव्हा आपण त्याला ओळखू हे शब्द बोलणे ही दिशाभूल आहे. आणि ते ज्ञान प्राप्त करण्यास आपल्या मर्यादांमुळे आपल्याला असलेली बंधने अमान्य करणे हे चुकीच्या मार्गाला नेणारे आहे. संतांचे गौरवीकरण होणे आणि आणि त्यांना दैवी देह मिळणे या दोहोत फार

फरक आहे. ख्रिस्ती जन त्यांच्या गौरवी अवस्थेतही मर्यादा असलेलेच प्राणीमात्र असतील; म्हणून त्यांना अमर्याद देवाचे पूर्णपणे आकलन होणे कदापि शक्य नसणार.

स्वर्गात पवित्र जन देवाला मनाच्या नेत्रांनी पाहातील. कारण शारीरिक नेत्रांना तो नेहमीच अदृश्य असेल. ते त्याला विचारांनी व विश्वासाने अधिक स्पष्ट पाहू शकतील. तसेच त्याची कृत्ये व त्याच्या संकल्पातून आतापर्यंत जितका तो प्रकट झाला त्यापेक्षा अधिक विस्तृतपणे ते पाहू शकतील. पण लागलीच, तपशीलवार त्याच्या संपूर्ण स्वभावाची श्रेष्ठता समजण्याची कुवत प्राप्त होण्याइतकी त्यांची मने विकसित होणार नाहीत. अमर्यादेच्या परिपूर्णतेचे आकलन करून घ्यायला त्यांना स्वत:ला अमर्याद व्हावे लागेल. म्हणजे स्वर्गातही त्यांचे ज्ञान अंशत: असेल पण त्याच वेळी त्यांचा आनंद पूर्ण असेल, कारण वरील अर्थाने त्यांचे ज्ञान पूर्ण असेल. म्हणजे त्यांच्या विषयाची परिपूर्ण पूर्णता त्याना आकलन झाली नसली तरी त्या विषयाचे त्यांना व्हावे तितके आकलन झाले असेल. ते प्रगत झाली असेल. त्यांचा दृष्टिकोन विस्तृत झाला असेल. त्यांची धन्यता वृद्धींगत झाली असेल. पण ते एका मर्यादेपलीकडे जाऊ शकणार नाहीत, कारण आणखी शोध घेण्यासारखे काही राहिले नसेल. पुढे युगांमागून युगे जातील तरी देव त्याच्यासाठी अनाकलनीयच असेल (जॉन डिक १८४०).

दुसरी गोष्ट, देवाच्या परिपूर्णतेचे अवलोकन करताना असे दिसते की तो सर्व पूर्णतेने भरलेला आहे. तो स्वत:मध्ये व स्वत:साठी सर्वतोपरी पुरेसा आहे. तो अस्तित्वात प्रथम असल्याने त्याला दुसऱ्याकडून काही घ्यावे लागले नाही, की दुसऱ्याच्या सामर्थ्याने त्याला मर्यादा पडल्या नाहीत. तो अमर्याद असल्याने त्याच्या अंगी शक्य त्या सर्व परिपूर्णता आहेत. जेव्हा त्रेक देव एकटाच अस्तित्वात होता, तेव्हा तो सर्वस्वी स्वत:साठीच होता. त्याचे ज्ञान, त्याची प्रीती, त्याची उर्ज्या यांना त्याच्या स्वत:साठी पुरेशी उद्दिष्ट्ये होती. जर त्याला बाहेरून काही मदतीची गरज पडली असती तर तो स्वतंत्रपणे निराळा राहिलाच नसता. आणि तो देवच नसता व त्याच्याद्वारे व त्याच्यासाठी काहीच निर्माण झाले नसते (कलसै १:१६). तरी तो जो आहे तो उणीवांसाठी पुरवठा करायला नाही तर दूतांना व मानवांना जीवन व आनंद देण्यासाठी आणि त्यांना त्याच्या गौरवी तेजाच्या दृष्टांतात स्थान देण्यासाठी आहे. हे खरे आहे की तो त्याच्या बुद्धिमान प्राणिमात्र्यांकडून निष्ठेची व सेवेची अपेक्षा करतो. तरी त्याला त्यांच्या कर्तव्यदक्षतेपासून काही लाभ घडत नसतो. ते स्वत:चाच लाभ करून घेत असतात (ईयोब २२:२-३). देव तर सर्व साधनसामग्री अखेर आपले हेतू पूर्ण करण्यासाठी वापरत असतो. त्याचे सामर्थ्य कमी आहे म्हणून नव्हे तर बहुधा त्या दुर्बल साधनसामग्रींद्वारा तो डोळ्यात भरेल अशा प्रकारे त्याचे सामर्थ्य प्रदर्शित करत असतो.

## त्याचे जीवनाहून उत्तम वात्सल्य

देवाचे सर्वतोपरी पुरेसा आहे, हे त्याला प्राप्त करण्याची खटपट करावी असे त्याला उच्च उद्दिष्ट बनवते. खरा आनंद देवाचा उपभोग घेण्यातच आहे. जीवन आणि त्याचे वात्सल्य ही त्याची मेहरबानी जीवनाहून उत्तम आहे. "परमेश्वर माझा वतनभाग आहे असे माझा जीव म्हणतो म्हणून मी त्याच्या ठायी आशा ठेवीन" (विलाप. ३:२४). त्याच्या संतांचे महत्त्वाचे उद्दिष्ट त्याची प्रीती, त्याची कृपा व त्याचे गौरव यांची आस बाळगणे हे असते. तोच त्यांच्या अत्युच्च समाधानाचा झरा असतो.

असे म्हणणारे पुष्कळ असतात की आम्हाला काहीतरी चांगले कोण दाखवील? प्रभो, तू आपला मुखप्रकाश आमच्यावर पाड. तू माझ्या अंत:करणात हर्ष घातला आहे. धान्याची व द्राक्षारसाची समृद्धी झाली म्हणजे लोकांस जो आनंद होतो त्यापेक्षा अधिक आनंद तू माझ्या मनात उत्पन्न केला आहे (स्तोत्र ४:६-७).
होय, यामुळेच ख्रिस्ती व्यक्ती योग्य मनस्थितीत म्हणू शकते:

"अंजिराचे झाड न फुलले, द्राक्षीच्या वेलीस फळ न आले, जैतुनाचे उत्पन्न बुडाले, शेतात धान्य न पिकले, मेंढवाड्यातील कळप नाहीतसे झाले, व गोठ्यात गुरेढोरे न उरली, तरी मी परमेश्वराच्या ठायी हर्ष पावेन. मला तारण देणाऱ्या देवाविषयी मी उल्लास करीन" (हबक्कूक ३:१७,१८).

## निर्मितीचा देव

तिसरी गोष्ट, देवाच्या परिपूर्णतेचे अवलोकन केल्यावर आढळून येते की तो विश्वात सर्वाहून सर्वसमर्थ आहे. पुढील बोल सार्थच आहेत:

निर्मितीवर जी सत्ता उभारली आहे, ती परिपूर्ण सत्ता आहे. ज्याने कदाचित काहीही निर्माण केले नसते, त्याला आपल्या इच्छेनुसार सर्व काही निर्माण करण्याचा अधिकार आहे. त्याच्या अनिर्बंध सामर्थ्याचा वापर करताना त्याने निर्मितीचा काही भाग केवळ निर्जिव, किंवा हलक्या प्रतीचा, नाहीतर अधिकच शुद्ध पोत असलेला बनवला. पण त्यांच्यात भिन्नभिन्न गुण ठेवले पण ते सर्व अचल व निर्जीव बनवले. तर दुसऱ्या काही भागांना त्याने व्यवस्था लावून दिली, आणि त्यांना संवेदनक्षम, वृद्धी होणारे, विस्तार पावणारे घडवले, तरीही ते खऱ्या अर्थाने जीवनरहित होते. तर आणखी एका भागाला त्याने व्यवस्था तर लावून दिलीच पण शुद्धीवर असणारे अस्तित्व दिले, संवेदनशील अवयव दिले, आणि प्रेरणादायी शक्ती दिली. अशा प्रकारे मानवाला त्याने सारासार विचार करण्याचे दान दिले. अविनाशी आत्मा दिला. त्याद्वारे तो क्रमाने उच्च दर्जाने अस्तित्वात असणारे जे उच्च प्रांतात राहतात त्यांच्याशी मित्रत्वाच्या कराराने बांधला जातो.

ज्या जगाला त्याने निर्माण केले त्याच्यावर त्याचा सर्व सामर्थ्याने राजदंड असतो. "मी परात्पर देवाचा धन्यवाद केला, त्या सदा जिवंत असणाऱ्या देवाचे स्तवन केले व त्याचा महिमा गाईला. कारण त्याचे प्रभुत्व सर्वकाळचे आहे, आणि त्याचे राज्य पिढ्यानपिढ्या राहाणारे आहे. पृथ्वीवरील सर्व रहिवासी केवळ क:पदार्थ होत, तो आकाशातील आपल्या सैन्याचे व पृथ्वीवरील रहिवाश्यांचे इच्छेस येईल ते करतो. आणि तू असे काय करतोस असे त्याचा हात धरून कोणाच्याने म्हणवत नाही" — दानीएल ४:३४-३५ (जॉन डिक).

प्राणिमात्राचा विचार केला तर त्याला कसलाही अधिकार नाही. तो आपल्या निर्मात्याकडून काहीही आग्रह धरू शकत नाही, आणि कोणत्याही प्रकारे त्याने वागवले, तरी तक्रार करू शकत नाही. तरीही देवाच्या सर्वांवर असलेल्या परिपूर्ण अधिपत्याचा विचार करताना त्याच्या नैतिक परिपूर्णतेवरील आपली नजर हरवू देता कामा नये. देव चांगला व न्यायी आहे. तो नेहमी योग्य तेच करतो. तरीसुद्धा, तो त्याच्या साम्राज्याच्या व न्याय्य इच्छेच्या उपयोगाने सार्वभौमता अंमलात आणतो. त्याच्या स्वत:च्या दृष्टीस उत्तम दिसेल त्याप्रमाणे तो प्रत्येक प्राणिमात्राला त्याची जागा देतो. त्याच्या स्वत:च्या मसलतीने तो त्या प्रत्येकाच्या भिन्न परिस्थितीला आज्ञा देतो. कोणत्याही

प्रभावाखाली न राहता तो प्रत्येक पात्र त्याने ठरवल्यानुसार घडवतो. त्याची इच्छा असेल त्याच्यावर तो दया करतो आणि त्याला वाटेल त्याचे मन तो कठीण करतो. आपण कोठेही असलो तरी त्याची नजर आपल्यावर असते. आपण कोणीही असो. आपले जीवन व सर्व काही त्याच्या विनियोगासाठी असते. ख्रिस्ती व्यक्तीसाठी तो सऱ्हदयी पिता आहे. बंडखोर पाप्यासाठी तो भस्म करणारा अग्नी असणार आहे. "जो सनातन, अविनाशी, अदृश्य राजा, असा एकच देव, त्याला सन्मान व गौरव युगानुयुग असो. आमेन" (१ तीमथ्य १:१७).

मागील पृष्ठ

देवाचे गुणविशेष हे आपल्या काळातील दर्जेदार ख्रिस्ती पुस्तक बनले आहे. इतर भक्तिविषयक पुस्तकांसारखे हे पुस्तक नाही.पिंक हे देवाच्या प्रत्येक गुणविशेषासाठी बायबलमधून पुरावे देतात.ते देवाच्या प्रत्यक्ष स्वभावाचे खोल दर्शन घडवतात.वाचक प्रत्येक प्रकरण वाचल्यावर देवाला उंचावतो व ज्या देवाशी आपला संबंध आहे त्याच्याविषयीच्या  ज्ञानात वाढलेला असतो.

अँड्र्यु डब्ल्यु पिंक(१८८६-१९५२)यांचा जन्म नटिंगहॅम इंग्लंड येथे झाला.देवाच्या आत्म्याद्वारे त्यांचे २२व्या वर्षी तारण झाले.शिकागो  यु एस ए येथील मूडी बायबल इन्स्टिट्यूटमध्ये त्यांनी अभ्यास केला.त्यानंतर त्यांनी कोलोराॅडो, कंटकी, दक्षिण कलोरीना व कॅलिफोर्नियातील मंडळ्यांमध्यै पाळकीय सेवा केली .आॅस्ट्रेलियातील सिडनी येथे१९३४ पर्यंत सेवा करून ते आपली मायभूमी इंग्लंडला परतले. स्काॅटलंडमधील ल्युइसचे त्यांनी कायमस्वरुपी नागरीकत्व मिळवले.तेथे मृत्युपर्यंत १२ वर्षे राहिले.१९२२-१९५३ पर्यंत दरमहा ते बायबल अभ्यासावर  लेख प्रकाशित करीत.ते बायबल अभ्यासाच्या कृपा नीतिमान ठरले जाणे व पवित्रीकरण या विषयापासून कधीच भरकटले नाहीत.